म. ग्रं. सं. ठाणें.
विषय ...भू-प्रवास
सं. क्र. 8010



# महाराष्ट्राचे जिल्हे

## अमरावती

REFBK-0028958

संदर्भ
भूप्रवास
८०७
२८९५८
३।३।९०

# अमरावती

प्रसिद्धि विभाग महाराष्ट्र सरकार मुंबई

REFBK-0028958

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि खात्याचें प्रकाशन

शासन मुद्रणालय, नागपूर

# अनुक्रमणिका


| क्रमांक | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | परिचय | ५ |
| २. | भौगोलिक रचना | ११ |
| ३. | शेती व ओलित | १७ |
| ४. | पशुधन व पशुसंगोपन | २४ |
| ५. | वन संपदा | २७ |
| ६. | सहकार | २९ |
| ७. | उद्योगधंदे | ३१ |
| ८. | वाहतुक व दळणवळण | ३७ |
| ९. | वीज पुरवठा | ४२ |
| १०. | शिक्षण | ४३ |
| ११. | आरोग्य व सार्वजनिक स्वास्थ्य | ४५ |
| १२. | समाज कल्याण व आदिवासी कल्याण | ५१ |
| १३. | दारूबंदी कार्य | ५८ |
| १४. | जिल्ह्यांतील गौरव स्थानें— | |
| | विदर्भाचें नंदनवन | ५९ |
| | श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती | ६० |
| | हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती | ६१ |
| | जगदंबा कुष्ठ-निवास, अमरावती | ६२ |
| | गुरुकुंज आश्रम, मोझरी | ६३ |
| | रूरल इन्स्टीटयूट | ६३ |
| | विज्ञान-मंदीर | ६५ |
| १५. | यात्रा व मेळावे | ६६ |
| १६. | वृत्तपत्रें आणि प्रसिद्धि | ६८ |
| १७. | जिल्हा परिषद | ७१ |
| १८. | अमरावती जिल्हा परिषदेचे अेक वर्ष | ८३ |
| १९. | कोणाकडे कशाची चौकशी करावी | ८६ |

# अमरावती जिल्हा

## १. परिचय

**विस्तार**

आजचा अमरावती जिल्हा १९०५ मध्ये अस्तित्वांत आला. जिल्हयाचा विस्तार उत्तर-दक्षिण ९० मैल व पूर्व-पश्चिम १२० मैल आहे. जिल्हयाचे क्षेत्रफळ ४,६९१ चौरस मैल असून लोकसंख्या १९६१ च्या शिरगणतीनुसार १२,३२,७८० आहे. जिल्हयाचे नांव "अमरावती" हे जिल्हयाच्या मुख्य ठिकाणाचे नांवावरून पडले. अमरावती हे नांव अंबादेवीचे मंदीर अमरावतीला असल्यामुळे पडले असावे असे म्हणतात. "अमरावतीला" कांही लोक "उमरावती" असेहि संबोधतात.

**जिल्हयाचा पूर्व काळ**

अमरावती हा जिल्हा वऱ्हाडांतील अेक महत्वाचा जिल्हा आहे. वऱ्हाड म्हणजे विदर्भ. विदर्भाचा उल्लेख महाभारतांतहि आढळून येतो. खिस्तपूर्व काळ १५०० वर्षे ते खिस्तपूर्व १००० वर्षे या काळातील लिखाणांतहि विदर्भाचा उल्लेख असल्याचे सांगतात. महाभारतांतील कांही महत्वाचे प्रसंग अमरावती जिल्हयातच घडलेले असावेत. भगवान श्रीकृष्णांनी रुक्मिणीला कुंडिनपूर येथून पळवून आणले व अमरावती येथील अंबादेवीच्या मंदिरात तिच्याशी लग्न केले अशी दंतकथा येथे प्रचलित आहे. कुंडिनपूर म्हणजे वर्धा नदीच्या कांठावर सध्या वसलेले अमरावती जिल्हयातील "कौडिण्यपूर" हे होय.

रुक्मी राजाने आपला वृद्धापकाळ अमरावती शहरांपासून पश्चिमेला ९ मैलावर असलेल्या भातकुली या गांवी आणि त्याच्या परिसरांत घालविला असल्याचाहि महाभारतांत उल्लेख आहे. तसेच महाभारतांतील नल-दमयंतीची प्रणयकथा विदर्भातच घडलेली असावी, अशी वदंता आहे.

**सम्राट अशोकाच्या साम्राज्यांत**

सम्राट अशोकाच्या साम्राज्यांत विदर्भ प्रदेश होता. खिस्तपूर्व २७२ ते २३१ या काळांत विदर्भावर अशोकाचे साम्राज्य होते. त्यानंतरच्या काळांत आंध्र, तेलंगणा या राजघराण्याच्या कृपाछत्राखाली हा भाग गेला.

**राष्ट्रकूट, वाकाटक व चालुक्य कारकीर्द**

इतिहासकार व्हिन्सेंट स्मिथ यांच्या मताप्रमाणें राष्ट्रकूट व वाकाटक् राजघराण्याच्या राज्याचा एक प्रदेश म्हणून विदर्भ त्यांत होता. चालुक्य राजघराण्याच्या साम्राज्यांतहि विदर्भ कांही काळ होता. देवगिरींच्य. यादवांचे साम्राज्यांत विदर्भाचा समावेश कांही काळ होता. इसवी सन १२६० ते १२७१ या दरम्यान हेमाद्रि किंवा हेमाडपंत नांवाचा एक मंत्री या राज्यांत होता. विदर्भातील हिंदू देवळें "हेमाडपंथी" पद्धतीची आहेत. हे स्थापत्य हेमाडपंतांचेच असावे.

**मुसलमानी अंमल**

अल्लाउद्दीन खिलजी याने दक्षिणेत देवगिरीवर चाल केली. या त्याच्या मोहिमेंत तो दोन दिवस एलिचपूर (अचलपूर) येथे होता. दक्षिणेतील मोहीम यशस्वी करून दिल्लीला परतल्यावर फिरोजशाह खिलजीचा खून करून अल्लाउद्दीन १२९६ च्या सुमारास दिल्लीच्या राजगादीवर बसला. त्यावेळेस पासून १८५३ पर्यंत अमरावती जिल्हा विदर्भातील इतर जिल्हयाबरोबरच मुसलमानी अंमलाखाली होता. या काळांत तघलक शाह, बहामनी याच्या अंमलाखाली विदर्भ होता. त्या काळांत विदर्भाची राजधानी एलिचपूर (अचलपूर) हीच होती.

१७३८ मध्ये नागपूरच्या रघुजी भोसल्यांनी एलिचपूर येथील सुभेदार शुजातखान याचेवर चाल करून त्याचा पराभव केला. नरनाळा व गाविलगड किल्ले ताब्यांत घेतले. १७७५ च्या सुमारास एलिचपूरचा सुभेदार निझामअलि याने रघुजी भोसल्यांचे वारसदार मुधोजी भोसल्याचा पाडाव करून नरनाळा व गाविलगड किल्ले पुन्हा परत मिळविले. पण भोसल्यांनी गोंड राजाविरुद्ध मोगलांना मदत करण्याचे कबूल करून पुन्हा या किल्ल्याचा ताबा घेतला व या विभागाची वतनदारी घेतली. १८०३ मध्ये रजपूत बेणीसिंग हा या किल्ल्यावरील किल्लेदार होता. १८०३ मधील नोव्हेंबर महिन्यांत जनरल

आर्थर वेलस्लीने या किल्ल्यावर चाल केली व डिसेंबरच्या १५-१६ तारखेला किल्ल्याचा पाडाव केला. १७ डिसेंबर १८०३ रोजी देवगाव येथें तहावर सह्या झाल्या. वऱ्हाडवर असलेली भोसल्यांची वतनदारी काढून घेण्यात आली. वर्धा नदीच्या पूर्व तीरापर्यंतच भोसल्यांचा अधिकार राहिला. पण या तहामुळे गाविलगड व नरनाळा हे किल्ले आणि मेळघाटचा भाग मात्र भोसल्याच्यांच ताब्यांत राहिला. या तहानंतर १५ दिवसांचे आंतच म्हणजे ३० डिसेंबर रोजी ईस्ट इंडिया कंपनीचा गव्हर्नर वेलस्ली याने दर्यापूर तहसिलीतील अंजनगांव येथे शिंद्यांशी तह केला. ईस्ट इंडिया कंपनीच्या फौजेला मदत करणाऱ्या निझामाच्या सैनिकांचे नेतृत्व करणाऱ्या राजा महिपत रामाला वऱ्हाडची सुभेदारी देण्यात आली.

**पेंढाऱ्यांचा उपद्रव व १८२२ चा तह**

पेंढाऱ्यांचा उपद्रव विदर्भातील लोकांना होत होता. त्यांच्यापासून बचाव व्हावा म्हणून अमरावती शहराभोवती १८०७ मध्ये परकोट बांधण्यांत आला. पेंढाऱ्यांचा उपद्रव या भागांत व्हावयाचे कारण मेळघाट भाग हा भोसल्यांच्या वतनदारीत असल्यामुळे पेंढाऱ्यांना या भागांत आश्रय मिळत असे. पेंढाऱ्यांचा बंदोबस्त केल्यावर १८२२ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने भोसल्यांशी नवा तह करून मेळघाट भाग, नरनाळा व गाविलगड किल्ल्यावरील भोसल्यांची वतनदारी काढून घेतली व दोन्ही किल्ले निझामाच्या ताब्यांत दिले. १८५३ मध्यें वऱ्हाड ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यकारभाराखाली आला. १८६४ मध्ये वऱ्हाडच्या जिल्हयांची पुनर्रचना करण्यांत आली. पूर्व व पश्चिम वऱ्हाड हे दोन जिल्हे करण्यांत आले. पूर्व वऱ्हाडचे मुख्य ठिकाण अमरावती व पश्चिम वऱ्हाडचे मुख्य ठिकाण अकोला येथे होते. त्यावेळी अमरावती जिल्हयामध्ये सध्याच्या यवतमाळ जिल्हयाचाहि समावेश होता. १८०५ मध्ये सध्याचा अमरावती जिल्हा अस्तित्वांत आला. पूर्वीच्या मध्यप्रदेश सरकारने १९४८ मध्ये कमिशनऱ्या रद्द करीपर्यंत अमरावती शहर हे वऱ्हाड कमिशनरीचे मुख्य ठिकाण होते.


**भारतीय स्वातंत्र्य चळवळीत**

१८५३ मध्ये वऱ्हाड ईस्ट इन्डिया कंपनीच्या राज्यकारभाराखाली आला. त्यानंतर स्वातंत्र्य प्राप्तीच्या प्रत्येक सनदशीर चळवळींत अमरावती जिल्हयातील राजकीय व सामाजिक पुढाऱ्यांनी भाग घेतला. १८९७ साली अमरावती येथे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरविण्यांत आले. त्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष कै. दादासाहेब खापर्डे हेच होते. लोकमान्य टिळकांशी निकटचा संबंध आलेल्यांत कै. दादासाहेब खापर्डे हे प्रमुख होत. टिळकांच्या बहुतेक खटल्यांत श्री. खापर्डे यांनी कायदे सल्लागाराची भूमिका घेतलेली होती. राष्ट्रीय सभेच्या जहाल व मवाळ गटांचे अनुयायी अमरावती जिल्हयातहि होते. खापर्डे जहाल तर रा. ब. मुधोळकर व सर मोरोपंत जोशी हे मवाळ गटाचे. या लोकांनी आपआपल्या परीने जनजागृतीचे कार्य केवळ अमरावती जिल्हयातच नव्हे तर वऱ्हाड आणि महाराष्ट्रात केले. कै. दादासाहेब खापर्डे यांची लोकप्रियता इतकी होती की ब्रिटिश अंमलदार त्यांना "वऱ्हाडचे अनभिषिक्त राजे" (Un-crowned King of Berar) संबोधित. "ताई महाराज" खटल्याच्या निमित्ताने लोकमान्य टिळक १९०२ साली अमरावतीला आले होते. रिस्ले सर्क्युलर निघाल्यामुळे खापर्डे-मुधोळकर-जोशी या मंडळींनी बेरार एज्युकेशन सोसायटी स्थापन करून सरकारी शाळातील राष्ट्रीय वृत्तीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली.

राष्ट्रीय वृत्तीचा प्रसार आणि प्रचार करण्याचे दृष्टीने पोषक साहित्य आणि नाटके लिहिण्यांत अमरावती जिल्हयातील कै. वीर वामनराव जोशी व कै. ना. रा. बामणगांवकर यांनी पुढाकार घेतला होता.

१९०२ नंतर राज्यकारभारासाठी वऱ्हाड मध्यप्रांताशी जोडण्यांत आला. स्वातंत्र्याच्या सनदशीर चळवळीत भाग घेण्याच्या उद्देशाने १९१० मधील इम्पीरीयल कौन्सीलमध्ये अमरावतीचे कै. रा. ब. मुधोळकर व नंतर कै. दादासाहेब खापर्डे हे गेले. कै. श्री. ब. तांबे हे मध्यप्रांताचे पहिले भारतीय गव्हर्नर होते. कायदे मंडळांत जाऊन ब्रिटीश राज्ययंत्रणेच्या प्रतिगामी वृत्तीला आळा बसविण्याचे कार्य कै. श्री. ब. तांबे, कै. रा. ब. मुधोळकर, खापर्डे पिता-पुत्र, कै. सर मोरोपंत जोशी, कै. जानराव देशमुख, कै. उत्तमराव इटकीकर, श्री. ग. आ. गवई, श्री. रामराव देशमुख, डॉ. पंजाबराव देशमुख, वगैरे मंडळीनी केले. १९३० च्या चळवळीत देखील अमरावती जिल्हयाने पुढाकार घेतला. १९४२ च्या चळवळीत मोर्शी तालुक्यातील दडपशाहीमुळे जिल्हा हादरून निघाला यावली आणि बेनोडा येथील उठावाने ज[illegible]या शौर्याची आणि हिंमतीची ओळख परकीय सत्तेला करून दिली.

# अमरावती जिल्हा


धारणी
चौराकुंड
हरिसाल
सेमाडोह
चिखलदरा
अचलपूर कँप
चांदूर बाजार
मोर्शी
वरुड
अंजनगांव
आसेगांव
सावरखेड
तिवसा
येवदा
दर्यापूर
अमरावती
बडनेरा
चांदूर रेल्वे
धामणगाव
फॉरेस्ट बंगले
रेस्ट हाऊस
सर्किट हाऊस
फॉरेस्ट रेंजर्स क्वॉर्टर्स
हॉलीडे कँप
किल्ला

जिल्ह्यांत मराठी भाषाच प्रमुख आहे. धर्म व पंथाच्या दृष्टीने जिल्ह्यांत विविधता आहे. महानुभाव, जैन, मारवाडी, मुसलमान, ख्रिस्त, इत्यादि भिन्न पंथांचे व धर्मांचे लोक अमरावती जिल्ह्यांत आहेत. तेराव्या शतकांत महानुभाव पंथ प्रवर्तक श्री. चक्रधर यांनी "महाराष्ट्री" असावे असा दंडक घातला व त्याने आपला गुरु शोधला, तो अमरावती जिल्ह्यातील! रिद्धपूर व गोविंदप्रभु ही दोन नांवे महानुभावांना अत्यंत पूज्य आहेत. भातकुली, मुक्तागिरी जैनांची तीर्थक्षेत्रे, तर उपराई ही मुस्लीमांची आवडती यात्रा. जिल्ह्यांत नाना धर्म व नाना पंथ असले तरी लोकजीवनाचा आत्मा एक आणि तो म्हणजे शेती. बहिरमची यात्रा या जीवनाचा एक उत्कृष्ट नमुना आहे. भारतीय निधर्मी राज्याचे ते एक प्रतीकच आहे. यात्रा कोणाची हा प्रश्न केल्यास शेतकऱ्यांची हे एकच उत्तर मिळते. संपूर्ण जिल्ह्यांत "मराठीचा" वापर प्रामुख्याने असला तरी मेळघाट मध्ये कोरकू भाषा, अचलपूर तालुक्यांत झाडपी व कोष्टी या मराठी उपभाषा आहेत.

**लोक व भाषा**

अमरावती हे १३७,८४७ लोकसंख्या असलेले शहर असून तेच जिल्ह्याचे मुख्य ठिकाण आहे. "कलेक्टर" हे शासनाचे जिल्हा पातळीवरील प्रमुख असून वेगवेगळ्या खात्याचे जिल्हा प्रमुखाचे कार्यावर त्यांची देखरेख असते.

**शासन व्यवस्था**

जिल्हा दंडाधिकाऱ्यांचे अधिकार कलेक्टरांना दिले असून जिल्ह्यांच्या मुख्य ठिकाणीं असलेल्या ज्येष्ठ डेप्युटी कलेक्टरांस जिल्हा दंडाधिकाऱ्याचे अधिकार असतात. त्यांना "रेसिडेंट डेप्युटी कलेक्टर" म्हणून संबोधण्यांत येते. कलेक्टरांना साह्य करण्यासाठी जिल्ह्यांत १० डेप्युटी कलेक्टर्स असून त्यांच्यापैकी ५ डेप्युटी कलेक्टर्स जिल्ह्यांत उपविभागाधिकारी म्हणून काम करतात आणि ६ डेप्युटी कलेक्टर्स जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणी म्हणजे अमरावतीलाच रेसिडेंट डेप्युटी कलेक्टर, कोषागार (Treasury) अधिकारी, जिल्हा निवडणुक अधिकारी व भाडे नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्त केलेले असतात.

जिल्ह्यांत सहा तालुक्यापैकी, अचलपूर व मेळघाट सोडून, उरलेल्या चार तालुक्याचा प्रत्येकी एक असे चार उपविभाग आहेत. अचलपूर व मेळघाट मिळून एक उपविभाग आहे. या पांचहि उपविभागांवर पांच उपविभागीय अधिकारी असून तहसिलदार व नायब-तहसिलदार त्यांना मदत करतात. जिल्ह्यांत सहा तहसिलदार व २६ नायब-तहसिलदार आहेत. प्रत्येक तहसिलींत एक तहसिलदार असून नायब-तहसीलदारांची विभागणी अमरावती—८, अचलपूर—५, दर्यापूर—४, मोर्शी—४, चांदूर—४ व मेळघाट येथे १ अशी करण्यांत आली आहे. राजस्व खात्याद्वारे (रेव्हेन्यू) हा जिल्हा २६ रेव्हेन्यू सर्कल्स्मधे विभागला आहे व राजस्व निरीक्षक (रेव्हेन्यू इन्स्पेक्टर) पटवाऱ्याच्या सहाय्याने शेतमोजणी, नोंदणी वगैरे राजस्वबाबत कामें करतात. राजस्व खात्याबरोबरच जिल्ह्यांत इतर अनेक खातीं आहेत व प्रत्येक खात्याचा जिल्हाप्रमुख या जिल्ह्यांत आहे. तसेंच कांहीं खात्यांचे विभागीय अधिकारीहि जिल्ह्यांत आहेत.

अमरावती येथे जिल्हा न्यायालय असून, जिल्ह्यांत तहसिलीच्या मुख्य ठिकाणी दिवाणी व फौजदारी न्यायालयें आहेत. अमरावती येथे जिल्हा कारागृह आहे. त्या कारागृहात ६८० कैद्यांची व्यवस्था होऊ शकते. कारागृहांत कैद्यांस सत्रंज्या व नवारी विणण्याचे काम, लोहारकाम यासारखी कामें शिकविली जातात.

**न्यायालयें**

जिल्ह्यांत शांतता प्रस्थापित करणें, गुन्ह्यांची नोंद, गुन्हेगारांचा छडा लावणें यासारखी जन-हिताची कामें पोलिस खात्यामार्फत होत असून जिल्हा पोलिस प्रमुख हे या यंत्रणेचे जिल्हापातळीवरील मुख्य आहेत. अमरावती शहरातील पोलिस व्यवस्थेसाठी शहर पोलिस अधिकारी आहे. अमरावती जिल्ह्यांत १,६०० पोलिस कॉन्स्टेबल्स असून ते जिल्ह्यांतील ३५ पोलिस स्टेशन्स्मधे विभागण्यांत आले आहेत. संपूर्ण जिल्ह्यात या यंत्रणेत ३ सब-डिव्हीजनल ऑफिसर्स हे असून ते डेप्युटी सुपरिन्टेन्डेन्टच्या हुद्याचे आहेत. जिल्ह्यांत ७ इन्स्पेक्टर्स व ६६ सब-इन्स्पेक्टर्स आहेत. अमरावती येथे एक पोलिस कल्याण केंद्र स्थापन करण्यांत आले आहे.

**पोलीस व्यवस्था**


अमरावती जिल्हा
शासनव्यवस्था
धारणी
चिखलदरा
अचलपूर कँप
अचलपूर सिटी
परतवाडा
अंजनगाव
सुर्जी
दर्यापूर
येवदा
शिरजगाव कसबा
चांदूर बाजार
मोर्शी
शिरखेड
आसेगाव
माहुली
वलगाव
तिवसा
खोलापूर
भातकुली
अमरावती
बडनेरा
कुऱ्हा
चांदूर रेल्वे
धामणगाव
तळेगाव दशासर
नांदगाव खंडेश्वर
वरुड
बेनोडा
शेंदूरजनाघाट
पोलीस स्टेशन
पोलीस हेड क्वॉटर्स
तालुक्याचे मुख्य ठाणे
जिल्ह्याचे मुख्य ठाणे
विकास खंडाचे मुख्य ठाणे
नगरपालिका
जनपद सभा
तालुका सीमा
विकास खंड सीमा

मोठ्या शहरांचा कारभार पाहण्यासाठी अमरावती जिल्ह्यांत एकूण तेरा नगरपालिका आहेत- नगरपालिका असलेल्या गांवांची लोकसंख्या १९६१ च्या जनगणनेनुसार पुढीलप्रमाणें आहे :—

| | नगरपालिका | लोकसंख्या |
|---|---|---|
| (१) | अमरावती ... ... | १३७,८४७ |
| (२) | अचलपूर शहर ... | ३६,५५१ |
| (३) | परतवाडा ... ... | १७,४६८ |
| (४) | बडनेरा ... ... | २३,९१३ |
| (५) | दर्यापूर ... ... | १५,२०४ |
| (६) | अंजनगांवसुर्जी ... | २१,९९२ |
| (७) | वरूड ... ... | १५,८८७ |
| (८) | शेंदूरजना ... ... | ११,६१८ |
| (९) | धामणगांव ... ... | १२,२०७ |
| (१०) | मोर्शी ... ... | १२,००२ |
| (११) | चांदूर रेल्वे ... ... | ९,२९२ |
| (१२) | चांदूर बाजार ... | ६,६४९ |
| (१३) | चिखलदरा ... ... | १,३४८ |

## सामुहिक विकास

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर राज्यकारभाराचा उद्देश " जनतेचे कल्याण " किंवा " कल्याणकारी राज्याची स्थापना " हा झाला. त्यासाठी देशांत सामुहिक विकास योजना अस्तित्वांत आली. १९५२ साली अमरावती जिल्ह्यातील अमरावती, मोर्शी व दर्यापूर तालुक्यात सामुहिक विकास गट स्थापन करण्यांत आले.

| विकास खंडाचे नांव (१) | क्षेत्रफळ चौरस मैलांत (२) | खेड्यांची संख्या (३) | लोकसंख्या (४) |
|---|---|---|---|
| अमरावती ... ... ... | ३१५ | १४७ | ७१,९४८ |
| मोर्शी ... ... ... | ३१९ | १९२ | ७४,२३४ |
| वरूड ... ... ... | ३१० | १३९ | ८४,५७५ |
| दर्यापूर ... ... ... | २३८ | ११४ | ६५,३७८ |
| चांदूर बाजार ... ... | २४७ | १४४ | ९८,४७२ |
| अचलपूर ... ... ... | २३८ | १७५ | ७९,४७८ |
| अंजनगांव ... ... ... | २४७ | १६२ | ७४,१७६ |
| तिवसा ... ... ... | ३५५ | १४७ | ८३,८३५ |
| चांदूर रेल्वे ... ... ... | ३४४ | १४८ | ९९,८०० |
| धारणी ... ... ... | ६९० | १३६ | ३०,५८८ |
| चिखलदरा ... ... ... | ८५६ | १५३ | २१,५८८ |
| भातकुली ... ... ... | २२३ | १३६ | ६४,२९८ |
| नांदगांव खंडेश्वर ... ... | २६० | १५२ | ५२,३२८ |

लोकसंख्येचे आंकडे १९५१ च्या शिरगणतीवर आधारित आहेत.

सामुहिक विकास योजनेत जनतेने दिलेल्या सहकार्याचे एक उदाहरण म्हणजे रिद्धपूर-तिवसा हा २५ मैलाचा रस्ता पूर्णपणें जनतेच्या पुढाकारामुळेच हाती घेण्यांत आला व जनतेच्या सहकार्याने १५ महिन्याच्या आंत पूर्ण करण्यात आला.

# २. भौगोलिक रचना

अमरावती जिल्हा हा उत्तर अक्षांश २०°.३२′ ते २१°.४६′ आणि पूर्व रेखांश ७६°.३८′ ते ७८°.२७′ या दरम्यान पसरलेला आहे. जिल्हयाचे मुख्य ठिकाण अमरावती हे मुंबई-नागपूर रेल्वे मार्गावरील बडनेरा स्टेशनापासून ६ मैलावर आहे. नागपूरपासून अमरावती ११५ मैलावर व मुंबईपासून ४१९ मैलावर आहे. अमरावती जिल्ह्याच्या पूर्वेला वर्धा, नागपूर हे जिल्हे; दक्षिणेला यवतमाळ, अकोला जिल्हे; पश्चिमेला अकोला, बुलढाणा व उत्तरेला मध्यप्रदेशातील नेमाड, बैतुल व छिंदवाडा हे जिल्हे आहेत.

**स्थान**

अमरावती जिल्हयातील सहा तहसिलींचे क्षेत्रफळ व लोकसंख्या (१९६१ शिरगणतीप्रमाणें) खालीलप्रमाणे आहे :—

| तहसिल | क्षेत्रफळ चौरस मैल | | | एकूण खेडीं | एकूण शहरें | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | ग्रामीण | शहरी | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| मेळघाट ... ... ... | १,५४६ | १,५४४ | २ | २७९ | १ | ७२,७७९ |
| अमरावती ... ... | ८३३ | ८१८ | १५ | ३५३ | ३ | ३८२,७०७ |
| चांदूर रेल्वे ... ... | ६९४ | ६९१ | ३ | २३७ | २ | १९७,००३ |
| मोर्शी ... ... ... | ६२३ | ६२२ | १ | २२८ | ३ | १९६,७०५ |
| दर्यापूर ... ... ... | ५०५ | ५०३ | २ | २४० | २ | १७४,३९७ |
| अचलपूर ... ... ... | ४९० | ४५३ | ३७ | २३० | ६ | २०९,१८९ |
| एकूण ... | ४,६९१ | ४,१३१ | ६० | १,५६७ | १७ | १,२३२,७८० |

जिल्हयातील शहरी भागाची लोकसंख्या ३२२,१९४ असून ग्रामीण भागांतील लोकसंख्या ९१०,५८६ आहे. जिल्हयाचा ग्रामीण भाग ४,६३१ चौरस मैलाचा असून शहरी भाग ६० चौरस मैलाचा आहे. खेडयांची संख्या १,५६७ असून शहरें १७ आहेत. शहरी व ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण १९६१ च्या शिरगणतीप्रमाणे २६ : ७४ असे आहे.

## १९५१ च्या शिरगणतीप्रमाणें ग्रामीण भागांतील लोकसंख्येची विभागणी

| | मेळघाट (१) | अमरावती (२) | चांदूर (३) | मोर्शी (४) | दर्यापूर (५) | अचलपूर (६) | एकूण (७) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेली खेडीं. | २६९ | २५५ | १२७ | १४७ | १६७ | १६४ | १,१२९<br>२१९,८७९ |
| १०० हून कमी लोकसंख्या असलेली खेडीं. | ११ | ७३ | ६८ | ५२ | ४६ | ४३ | २९३<br>२१२,७४४ |
| १,००० हून जास्त व २,००० हून कमी. | ... | १६ | २९ | १९ | २३ | १५ | १०२<br>१४२,७०० |
| | | | | | | | १,५२४<br>५७५,३२३ |
| २,००० हून जास्त व ५,००० हून कमी. | ... | ७ | ११ | ७ | ४ | ८ | ३७ |
| ५,००० हून जास्त व १०,००० हून कमी. | ... | २ | ३ | ४ | ... | ४ | १३ |
| १० हजार ते २० हजार ... | ... | १ | १ | २ | २ | १ | ७ |
| २० हजार ते ५० हजार ... | ... | १ | ... | ... | ... | १ | २ |
| ५० हजार ते १ लक्ष ... | ... | १ | ... | ... | ... | ... | १ |
| एकूण बेरीज ... | २८० | ३५६ | २३९ | २३१ | २४२ | [illegible] | |

यावरून असे दिसून येईल की, अमरावती शहर व कॅम्प, बडनेरा, अचलपूर व परतवाडा ही ५ शहरें व त्यांची लोकसंख्या २७४,८५६ सोडली तर जिल्ह्याचा इतर भाग हा सर्व खेड्यांचाच असून तेथील लोकांचे जीवन हे बहुतांशी शेतीवर अवलंबून आहे.

# अमरावती जिल्हा
## नद्या व पर्वत



जिल्ह्याची भूरचना दोन भिन्न स्वरूपाची आहे. पांयन घाटच्या खोऱ्यांत पसरलेली सरळ सपाटी ह्या एक प्रकार. हा भाग जवळ जवळ आकाराने चौकोनी आहे. पूर्वेकडचा मोर्शी तालुक्याचा एक लांब फाटा त्याला फुटलेला आहे. दुसरा भाग म्हणजे डोंगरांची मालिकाच आहे.

**भूरचना**

वऱ्हाडच्या उत्तर सीमेवरून हा भाग पसरलेला आहे. हा भाग सातपुडा पर्वताचा असून याला मेळघाट म्हणून ओळखतात. मेळघाट तालुक्यांत या पर्वताची उंची साधारण ३,४०० फूट असून सर्वांत उंच पठार बैराट हे आहे. त्याची उंची ३,८६६ फूट आहे. चिखलदरा व गाविलगड हीं पठारें त्यापेक्षां थोडी कमी उंचीची आहेत. हा भाग डोंगराळ असून सर्वत्र जंगल आहे.

याशिवाय टेकडयांचा खडकाळ भाग म्हणजे अमरावतीच्या जवळपास सुरू होऊन पूर्वेच्या दिशेने पसरत चांदूर रेल्वेच्या पलीकडे गेलेली टेकडयांची रांग होय. याची उंची आजुबाजूच्या सपाटीपेक्षा २०० ते ३०० फुटांच्या पेक्षा अधिक नाही. या जिल्ह्यांतील अमरावती व दर्यापूर या तालुक्यांतील जवळ जवळ निम्मे भाग खाऱ्या पाण्याचे आहेत.

डोंगराळ भागाचे अपवाद वगळता जिल्ह्यांतील जमीन अत्यंत सुपीक, काळी, कसदार व सपाट आहे. वर्धा व पूर्णा नद्यांच्या काठचा भाग सर्वांत जास्त सुपीक व संपन्न आहे.

**जमीन**

पश्चिमेकडील पूर्णा नदी व पूर्वेकडील वर्धा नदी, त्यांना मिळणाऱ्या विविध नदीनाल्यांमुळे या भागांतील पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनींत कापूस व ज्वारी ही पीकें भरघोस वाढण्यास मदत होत असते. काळ्या जमिनीवरील मातीचा थर, पातळ थरापासून खोल थरापर्यंत आढळतो. पूर्णा नदीच्या कांठची या जिल्ह्यातील जमीन अत्यंत समृद्ध आहे. "अव्वल काळी" या नांवाने या भागांतील लोक तिला ओळखतात. तिचा मगदूर चांगला असून ओलावा टिकून धरण्याची तिची शक्ति अप्रतिम आहे. ही जमीन व तिचे मोठाले पट्टे दर्यापूर तालुक्याच्या उत्तर भागांत, अमरावती तालुक्याच्या ईशान्य भागांत, चांदूर तहसिलीच्या पूर्व भागांत व अचलपूर शहराच्या आसपास आहेत. जिल्ह्याची भूस्तर रचना डेक्कन ट्रॅप स्वरूपाची आहे.

**नद्या**

पूर्णा ही या जिल्ह्यांतील सर्वांत मोठी नदी होय. याशिवाय चंद्रभागा, सिपना, पेढी या नद्या आहेत. चुडामन, बेल, माडु हे छोटया नद्यांचे प्रवाह मोर्शी तालुक्यांतून कांही मैल वाहत वर्धा नदीकडे जातात. उत्तर मेळघाट बाजूने तापी वाहते. या जिल्ह्याची तीस मैलाची हद्द तापीच्या प्रवाहाने व्यापली आहे. पूर्वेच्या सरहद्दीवरून वर्धा नदी वाहते. दर्यापूर तालुक्यांत शहानूर व बोर्डी या लहान नद्या आहेत.

**पाऊस व हवामान**

जिल्ह्यांतील पावसाचे सरासरी प्रमाण ३५ ते ४० इंचाचे आहे. सपाटी भागांत सरासरी २५ इंच पाऊस वेळेवर झाला तर सर्वसाधारण चांगलें पीक येते. हिवाळा नोव्हेंबर ते फेब्रुवारीपर्यंत असतो. हिवाळ्यांत अधून मधून पावसाच्या छोटया सरी पडत असतात. हिवाळ्यात पुष्कळदा रात्रीला उष्णतामान ५० फॅरनहीट अंशापर्यंत खाली उतरत असते. कमीतकमी उष्णतामान चिखलदरा येथे ४६.९ फॅरनहीट असते.

**पिकें**

जिल्ह्यातील प्रमुख पिकें कपाशी, ज्वारी, भुईमूग, गहूं, तुरी, हरभरा ही आहेत, मिरची, भाजीपाला, संत्रा, लिंबू, केळी ही बागायती पिकें आहेत.

**जंगलें**

या जिल्ह्यांत जंगलांनी व्यापलेली जमीन १,४२८ चौरस मैल असून जिल्ह्यांत जंगलाखाली असलेल्या जमीनीचें प्रमाण ३०.४४ टक्के आहे.

उन्हाळ्याचा काळ मार्च ते जूनच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत राहतो. यानंतर पावसाळा सुरू होतो. मार्चमध्ये उष्णतामान झपाट्याने वर चढत असते. उन्हाळा मे मध्ये व जूनच्या सुरुवातीस सर्वांत प्रखर असतो. त्यावेळीं उष्णतामान ११०/११२ पर्यंत असते. मे महिन्यांत उष्णतेची कमीतकमी सरासरी १०७.७ पडते. उष्णतेचा उच्चांक अमरावतीचा आहे. येथे उष्णतामान ११५.५ पर्यंत असते.


जिल्ह्यातील खालील गांवाची समुद्रसपाटीपासून उंची पुढीलप्रमाणे आहे :—

अमरावती शहर १,११८', अमरावती कॅम्प १,१९३', अचलपूर १,२९७', दर्यापूर ९२८' मोर्शी १,१५१', चांदुर रेल्वे १,०८३', चिखलदरा ३,६६४'.

**थंड हवेचें ठिकाण**

चिखलदरा हे ३,६०० फूट उंचीवर असलेले मेळघाट पठारावरील थंड हवेचे ठिकाण असून येथील हवा कोरडी, थंड व उत्साहवर्धक आहे. महाराष्ट्र सरकारने मध्यम वर्गीयांसाठीं या ठिकाणीं सुट्टीची निवासस्थाने (हॉलीडे कॅम्प) बांधली असून ती अल्पावधितच अत्यंत लोकप्रिय झाली आहेत. या संबंधीची सविस्तर माहिती जिल्ह्यांतील "गौरवस्थानें" या प्रकरणांत स्वतंत्ररीत्या दिलेली आहे.

# अमरावती जिल्हा
## जमीन



# ३. शेती व ओलीत

**शेती व पिकें.**—जिल्ह्याच्या लोकसंख्येपैकीं ७२ टक्क्याचें वर लोक शेतीवर अवलंबून आहेत.

| शेंकडा प्रमाण (१) | तपशील (२) | संख्या (३) |
|---|---|---|
| ... | जिल्ह्याची एकूण लोक संख्या ... ... ... .. | १,०२१,१६७ |
| २६ | जमीन धारण करणारे व त्यांच्यावर अवलंबून असणारांची संख्या .. | २६८,९७८ |
| ८.३ | स्वत:ची जमीन नसलेले व दुसऱ्याची जमीन कसणारे ... .. | ८५,६३३ |
| ३६ | शेतमजूर व त्यांचेवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या ... .. | ३७१,४४० |
| २ | स्वत: जमीन न कसणारे व त्यांचे अवलंबित ... .. | ११,४०२ |
| ७२.३ | शेतीचे धंद्यांत गुंतलेल्या व त्यांचेवर अवलंबून असणारांची संख्या | ७४७,४५३ |


१९५१ च्या शिरगणतीच्या अुपलब्ध माहितीवरून जिल्ह्यांतील प्रत्येक ६ पैकी ५ लोक शेतीवर अवलंबून आहेत.

**ग्रामीण भागांतील लोकसंख्या व शेतीच्या धंद्यांत गुंतलेल्या लोकसंख्येचा तपशील**

| ग्रामीण भागाचें क्षेत्र (१) | एकूण ग्रामीण भागांतील लोकसंख्या (२) | शेतीवर अवलंबून असलेली लोकसंख्या (३) |
|---|---|---|
| मेळघाट तहसील ... ... | ५१,३७७ | ४४,७७० |
| अमरावती तहसील ... ... | १९१,३४६ | १६६,९२० |
| चांदूर रेल्वे तहसील ... ... | १५९,४३१ | १३८,३२४ |
| मोर्शी तहसील ... ... | १२८,९८४ | ११०,४५८ |
| दर्यापूर तहसील ... ... | ११५,०१५ | १०४,३९० |
| अचलपूर तहसील ... ... | १०२,०६८ | ९१,४५२ |

ग्रामीण भागांतील ७४८,२२१ लोकसंख्येपैकी ६५६,३१४ व शहरांतील २८२,९३९ लोकसंख्येपैकी ९१,१३९ लोक, असे एकूण ७४७,४५३ लोक शेतीवर अवलंबून आहेत.

# अमरावती जिल्हा
## पाऊस व पिके



तालुक्याचें एकूण क्षेत्रफळ व लागवडीखाली आलेलें क्षेत्रफळ पुढीलप्रमाणें आहे:—

| तहसिलीचें नांव (१) | | एकूण क्षेत्रफळ (२) | लागवडीखालील क्षेत्र (३) | प्रमाण (४) |
|---|---|---|---|---|
| | | एकर | एकर | |
| अमरावती | ... | ५४५,३३९ | ४२२,३९१ | ७७.४ |
| चांदूर रेल्वे | ... | ४४३,८५९ | ३४५,२६० | ७३.३ |
| मोर्शी | ... | ३९८,८५९ | २७९,६६९ | ७०.० |
| अचलपूर | ... | ३१५,२८७ | २४९,४१२ | ७९.० |
| दर्यापूर | ... | ३२४,१३७ | २८३,८१७ | ८७.५ |
| मेळघाट | ... | ९६६,३५९ | ६४,७६३ | ६.५ |
| | ... | ३,०१२,८१४ | १,६२४,३३० | ५२.८ |

बिगर शेतकी लोकसंख्येचा तपशील पुढीलप्रमाणें आहे:—

बिगर शेतकी लोकसंख्या: २८३,७०७ म्हणजे २७.७ टक्के.

| | | | एकूण त्यांपैकी | शहरी भागांत |
|---|---|---|---|---|
| उत्पादन करणारे | ... | ... | ९३,७३३ | ... |
| व्यापार | ... | ... | ६८,८१४ | ५५,८१७ |
| वाहतूक | ... | ... | १५,७६७ | ५३,८७९ |
| इतर किरकोळ | ... | ... | १०५,३९३ | १४,०५६ |
| नोकरी वगैरे | ... | ... | ... | ६८,०४८ |
| एकूण | | ... | २८३,७०७ | १९१,८०० |

पिकांची वर्गवारी साधारणपणें अशी आहे:—

| | | एकर |
|---|---|---|
| ज्वारी | ... | ४४८,९३० |
| धान | ... | ३,९६५ |
| गहू | ... | ८६,२७१ |
| कडधान्ये | ... | १२०,८५३ |

धान्याखालील क्षेत्रफळ: ६६०,०१९

| | | एकर |
|---|---|---|
| कपाशी | ... | ८३६,४५८ |
| भुईमुग | ... | ५७,००० |
| तीळ | ... | ८,२०० |
| जवस | ... | ९,५०० |

फळे, भाजीपाला

| | | |
|---|---|---|
| फळे | ... | ८,७०० |
| भाजीपाला | ... | ४,६०० |
| मिरची | ... | १५,११४ |
| तंबाखू | ... | ४८७ |
| ऊंस | ... | १३० |
| पानमळे | ... | २८० |

---

## ओलिताखालील क्षेत्र

१९४७ साली या जिल्ह्यांतील फक्त १० हजार एकर जमीन ओलिताखाली होती. स्वातंत्र्योत्तर कालांत हा आँकडा १५ हजार एकरांवर आला आहे. म्हणजे ओलिताचें क्षेत्र आतां सुमारे पन्नास टक्क्यांनी वाढलेलें आहे.

पेढी व पूर्णा या नद्यांच्या मधला प्रदेश खाऱ्या पाण्याचा पट्टा म्हणून ओळखला जातो. या पट्ट्यांतील खाऱ्या पाण्यामुळे बागायती करणे या भागांत अशक्य झाले आहे. पिण्याचे गोड पाणी मिळणेसुद्धा या भागांत कठीण जाते. पिण्याचे गोड पाण्याची योजना लवकरच हाती घेण्यांत येत आहे. पूर्णा, चंद्रभागा व शहानूर नद्यावर जल-संचय केंद्रें उभारून पाईपने खेड्यांत पाणीपुरवठा करण्याची सोय या योजनेनुसार होईल.

जिल्ह्यांत १७,०७९ विहिरी असून त्यापैकी १२,३७८ विहिरींचा ओलितासाठी उपयोग होतो व त्यामुळे १५,९३९ एकर जमीन ओलिताखाली येते.

**पाटबंधारे**

अमरावती जिल्ह्यांत बाराहि महिने भरपूर पाणी असणाऱ्या अशा नद्या फार नसल्यामुळे पाटबंधाऱ्याच्या योजना कार्यास त्या मानाने फार थोडा वाव आहे. तथापि उपलब्ध साधनांचा जास्तीतजास्त उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने मेजर इरिगेशन इन्व्हेस्टिगेशन डिव्हीजनचे कार्यालय अमरावती येथे नुकतेच उघडले असून त्यामार्फत पाटबंधारे योजनांच्या शक्यतेबाबतच्या प्राथमिक पहाणीचे काम सुरू झाले आहे.

अमरावती जिल्ह्यांत पाटबंधाऱ्याच्या खालील योजना चालू आहेत:—

| | योजना | तहसील | पाण्याखाली येणारी जमीन—अंदाजे |
|---|---|---|---|
| | | | एकर |
| (१) | पाकनाला प्रकल्प ... ... | मोर्शी तहसील | ९०० |
| (२) | पाटनाला प्रकल्प ... ... | ... | ३५० |
| (३) | दमयंतीनाला प्रकल्प ... ... | ... | १०० |
| (४) | जातमझरीनाला प्रकल्प ... ... | ... | १२५ |
| (५) | दाभेरी तळे प्रकल्प ... ... | ... | ३५० |
| (६) | पखालनाला प्रकल्प ... ... | अचलपूर | ३७५ |
| (७) | कुऱ्हा तलाव ... ... ... | चांदूर | १०० |

**कृषिविषयक वैशिष्ठ्यें**

सुधारलेल्या जातीच्या व त्याच भागांत तयार झालेले उत्कृष्ट बी-बियाण्यांचा पुरवठा करण्याचे दृष्टीने अमरावती जिल्ह्यांत १० सरकारी बीज केंद्रें व तीन विद्यामंदिरें स्थापन झाली आहेत. जातिवंत बी-बियाणांचा पुरवठा हीं केंद्रे करतीलच पण "आदर्श शेती केंद्रें" म्हणून कास्तकारांना या बीज उत्पादन केंद्रापासून मार्गदर्शनहि मिळू शकेल.

या जिल्ह्यांत ओलिताखालील जमिनीचे क्षेत्र फारच कमी असल्यामुळे पावसाळ्यांत पडणाऱ्या पावसाचे पाणी जमिनीत जास्तीत जास्त मुरल्यासच उत्तम पिके येऊ शकतात. त्या दृष्टीने बांध घालण्याच्या योजनेचें महत्त्व या जिल्ह्यांत फार आहे. त्याकरितां या जिल्ह्यासाठी एक स्वतंत्र अुपविभाग असून तिचे मार्फत सुमारे २३,००० एकरांवर आतांपर्यंत बांध घालण्यांत आले आहेत.

या जिल्ह्याच्या लागवडीखालील क्षेत्रांपैकी सुमारे ५२ टक्के जमीन कपाशीखाली आहे. या पिकापासून सर्वसाधारणपणे शेतकऱ्यांना ८ ते १० कोटी रुपये मिळतात. म्हणून या पिकास "वऱ्हाडचे पांढरे सोने" म्हटले जाते. कपाशीच्या निरनिराळ्या जातींचें संशोधन करून चांगल्या जाती शोधून काढण्यासाठी अचलपूर येथे कपाशी संशोधन केंद्र आहे. सध्या खानदेशची "विरनार उर्फ १९७.३ व बुरी १४७" ह्या जाती या भागासाठी लोकप्रिय ठरल्या आहेत.

मोर्शी तालुक्यांत वरुड व शेंदुरजनाघाट येथे बागायतीचे क्षेत्र फारच वाढले असून या भागांत सुमारे ९ ते १० हजार एकर क्षेत्र बागायतीखाली आहे. विहिरीवर विजेचे पंप चालू आहेत. यामुळे या विहिरीचा पाणी पुरवठा नेहमी कायम कसा ठेवतां येईल या दृष्टीने तज्ञांचे विचार चालू आहेत. प्रामुख्याने, या भागांत संत्र्याचे व केळीचे बगीचे आहेत. अमरावती जिल्ह्याचा कॅलिफोर्निया (बागबगिच्याचा प्रदेश) असे या भागाचे वर्णन केले जाते. संत्र्यास वर्षातून दोनदां बहार येतो—आंबीया व मृग बहार. साधारणपणे एक ते दीड कोटी रुपयांचे उत्पन्न या भागास संत्र्यापासून होते. शेंदुरजनाघाट येथें संत्र्याचा व लिंबाचा रस व शरबत तयार करण्याचा कारखाना सहकारी पद्धतीवर सुरू करण्यांत आला असून, तेथें तयार होणारा माल या भागांत बराच लोकप्रिय आहे.

नुसत्या संत्र्याचे बाबतीतच अमरावती जिल्हा पुढे नाही, तर उत्कृष्ट तऱ्हेची द्राक्षे सुद्धा अमरावतीत मिळू शकतात हें श्री. मेंडसे बंधू यांनी आपल्या अमरावतीजवळच असलेल्या बागेत सिद्ध करून दाखविले आहे. एक एकराच्या द्राक्षाच्या बागेत त्यांनी १० ते १२ हजाराचे उत्पन्न घेतलेले आहे. धामणगांव येथेंहि द्राक्षांची बागायत आहे.

**उत्कृष्ट कॉफी**

चिखलदरा येथे होणारी कॉफी, सर्वोत्कृष्ट कॉफीपैकी एक ठरली असून कॉफीची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्याचे सरकारने ठरविले आहे. त्यासाठी चिखलदरा येथे कॉफी संशोधन उपकेंद्र उघडण्यांत आले आहे.

अमरावती जिल्ह्यांत मिरचीचे क्षेत्र पंधरा हजार एकराचे वर असून अचलपूर, परतवाडा व पथ्रोट या भागांतील मिरची प्रसिद्ध आहे. मुंबई व मद्रास भागांत या मिरचीस फार मागणी असून त्या भागाला ती पाठविली जाते. मिरचीं व तंबाखूच्या पिकांच्या संशोधनासाठी परतवाडा सरकारी फार्मवर "संशोधन केंद्र" स्थापन करण्यांत आले आहे.

भारत सरकारचे प्रादेशिक संशोधन केंद्र अमरावती येथे उघडण्यांत आले असून तेथे ज्वारी, भुईमूग व कपाशी या पिकांवर संशोधन होईल.

विड्याचीं पानें व हळद या पिकांवरील संशोधनासाठी एक संशोधन केंद्र अमरावती जिल्ह्यांत लवकरच उघडले जाणार आहे. दर्यापूर तालुक्यांत अंजनगांव सुर्जी व अमरावती तालुक्यांत अंजनगांव बारी हीं गांवें विड्याच्या पानांच्या लागवडीसाठी प्रसिद्ध आहेत.

भारत सरकारचे पीक संरक्षण केंद्र अमरावतीत असून या केंद्राद्वारे शेतकऱ्यांना आपल्या पिकांचे रोगराई व किटाणूपासून संरक्षण कसे करावे, याबाबत मार्गदर्शन केले जाते. सुधारलेली अवजारें, डस्टर्स, स्प्रेअर्स, वगैरेहि पुरविण्यात येतात.

भारत कृषक समाजाचे अमरावती हे महत्त्वाचे केंद्र असून शेतकऱ्यांच्या हितसंबंधासाठी व हक्कासाठी ते नेहमी जागरुक असते. भारत कृषक समाजामुळे जिल्ह्यांतील शेतकरीवर्ग संघटित होत असून नव्या आशा-आकांक्षाने, आपले व पर्यायाने राष्ट्राचे उत्पन्न वाढविण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहे. उत्कृष्ट कार्याबद्दल अमरावती जिल्हा भारत कृषक समाजाला एक हजार रुपयांचे बक्षीस मिळालेले आहे.

**शेती सुधारणा**

शेतीची सुधारलेली पद्धत शेतकऱ्यांनी स्वीकारून शेतीचे उत्पादन वाढवावे, यासाठी शेतीच्या सुधारलेल्या पद्धतीची प्रात्यक्षिके कृषि खात्यामार्फत केली जातात. उदा. सुधारलेली बी-बियाणे, रासायनिक खते, इत्यादि. जिल्ह्यांत एकूण ११० प्रात्यक्षिक केंद्रे आहेत. शेतीच्या वेगवेगळ्या कामासाठी शेतकऱ्यांना विकास खंडामार्फत मदत असते.

खरीप व रबी पिकांखाली सुधारलेल्या शेती पद्धतीने शेती व्हावी, म्हणून मोहिमा घेण्यांत येऊन लक्ष्ये निश्चित केली जातात. १९६०-६१ मध्ये निर्धारित करण्यांत आलेली सर्व लक्ष्ये पूर्ण करण्यांत आली.

**पीक स्पर्धा**

उत्कृष्ट पीक काढणाऱ्या शेतकऱ्याला बक्षीसें देण्यांत येतात. या पीकस्पर्धेत १९६०-६१ सालीं ग्रामीण पातळीवर ३९८, विकास खंड पातळीवर १४४, जिल्हा पातळीवर २० व राज्य पातळीवरील स्पर्धेत ३ स्पर्धकांनी भाग घेतला होता. ज्वारीच्या स्पर्धेत श्री. प्रयागदासजी पनपालिया यांना राज्यातील पहिले बक्षिस मिळाले आहे.

पीक उत्पादनांतील वाढीबरोबरच पीकाचा दर्जा सुधारण्याचाहि प्रयत्न केला जातो. शेतकऱ्यांना उत्कृष्ट बी-बियाणे पुरवून शेतीमालाचा दर्जा सुधारता येतो. १९६०-६१ मध्यें २०,००० मणाचे वर कपाशीचे, ५,५६२ मण भुईमूगाचे सुधारलेली बीयाणें वाटण्यांत आली.

खतें वापरल्याने पीक उत्पादनांत वाढ होते व म्हणूनच शेतकऱ्यांत खतांचा वापर वाढत आहे. १९६०-६१ मध्ये ८,००० टन रासायनिक खत वाटण्यांत आले.

पिकांवर कीड पडू नये म्हणून पिकाची जोपासना व किड्यांपासून बचाव करण्यासाठी कीटकनाशकेंहि विकास आणि कृषि विभागामार्फत वाटण्यांत येतात. १९६०-६१ साली ११० टन गंधक, ८ टन अॅग्रोसन, २८ गॅलन एल्ड्रीम व ४,८०० पौंड इतर कीटकनाशकें वाटण्यांत आलीं. खाजगीरित्याहि शेतकरी कीटकनाशकें वापरण्याचा प्रयत्न करीत असतात.

सुमारे ९,००० एकर जमीन संत्रा-लिंबू आदि बागाईताखाली आहे. दरवर्षी साधारणतः संत्र्यांच्या कीडेपासून बचावासाठी सायट्रस सिला निर्मूलन मोहीम घेण्यांत येते.

देशी कापसावरील दहृचा रोगापासून कापसाचे पिकांचा बचाव करण्यासाठीहि मोहीमा घेण्यांत येतात. दरवर्षी १२-१३ हजार एकर जमिनीवरील कपाशीचा दहृचापासून बचाव करण्यांत येतो.

**भू-संरक्षण**

जमिनीच्या चढ-उतारामुळे पावसाचे पाणी वाहून जाते. त्या पाण्याबरोबरच जमिनींची धूप वाहून जाते. ही धूप वाहून गेल्यामुळे जमीनींचा कसहि कमी होतो. हे नुकसान होऊ नये म्हणून बांध घालण्याची योजना हातीं घेण्यांत आलेली आहे. गेल्या तीन वर्षांत अमरावती जिल्ह्यांतील ३१,३५६ एकर जमिनीला बांध घालण्यांत आले.

विहीर बांधणीसाठी, शेतकऱ्यांना तकावी देण्यांत येते. ही तकावी फक्त विहीर बांधणीसाठीच नव्हे तर विहीर दुरुस्ती, तेल आणि वीज-एंजीन पुरवठा करण्यासाठी देण्यांत येते. १९५८-५९ सालीं ५१० विहीरी बांधणीसाठी व ३७८ विहीरींच्या दुरुस्तीसाठी ५,८९,९२५ रुपयांची तकावी देण्यांत आली. १९५९-६० मध्यें २३० नवीन विहीरी व २३३ विहीरींच्या दुरुस्तीसाठी ४,५६,२७५ रुपये व १९६०-६१ सालीं ४७४ नवीन विहीरी व २२० जुन्या विहीरींच्या दुरुस्तीसाठी ४,४५,८७० रुपये तकावीच्या रूपाने कर्ज देण्यांत आले. याबरोबरच १९५८-५९ सालीं १५ तेल एंजीन व १६४ वीज-पंपासाठीं २,१०,७०० रुपये, १९५९-६० सालीं ५० तेल एंजीन व ८० वीज-पंपांसाठीं २,८२,९०० रुपये व १९६०-६१ सालीं १०९ तेल एंजीन व वीज-पंपासाठीं ३,९९,९५० रुपये तकावी म्हणून शेतकऱ्यांना देण्यांत आले.

**बीज उत्पादन केंद्र**

शेतकऱ्यांना उत्तम बी-बियाणें मिळावे म्हणून शेतकी खात्याने कांही बीज-उत्पादन केंद्रें जिल्ह्यांत सुरु केली आहेत. या केंद्रांत उत्तम प्रतीच्या बी-बियाणांची लागवड करून, शेतकऱ्यांना ते स्वस्त किंमतींत विकण्यांत येतें. वलगांव येथील बीज-उत्पादन केंद्रांत कापूस, ज्वारी, भुईमूग व तुरीचे बी तयार करतात तर धानोरा, चांदूर रेल्वे, तिवसा, अचलपूर, चांदूर बाजार, अंजनगांव, कुसुमकोट, येरला व उमरखेड येथील केंद्रांत मूग, सन व गव्हाचे बीज उत्पादन करतात. याशिवाय विद्यामंदीर योजनेन्तर्गत थिलोरी, वडगांव व सातेफळ येथेंहि शेती शिक्षणासाठी कांही जागा राखून ठेवण्यांत आली आहे. सुधारलेले बी-बियाणें ठेवण्यासाठीं प्रत्येक विकास खंडात एक याप्रमाणें जिल्ह्यांत १३ गोदामें बांधण्यात येणार आहेत. अंजनगांव, वरुड व मोर्शी येथे गोदामे पूर्ण झाली असून, अचलपूर, धारणी व चांदूर रेल्वे येथील गोदामाचे बांधकाम सुरू आहे.

# ४. पशुधन व पशुसंगोपन

अमरावतीसारख्या कृषिप्रधान जिल्ह्यांत व विशेषतः जेथे शेतजमिनीचे प्रमाण माणसी सुमारे दीड एकर पडते, अशा ठिकाणीं पशुधनास फार महत्त्वाचें स्थान आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेंत पशुधनाची सुधारणा ही विकासाची एक महत्त्वाची बाब झाली आहे. गुरांमध्ये सर्वसाधारणपणे प्रसारांत असलेल्या रोगांचे निर्मूलन, पशुवैद्यकाची सोय व स्थानिक गुरांच्या जातीची सुधारणा, तसेंच कुक्कुटपालनाच्या व्यवसायाचा विकास, ह्या सर्व महत्त्वाच्या कामासाठी या जिल्ह्यांत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी नेमण्यांत आले आहेत.

**पशुधन** १९५७-५८ च्या खानेसुमारीनुसार जिल्ह्यांत एकूण ५५१,१३१ गुरें आहेत. त्यांपैकीं पैदासीचे वळू ७,६५४; शेतीचे बैल (तीन वर्षावरचे) १७०,०७१ ; गाई (दुभत्या) १२३,००४ ; गाई (भाकड) ३१,४९६ व ३ वर्षाच्या आंतील वासरें १४३,८६९ असे एकूण ४७६,०९४ गाई-बैल आहेत. पैदासीचे हेले (रेडे) ४,९०४ ; हेले (तीन वर्षावरील) ४,४४० ; दुभत्या म्हशी ३२,८३७ ; भाकड म्हशी (तीन वर्षावरील) ५,९०३ ; ३ वर्षाच्या आंतल्या पारड्या २६,९५३ असे एकूण ७५,०३७ म्हशी व रेडे आहेत.

गाई, बैल, म्हशी, हेले, वासरें, पारड्या वगैरे ५५१,१३१ ; शेळ्या व मेंढ्या एकूण १३५,३०८; घोडे, खेचरें व गाढव वगैरे ९,६८९ ; हत्ती ७.

मेळघाट जंगलांत वाघ, चित्ते, अस्वलेहि आहेत. परंतु त्यांची खानेसुमारी करणें शक्य झालेले नाहीं. अशा रीतीने पशुधनाची सर्व मिळून संख्या (६९६,२३५). सुमारे सात लक्षांचे जवळपास आहे.

**पशुवैद्यकाच्या सोई** हल्लीं जिल्ह्यांत पूर्णावस्थेंत खालील १३ गुरांचे दवाखाने आहेत. त्यावर पदवीधर पशुवैद्यक डॉक्टर्स देखरेख करीत असतात.

(१) अमरावती शहर, (२) अमरावती कॅम्प, (३) चांदूर बाजार, (४) अचलपूर (शहर), (५) दर्यापूर, (६) अंजनगांव सुर्जी, (७) चांदूर रेल्वे, (८) तिवसा, (९) धारणी, (१०) चिखलदरा, (११) मोर्शी, (१२) सोलापूर, (१३) वरुड.

याशिवाय प्रशिक्षित कंपौंडर व स्टॉकमन यांच्या नियंत्रणाखाली खालील १३ पूरक दवाखाने आहेत:—

(१) बडनेरा, (२) नांदगांव, (३) धाटलाडकी, (४) आसेगांव पूर्णा, (५) शिंदी बु., (६) तळेवेल, (७) करजगांव, (८) चिचोली, (९) येवदा, (१०) धामणगांव, (११) तळेगांव-दशसहस्त्र, (१२) राजुरा, (१३) शिरखेड.

सरकार व जनपद यांनी निम्मा निम्मा खर्च करावयाचा अशा पद्धतीने पुढील ठिकाणीं आठ दवाखाने आहेत:—

(१) नया आकोला, (२) वडनेर गंगाई, (३) आराळा, (४) काकडा, (५) राजुरा, (६) घातक, (७) सादरावाडी, व (८) चांदूर.

याशिवाय यावली, जयपूर येथें ग्रुप व्हिलेज सेंटरचे दवाखाने व शिरसगांव कसबा येथे एक दवाखाना आहे.

पूर्वीच्या मध्यप्रदेशाच्या नियमाप्रमाणें —

(१) वडगांव, (२) मोझरी, (३) अंजनगांव सूर्जी, (४) वरहा, (५) नेरपिंगळाई, (६) केकोरा—हे सहा केंद्र ग्राम दवाखाने (की व्हिलेज सेंटर्स) आहेत.

याप्रमाणे जिल्ह्यांत सध्यां गुरांचे एकूण ४३ दवाखाने आहेत.

धारणी विकास खंडांत तळवार व चाकर्दा येथें दवाखाने मंजूर झाले असून ते लवकरच सुरू होतील.

पशुधन सुधारणा कार्यक्रमांतील महत्वाची योजना म्हणजे व्हिलेज स्कीम (केंद्र ग्राम योजना).

**पशुधन सुधारणा**

या योजनेनुसार कमकुवत नरांचे निर्मूलन, कृत्रिम गर्भधारणा पद्धतीने गुरांच्या निपजीवर नियंत्रण, अनुदान देऊन वासरांचे संगोपन, वैरणीत वाढ करणें वगैरे गोष्टींचा यांत समावेश होतो.

गुरांच्या निपजीसाठीं कृत्रिम गर्भधारणेची पद्धत विशेषतः दुभत्या जनावरांच्या निपजीच्या दृष्टीने फायदेशीर ठरली आहे. त्यामुळें पशुधनाची सुधारणा करण्यास मदत झाली आहे. अमरावती येथें

**कृत्रिम गर्भधारणा**

एक कृत्रिम रेतन केंद्र असून येथून (१) नांदगांव पेठ, (२) ऱ्हाटगांव, (३) वलगांव, (४) बडनेरा, (५) चोर माहुली, (६) लोणी या गांवी रेतन पाठविले जाते, तसेच वरुड येथे एक कृत्रिम रेतन केंद्र असून मोर्शी येथें रेतन पाठविण्यांत येते.

कृत्रिम गर्भधारणाबाबतचे काम स्टॉकमन करतात व केलेल्या कामाची आणि निपज झालेल्या वासरांची योग्य नोंद ठेवतात.

पोहरा येथें जातिवंत जनावरांच्या पैदाशीसाठीं पशु-प्रजनन केंद्र सुरू होत आहे. अशाच

**पोहरा केंद्र**

तऱ्हेचे आणखी एक केंद्र मेळघाट तहसिलीत बीड येथेहि सुरू होत आहे. हरियाना या जातीच्या जनावरांची निपज या केंद्रातून करण्यांत येईल. या जिल्हयांत गाईंची संख्या बरीच असली तरी जातिवंत जनावरांची, विशेषत बैलांची निपज करून देण्याचा प्रयत्न करणें हे या केंद्राचे महत्त्वाचे काम आहे.

पोहरा येथें एक मेंढ्या-प्रजनन केंद्र उघडले असून तेथे सुमारे १०० पाटणवाडी जातींच्या मेंढ्या आणल्या आहेत. ५०० एकर जागाहि या केंद्रासाठीं घेण्यांत आली आहे. अमरावती व

**मेंढी-प्रजनन—**

चांदूर विकास खंडांमध्ये ५० मेंढ्या सवलतीच्या योजनेप्रमाणें दिल्या आहेत.

गुरांमध्यें सर्वसाधारणपणें आढळणारा व गुरांस अधिक प्राणघातक असा रोग म्हणजे रिंडरपेस्ट (बुळकुंडी किंवा माता) होय. आपल्या देशांतील सुमारे ६० टक्के पशुधनाच्या मृत्यूचे कारण हा रोग आहे.

**प्रतिबंधक उपाययोजना,**

सेंट्रल रिंडरपेस्ट समितीच्या सहकार्यानें यासाठी एक रोग निर्मूलन योजना आखण्यांत आली असून, या जिल्हयांतील एकूण ५५१,१३१ जनावरांपैकीं ३६३,८०८ जनावरांना प्रतिबंधक लस टोचण्यांत आली आहे. हे प्रमाण शेंकडा ६८.०० पडते. या औषधाचा प्रभाव सुमारे चौदा वर्षे टिकतो. म्हणजे एवढे पशुधन आता या रोगांपासून कायमचे रोगमुक्त झाले.

या जिल्हयांतील सुमारे साठ टक्के जमीन कपाशी व गळिताचें धान्य (भुईमूग, जवस, तीळ वगैरे) रोख पैसा देणाऱ्या पिकाखाली असल्यामुळें जनावरांना भरपूर व पौष्टिक वैरण मिळणे कठीण पडते.

**वैरण विकास योजना**

हंगाम चांगला झाला तरी या कारणामुळें वैरणीची चणचण नेहमीच भासते व पुष्कळ वेळां दुसऱ्या जिल्हयांतून वैरण आणावी लागते. त्यामुळें अर्थात् ती फार महाग पडते. हा प्रश्न सोडविण्यासाठीं वैरण विकास योजना हाती घेण्यांत आली आहे.

ज्वारीचे १०० रत्तल बी मोफत वाटले असून सहा खेड्यांतील सुमारे ४० एकर जमिनीत त्याची लागवड झाली आहे. पद्धतशीर रीतीने योग्य तऱ्हेची वैरणीची शेतांत इतर पिकांप्रमाणें लागवड केल्यास दुसऱ्या कोणत्याहि पिकाइतका फायदा वैरणीचे पीक घेतल्यानेंसुद्धां होऊं शकतो, हे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष दाखवून त्यांना तसे करावयास प्रवृत्त करणें, हा या योजनेचा हेतु आहे. यासाठीं नांदगांव पेठ येथें दहा हजार एकर क्षेत्र निवडण्यांत आले असून तेथे निरनिराळ्या तऱ्हेचे वैरणीचे प्रकार लावले आहेत. ही योजना पांच वर्षांपर्यंत चालणार असून, वैरणतुटीच्या महत्वाच्या प्रश्नाबाबत शेतकऱ्यांना जागृत करण्याचे कार्य योजनेमार्फत होईल, अशी अपेक्षा आहे.

गुरांच्या दवाखान्यांना योग्य स्टॉकमन मिळविण्याच्या दृष्टिने अमरावती येथें एक स्टॉकमन प्रशिक्षण केंद्र चालू करण्यांत आले आहे. मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यांना या संस्थेंत प्रवेश मिळतो. शिक्षणक्रम बारा महिन्यांचा असून त्यासाठीं त्यांचेकडून कांहीहि फी घेतली जात नाही; उलट दरमहा ३० रुपयेप्रमाणें विद्यावेतन दिले जाते व त्यांच्या राहण्यांची मोफत सोय केली जाते. शिक्षणक्रमानंतर कमीतकमी पांच वर्ष सरकारी नोकरी करण्याची लेखी हमी त्यांना द्यावी लागते. या केंद्रांत ५० विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय असून हे केंद्र फार लोकप्रिय झाले आहे.

**प्रशिक्षण केंद्र**

कुक्कुटपालन हा शेतकऱ्यांना एक पूरक धंदा म्हणून फायदेशीर ठरतो. या व्यवसायाचा विकास केल्याने अंडी व कोंबड्या यांच्या उत्पादनांत भर पडणार आहे. अमरावती जवळच तपोवन रस्त्यावर कुक्कुट प्रात्यक्षिक व प्रशिक्षण केंद्रासाठी २३ एकर जागा घेण्यांत आली आहे. या केंद्राचे इमारतीसाठी सुमारे आठ हजार रुपये मंजूर करण्यांत आले असून, इमारतीचे कामांस लवकरच सुरुवात होणार आहे.

**कुक्कुटपालन**

तसेच वरुड व अचलपूर येथे प्राथमिक स्वरूपाचे कुक्कुटपालन केंद्र लवकरच सुरू व्हावयाचे असून, त्यासाठी चार एकर जमीन यापूर्वी घेतली आहे. याठिकाणी १०० जातिवंत व्हाईट लेग हार्न कोंबड्या ठेवण्यांत आल्या आहेत. अशाच तऱ्हेचे केंद्र तिवसा येथेहि लवकरच सुरू होणार आहे.

ग्रामीण भागांत जातिवंत कोंबड्या व त्यांची अंडीं यांचा पुरवठा या केंद्रामार्फत होईल, अशी आशा आहे.

राज्यामध्यें ज्या गोशाळा आहेत त्यांच्या कारभारांत व व्यवस्थेंत सर्वांगीण सुधारणा करण्याच्या योजनेन्वयें अमरावती येथील गोरक्षण संस्थेंत ५ वळूंसाठी अनुदान दिले जाते. तसेच कुऱ्हा येथें या संस्थेने भाकड जनावरांसाठी पांजरपोळ काढला असून तेथे १०५ जनावरांना दर जनावरां मागे वार्षिक १८ रुपयेप्रमाणें मदत दिली जाते. ही संस्था जातिवंत जनावरांची पैदास करणारी नमुनेदार व आदर्श, अशी जिल्हयांतील एकमेव संस्था होय. दर्यापूर येथेहि एक गोशाळा आहे.

**गोशाळा**

अमरावती जिल्हयांतील मेळघाट तहसिलीत उतम प्रतीची दुभती जनावरें आहेत. पण आर्थिक अडचणीमुळें त्यांची योग्य निगा राखणें जनावरांच्या मालकांना शक्य होत नाही. त्यामुळेच पुष्कळदां दुभती जनावरे हे लोक विकतात व उतम पशुधन जिल्हाबाहेर जाते. दुधाचे वितरण आणि विक्री योग्य पद्धतीने झाल्यास गुरांच्या मालकांना आर्थिक मदत होऊन दुभत्या जनावरांची निगा राखणें सोपे जाईल व गुरे विकण्याची पाळी त्यांचेवर येणार नाही. याच हेतूने अमरावती येथें राज्य सरकारतर्फे दुग्ध योजना सुरू करण्यांत आली. अमरावती शहराच्या ४०-४५ मैलांच्या परिसरांतून दूध एकत्र करून ते शास्त्रशुद्ध पद्धतीने निर्जंतुक केले जाते व बंद बाटल्यातून ग्राहकांना पुरविण्यांत येते.

**दुग्ध योजना**

## ५. वन संपदा

अमरावती जिल्हयांत एकूण १,४२८ चौरस मैल जंगल आहे. यांपैकी २५३ चौरस मैलांचे जंगल जिल्हयांतील पांच सपाट तहसीलींत असून १,१७५ चौरस मैलांचे जंगल एकटया मेळघाट तहसिलींत आहे. सातपुडा पर्वताचा दक्षिण भाग, हा गाविलगड टेकडया म्हणून ओळखल्या जातो आणि येथील जंगल मेळघाट फारेस्ट म्हणून ओळखले जाते. हा सर्व भाग डोंगराळ असून समुद्र-सपाटीपासून त्याची उंची १,२०० ते ३,६०० फुटांपर्यंत आहे. या जंगलांत सागवान, तीवस, सालई, धावडा, नालडु, साग, आवळा, तेंदू वगैरे प्रकारचीं झाडे आहेत. रोपागवत व बांबूचेहि उत्पन्न आहे. हे सर्व जंगल मजराकडून काढण्यांत येते. मेळघाट जंगलांत मजुरांची फार कमतरता आहे. १२६ फारेस्ट खेडयांतून मजूर येतात. त्यांना प्रत्येकी सुमारे १६ एकर जमीन, एकरांस १ रुपयाप्रमाणें करण्यांस दिली जाते. तसेच त्यांना त्यांच्या गरजेप्रमाणें लाकूड फाटाव गवतहि मोफत मिळते. त्यांना वर्षभर कामहि देण्यांत येते.

मेळघाट जंगलांत हवा पालट करण्यासाठीं किंवा वनश्रीच्या सहवासांत शांतपणें विश्रांती घेण्याची उत्तम सोय आहे. या भागांत ६५० मैलांचे जंगल भागांतील रस्ते असून १९ जंगल भागांतील विश्राम-गृहें आहेत. या जंगलांत वाघ, चित्ता, हरण, सांबर, अस्वल वगैरेची शिकारसुद्धां मुबलक मिळते. घटांग बोरी, बिहाली, चिखलदरा येथे तलाव बांधले आहेत. तारुबांदा व सेमाडोह येथे बंधारे बांधले आहेत.

जंगलांत नवीं झाडें लावून वनश्रीची वाढ करणे हे महत्त्वाचे काम आहे. या योजनेचा हेतु जंगलाच्या भावी विकासाचा पाया घालून देणे व ज्या जंगलांत पुरेशी लागवड नाही अशा जंगलाच्या सुप्त संपदेत भर घालणें हे आहे. आपल्या जंगलांत साग ही महत्त्वाची जात आहे. इमारत व बांधकामांत

**नवीन लागवड**

या लाकडाचा अधिक उपयोग केला जातो. सुप्रसिद्ध सी. पी. टिक म्हणून उत्कृष्ट इमारती लाकूड ओळखले जाते, ते हेच सागवान होय. ही गोष्ट लक्षांत घेऊन सागाची पद्धतशीर वाढ करण्याची योजना आखली आहे. नवीन लागवड करतांना मजुरांची फार कमतरता भासते. शेतीची लागवड व जंगलाची लागवड ही दोन्हीं कामें एकाच वेळी येतात. तरीपण दर वर्षी १०० चौ. मैल क्षेत्रांत नवीन झाडांची लागवड करण्यांत येते.

दाट जंगल क्षेत्रांत रस्ते नसल्यामुळें झाडे तोडणे, लाकडे जमा करणे, त्याची वाहतुक करणे, या कामासाठी हत्तीचा उपयोग करावा लागतो. जंगल खात्याकडे या कामासाठीं सहा हत्ती ठेवले आहेत.

**हत्तीचा उपयोग**

ते दरवर्षी सुमारे दहा लक्ष रुपये किंमतीची वाहतूक करतात. तथापि कामाच्या सोयीसाठी जंगल भागांत रस्ते तयार करण्यांत येत असून लाकडाच्या वाहतूकी-साठीं दोन मोटार ट्रक्सहि आहेत. शिवाय कांही लांकूडठेकेदारांना वाहतुकीचे ठेके देऊन सोय केली जाते.

खांडवा-हिंगोली हा जो नवीन लोहमार्ग सुरूं झाला आहे, तीं मेळघाट-धुळघाट परिक्षेत्रांतून जातो. सातपुडा पर्वतांत दोन बोगदे व नदीवर पूल बांधण्यांत आला आहे. अमरावती जिल्हयांत

**लोहमार्ग**

सुमारे २४ मैल रेल्वे मार्ग मेळघाट जंगलातून गेला आहे. १९६० डिसेंबर-मध्यें ही रेल्वे चालू झाली असून आकोट टिंबर डेपो उघडण्याची शक्यता आहे.

**यांत्रिकीकरण**

या जंगलांत यंत्राचे सहाय्याने झाडे तोडणे, ती एकत्र करणे, कापणे, इ. कामें केली जात असून मोटारीची वाहतूक सर्वत्र झाल्यावर या जंगलाचे उत्पन्न दीड कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.

**लाकडाची वखार**

परतवाडा येथील लाकडाची वखार म्हणजे भारतांतील एक मोठा महत्वाचा लाकडाचा बाजार समजला जातो. अखिल भारतांतून लांकूड खरेदीसाठी येथे व्यापारी येतात. दरवर्षी ५०-६० लक्ष रुपयांचे लांकूड येथून विकले जाते.

जंगल भागांत राहणाऱ्या मजुरांच्या कल्याणासाठी जंगल खात्याकडून व जिल्हा परिषदेकडून दरवर्षी मदत दिली जाते. रस्ते तयार करणे, घरें बांधणें, पाण्याची सोय करणें, वैद्यकीय मदत करणें आदि कार्याकडे तिचा उपयोग होतो. अमरावती जिल्हयांतील जंगल खात्याचे एक वैशिष्ठ्य म्हणजे लांकडे तोडणे, जमा करणे, वाहतूक करून थप्प्या करणे ही सर्व कामें या खात्यामार्फत होतात. यासाठी एकहि ठेकेदार नाही हे विशेष होय.

**वन-कामगार कल्याण**

## ६. सहकार

अमरावती जिल्ह्यांतील १,५८४ गांवापैकी १,५०६ गांवें म्हणजे ९४.८४ टक्के खेडी सहकारी चळवळीचे क्षेत्रांत आली आहेत. शेतकरी वर्गातील ५८.४९ टक्के शेतकऱ्यांना सहकारी संस्थांचा फायदा होतो.

**सहकारी चळवळः** जिल्ह्यात एकूण ९५८ संस्था असून त्यांचे ५१,३४९ शेतकरी सभासद आहेत. दर्यापूर, मोर्शी, अचलपूर व अमरावती ह्या सहकारी बँकांतून शेतकऱ्यांना कर्ज दिले जाते. या बँकांना नागपूर विदर्भ को-ऑपरेटिव्ह बँकेकडून कर्ज मिळते व ह्या बँकेला रिझर्व बँक ऑफ इंडिया ही बँक कर्ज पुरविते. शेतकऱ्यांना दरवर्षी एकरी ४० ते ५५ रुपयांपर्यंत शेतीसाठी कर्ज दिले जाते. त्यापैकी खत व बी-बियाणे या रूपाने दर एकरी दहा रुपयापर्यंत व उरलेला भाग रोख रक्कमेत दिला जातो. दरवर्षी साधारणपणे एक ते सव्वाकोट रुपये कर्ज शेतकऱ्यांना दिले जाते. त्यांपैकी सालामानाप्रमाणे साधारणतः सुमारे ९० टक्केपर्यंत कर्ज वसुली होते.

कमी मुदतीचे (१ ते १५ महिनेपर्यंतचे) व मध्यम मुदतीचे (१५ महिने ते ५ वर्ष) कर्ज या सोसायट्याकडून दिले जाते. तर भूगहाणी बँकमार्फत (५ ते ३० वर्ष) लांब मुदतीचे कर्ज मिळते, **लँण्ड** मार्गेज सोसायटीने साडेतीन लक्ष रुपये लांब मुदतीचे कर्ज आतापर्यंत शेतकऱ्यांना दिले आहे.

जिल्ह्यांत सात नियंत्रित विक्रीकेंद्रें आहेत. त्यापैकी अमरावती व धामणगांव येथील विक्रीकेंद्रें, अधिक कार्यक्षम आहेत. अमरावतीस साधारणपणे दीड लक्ष कापसाच्या गाड्यांची आवक कापूस बाजारांत होते. गेल्या १३ वर्षांत ६ कोटींची उलाढाल झाला.

**नियंत्रित विक्री केंद्रें**

१९४९-५० साली ७२,८७८ गाड्या, ५०-५१ साली ११७,७२२ गाड्या, ५१-५२ साली १८४,१०४ गाड्या, ५२-५३ साली १३०,०४३ गाड्या, ५३-५४ साली १४०,३५२ गाड्या, ५४-५५ साली १३३,२५७ गाड्या, ५५-५६ साली ११२,५२० गाड्या, ५६-५७ साली १७५,५९३ गाड्या, ५७-५८ साली १७२,४१७ गाड्या, ५८-५९ साली १४९,८४० गाड्या, व ५९-६० साली १०७,३०९ गाड्या, १९६०-६१ साली १७६,००० गाड्या व १९६१-६२ साली १०८,००० गाड्या या कापूस बाजारांत आल्या.

हा कापूस बाजार आशिया खण्डातील सर्वात मोठा कापूस बाजार म्हणून समजला जातो. शेतकऱ्यांना वाढत्या भावाचा फायदा मिळावा या हेतूने जिल्ह्यांत २६ (१ मोठे, ९ मध्यम व १६ लहान) गोदामें बांधण्यात आली आहेत. शेतकऱ्यांना या गोदामामध्ये माल ठेवून त्यावर कर्ज मिळू शकते.

**गोदामें**

मध्यम आकाराची गोदामें अमरावती, चान्दुर रेल्वे, अचलपूर, अन्जनगांव, मोर्शी, वरूड, दर्यापूर पथ्रोट, करंजगांव येथे असून लहान गोदामें शिराळा, पथ्रोट, हिवरखेड, शिन्गणापुर, तिवसा, आसेगांव खोलापुर, टाकरखेडा, येवदा, दर्यापूर, चान्दुर बाजार, करजगांव, मोझारी, अचलपूर, कुऱ्हा, बोरगांव पेठ येथे आहेत. या शिवाय अमरावती येथे एक सेन्ट्रल वेअर हाऊस कारपोरेशनचे एक गोदाम बांधण्यांत आले असून त्यांत ठेवल्या जाणाऱ्या मालापैकी शेतकरी लोकांचाच माल सुमारे ९७ टक्केपर्यंत असतो. धामणगांव येथे स्टेट वेअर हाऊसींग कारपोरेशनच्या एका गोदामाचे काम पूर्ण झाले आहे. शेतकऱ्यांत आता गोदामाचा फायदा घेण्याची प्रवृत्ति वाढत असून त्यामुळे पतपुरवठा व माल विक्री यांची सांगड घातली जात आहे.

अमरावती जिल्ह्यांत सहकारी तत्वांवर अनेक उद्योग गेल्या कांही वर्षात सुरू झालेले आहेत. हे उद्योगधंदे जिल्ह्याच्या आर्थिक विकासास वेग आणण्यास मदत करीत आहेत. त्याबद्दलची सविस्तर माहिती "उद्योगधंदे" या पुढील प्रकरणांत दिली आहे.

**औद्योगिक सहकार.**

# अमरावती जिल्हा




# सहकारी संस्था

# ७. उद्योगधंदे

**कापडगिरण्या**

अमरावती जिल्ह्यांत अचलपूर येथे एक व बडनेरा येथे एक अशा दोन कापड गिरण्या (टेक्स्टाइल मिल्स) आहेत. तेथील चात्यांची संख्या अनुक्रमे १४,००० व २१,५०० आहे. ह्या दोन्ही गिरण्यांत मिळून २,७०० कामगार काम करतात.

**जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी**

अमरावती जिल्ह्यात सुमारे आठ ते नऊ लक्ष एकर जमिनीत कापूस पिकविला जातो. कपाशीतून सरकी काढून घेऊन कपाशीच्या प्रेसगाठी बांधणे हा महत्वाचा उद्योगधंदा असून, अशा तऱ्हेच्या ५७ कॉटन जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरीज् अमरावती जिल्ह्यांत आहेत. कच्च्या मालाचे रूपांतर करण्यासाठी शेतकऱ्यांनी सहकारी प्रोसेसींग व जींनीग कारखाने काढले तर त्यांच्या पदरांत अधिक फायदा पडेल. ह्या जाणीवेंतून सहकारी तत्वांवर जिनींग कारखाना पथ्रोट (तहसिल अचलपूर) येथे निघाला असून त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होत आहे. अमरावती येथेहि सहकारी संघाने एक जिनिंग प्रेसिंग कारखाना विकत घेतला असून, या वर्षीपासून शेतकऱ्यांचा कापूस त्यांच्याच जिनातून निघून पक्क्या गांठित रूपांतर करून त्यांना विकता येतो. अशा तऱ्हेचे सहकारी तत्वावर जिनिंग,-प्रेसिंग कारखाने करजगांव, अंजनगांव सुर्जी वगैरे ठिकाणी निघाले आहेत.

जिल्ह्यांत दरवर्षी दहा कोटी रुपयांचे कापसाचे पीक लक्षात घेता कॉटन प्रोसेसिंग सोसायटयांचे भवितव्य उज्वल आहे. पथ्रोट येथील संस्थेने याबाबत उत्कृट मार्ग दाखविला आहे.

अमरावती येथील सोसायटीनेहि स्वतःचा जीन सुरू केला आहे. व स्वतः प्रेसिंग कारखाना विकत घेतला आहे. जिल्ह्यात सहकारी संस्थांमार्फत आपल्या मालाची विक्री करण्याचा प्रसार चालू असून जवळजवळ चार टक्का माल सहकारी संस्थामार्फत विकल्या जातो. शेतीतून उत्पादित कच्च्या मालाचे प्रोसेसिंग सोसायटयामार्फत पक्कया मालात करून, तो विकण्याची प्रवृत्ती लोकांत निर्माण होत आहे.

**औद्योगिक सहकारी संस्था**

अमरावती येथे विदर्भ विभागीय सहकारी बोर्डामार्फत प्रादेशिक सहकारी प्रशिक्षण शाळा स्थापन झाली असून, तेथे सहा महिन्याचे प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. सहकारी चळवळीचा प्रसार करण्यासाठी व लोकांत सहकारी तत्त्वाबाबत आकर्षण निर्माण करण्यासाठी "सहकारी विदर्भ" नांवाचे मासिकहि चालविण्यांत येत आहे. शिवाय चित्रपटांद्वारेहि सहकारी चळवळींचा प्रसार करण्याचे कार्य सहकारी बोर्डाद्वारा या जिल्ह्यांत चालू आहे.

**औद्योगिक सहकार**

औद्योगिक सहकारी सोसायटयांचा स्थापन करणे, त्यांना मार्गदर्शन करणे, त्यांचे कामावर देखरेख ठेवणे, उत्पादित मालाची विक्री करणे वगैरे गोष्टी असिस्टंट डायरेक्टर ऑफ कॉटेज इंडस्ट्रीज, अमरावती हे पाहतात. या जिल्ह्यांतील मोर्शी तालुका, दर्यापूर विकास गट, अमरावती विकास गट यांचेसाठी कम्युनिटी प्रोजेक्ट योजना लागू करण्यांत आली असून, भारतात चालू असलेल्या २६ योजनांपैकी ती एक आहे. या जिल्ह्यांत औद्योगिक सहकारी संस्था पुढीलप्रमाणे आहेत :—

| | |
|---|---|
| विणकर सहकारी संस्था ... ... ... | १४ |
| तेलघाणी सहकारी संस्था ... ... ... | १० |
| कातडे रंगविण्याच्या संस्था ... ... ... | १३ |
| कुंभार व विटकाम संस्था ... ... ... | १७ |
| सुतार व लोहार काम संस्था ... ... ... | १२ |
| कामगार सहकारी संस्था ... ... ... | ७ |
| कापड रंगाई व छपाई संस्था ... ... ... | ४ |
| महिला सहकारी संस्था ... ... ... | १ |
| शिवण काम संस्था ... ... | [illegible] |

| | | | |
|---|---|---|---|
| जंगल कामगार सहकारी संस्था ... | ... | ... | २ |
| मेटल वर्क्स सहकारी संस्था ... | . . | ... | १ |
| पेंटर्स सहकारी संस्था ... ... | ... | . . | १ |
| फळरस उत्पादक सहकारी संस्था | ... | . . | १ |
| जिल्हा औद्योगिक सहकारी संस्था | ... | . . | १ |
| बांबू व केन काम सहकारी संस्था | . . | ... | ३ |
| दोरकाम सहकारी संस्था ... | ... | ... | १ |
| नीरा व ताडगूळ उत्पादक सहकारी संस्था | ... | ... | २ |
| | एकूण | ... | १०७ |

या संस्थांना कर्ज देण्याची व्यवस्थाहि डेप्युटी रजिस्ट्रार, अमरावती यांच्याकडून होत असते.

**हातमागाचा धंदा**

हातमागाचा धंदा हा या जिल्हयांतील सर्वात मोठा ग्रामोद्योग असून, अचलपूर व दर्यापूर तहसिलीत बरेच हातमाग चालत आहेत. जिल्हयांत नोंदलेल्या एकूण ४,६८८ मागापैकी ३,००३ चेंबर हातमाग सहकारी चळवळीत सामील झाले आहेत. अचलपूर येथील इंडस्ट्रीयल विव्हिंग को-ऑपरेटीव्ह सोसायटी विदर्भातील सर्वात मोठी व आदर्श विणकर सोसायटी असून दरवर्षी सुमारे १२ लाखाचेवर रुपयांची देवघेव ही सोसायटी करते. जिल्हयास मिळालेल्या ५५ पावरलुम्सपैकी २० पावरलुम्सहि सोसायटी चालविते. या सोसायटीचे अमरावती येथे मोठे विक्री-केंद्र असून जिल्हयात इतरत्र विक्रीकेंद्रे आहेत.

**चामडे कमविण्याचा धंदा**

हातमागाचे खालोखाल चामडी कमविणे व रंगविणे हा धंदा या भागांत चालतो. या कामासाठी १३ सोसायटया स्थापन केल्या आहेत. कुरूम चामडे तयार करण्याच्या कारखान्याची योजना आखली गेली असून, याची पूर्वतयारीहि पूर्ण झाली आहे. कारखान्याच्या कामास आता सुरुवात होणार आहे.

**तेलवाण्यांना संधी**

या जिल्हयांत दरवर्षी मोठया प्रमाणवर पिकणाऱ्या भुईमूग, तीळ, जवस वगैरे गळिताची पिके लक्षात घेता तेलवाणीच्या सोसायटया स्थापन करण्यास बराच वाव आहे.

**विक्रीची व्यवस्था**

लहान लहान सोसायटयांतून तयार होणाऱ्या मालाची विक्री होण्यासाठी अमरावती येथे जिल्हा औद्योगिक संघातर्फे कुटीर उद्योग विक्री-केंद्र सुरू केले असून ते विक्री-केंद्र फारच लोकप्रिय होत आहे. अशिक्षित कारागिरापर्यंत सरकारी योजना पोचविणे, त्यांना मार्गदर्शन करणे व जिल्हयातील लघुउद्योगास प्रोत्साहन देणे आदि कार्य जिल्हा औद्योगिक संघाद्वारा होते.

**औद्योगिक सामूहिक विकास योजना**

द्वितीय पंचवार्षिक योजना कालांत अखिल भारतांत २६ ठिकाणी उद्योग मार्गदर्शन केंद्रे निवडली गेली. यापैकी १९५६ साली एक केंद्र अमरावतीस उघडले. अमरावती जिल्हयात मोर्शी तालुका, दर्यापूर विकास खंड, अमरावती विकास खंड हे क्षेत्र हया कार्यासाठी निवडण्यांत आले आहे. औद्योगिक क्षेत्रांत विकास घडवून आणण्यासाठी ज्या ठिकाणी उद्योग विकासास अनुकूल वातावरण आहे अशीच क्षेत्रे निवडण्यांत आली आहेत.

औद्योगिकरणाच्या दृष्टीने जनतेत जागृति निर्माण करणे व शेतीवरचा भार कमी करणे, ज्या भागांत फक्त ८ टक्के मनुष्यबळ उद्योगधंद्यांत आहे ते २८ टक्क्यापर्यंत नेणे, हा या योजनेचा मुख्य हेतु आहे. ग्रामोद्योग व छोटे उद्योगधंदे जास्तीत जास्त सहकारी तत्वावर निघावेत, खेड्यापाड्यांत राहणाऱ्या अशिक्षित कारागिरांना सहकारी योजना माहिती व्हावी, त्यांचे फायदे मिळण्यासाठी सहकारी संस्था स्थापन करणे, त्यांच्या तयार होणाऱ्या मालाची विक्री करण्यास मदत करणे, या कामाकडेहि लक्ष दिले जाते.

या योजनेच्या कार्यक्षेत्रातील बहुतेक सर्व भागांत विजेचा पुरवठा आहे. बहुतेक गांवे रस्त्याने जोडली आहेत. सुमारे ३,००० चे वर विहिरी असून त्यापैकी पुष्कळ विहिरीवर विजेचे पंप बसविण्यांत आले आहेत. या भागातील जनता मेहनती व उद्योगी आहे. या योजने-साठी तीस लक्ष रु. मंजूर करण्यांत आले असून त्यामुळे लघुउद्योगांत २,५०० कारागिरांना व ग्रामोद्योगांत ५,५०० कारागिरांना काम मिळेल.

**कार्यक्षेत्र**

अमरावती-वडनेरा रस्त्यावर अमरावतीपासून २ मैल अंतरावर औद्योगिक वसाहतीचे बांधकाम चालू असून ते लवकरच पूर्ण होईल. या औद्योगिक क्षेत्राच्या हद्दीमधे २० लघु उद्योग कारखान्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. या कारखान्यांना जागा, पाणी, वीज पुरवठा, वाहतूक यांची व्यवस्था सरकार करून देणार असून, एक पाळीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा नियंत्रित भावाने देण्याचा सरकारचा प्रयत्न राहील.

**लघुउद्योग**

अमरावती येथे एक एक्स्टेंशन सेंटर काढले असून, तेथे निरनिराळ्या प्रकारची २०—२५ यंत्रे ठेवण्यांत आली आहेत. कारागिरांना आपले काम तेथे नाममात्र भाडे देऊन करून घेता येते. वरूड येथेहि एक एक्स्टेंशन सेंटर काढले असून विजेच्या पंपची दुरुस्ती, इलेक्ट्रीकल मोटारची दुरुस्ती, फळे पाठविण्यासाठी पेट्या तयार करणे वगैरे काम होत आहे. या दोन एक्स्टेंशन केंद्रासाठी जवळजवळ तीन लक्ष रुपये खर्च झाले.

**यंत्रसुविधा केंद्र**

**गांधी ग्रामोद्योग मंदिर**

श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे मेकॅनिकल वर्कशॉप, सुतार काम, स्टेशनरी उत्पादन, पेपर व पिन्स क्लिप्स या चार उद्योगासाठी उत्पादन व शिक्षण केंद्रे सुरू केली असून, या कार्यासाठी चार लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. आतापर्यंत अनेक तरुणांना या संस्थेमार्फत शिक्षण देण्यांत आले आहे.

**क्रोमेंटनरी व लेदर टॅनिंग सेंटर**

अमरावती येथे सुरू होणारा क्रूरूम चामडाचा कारखाना व दर्यापूर येथील लेदर टॅनिंग सेंटर यासाठी तीन लक्ष रुपये खर्च केले जाणार आहेत. फ्रूट कॅनिंग व हायर परचेसेस मशिनरीच्या योजनेसाठी ३ लक्ष रु. तरतूद केली आहे. अशा रीतीने २,५०० कारागिरांसाठी २८ लक्ष रुपयांच्या योजना आखल्या आहेत.


**ग्रामोद्योग**

तेलघाणी, वीटकाम, साबण, दोरकाम, ताडगुळ, बांबूकाम, शिवणकाम, चर्मकाम वगैरे ग्रामोद्योगांत गुंतलेल्या सुमारे ५,५०० कारागिरांना कर्ज म्हणून ४,८९,००० रु. व मदत म्हणून २,११,००० रु. अशी एकूण ७,००,००० रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

**जिल्हा औद्योगिक सहकारी संस्था**

जिल्ह्यातील सर्व औद्योगिक व कामगार सहकारी संस्थांचे एक संघटन असावे या दृष्टीने जिल्हा औद्योगिक सहकारी संस्थेची अमरावती येथे फेब्रुवारी १९५९ मध्ये स्थापना झाली.

लहान उद्योगाच्या सहकारी संस्थांचे विक्री-केंद्र किंवा या संस्थांमार्फत निर्मित झालेल्या वस्तूंसाठी बाजारपेठ मिळवून देणे, या प्रमुख उद्देशाने या संस्थेची स्थापना झालेली आहे. याशिवाय स्थानीय लघु उद्योगांना प्रोत्साहन, स्थानीय कारागिरांना नवीन अवजारांची व्यवस्था करून देणे, लहान उद्योगासाठी आवश्यक असलेल्या कच्च्या मालाबद्दल वस्तुस्थितीची माहिती त्या उद्योगाच्या सहकारी संस्थांना करून देणें, तसेच त्या कच्च्या मालाचा पुरवठा रास्त किंमतीत होईल अशी व्यवस्था करणें, मालाच्या गहाणांवर संस्थांना पैशाची व्यवस्था करून देणें, हे या संस्थेचे प्रमुख हेतु आहेत.


अमरावती जिल्हा
उद्योग धंदे
शेंदुर्जनाघाट
पुसला
वरूड
मोर्शी
नेरपिंगळाई
अचलपूर कँप
अचलपूर सीटी
पथ्रोट
अंजनगांव (सुर्जी)
दर्यापूर
मोझरी
अमरावती
बडनेरा
चांदुररेल्वे
मंगरूळ-दस्तगीर
धामणगांव
जिनींग प्रेस
कापडाची गिरणी
तेलाचे कारखाने
औषधें
सतरंज्या
कुंकू
हातमाग कापड
प्लॅस्टिक कारखाने
सायकल कारखाना

केंद्रीय जिल्ह्यांतील १३ चर्मकार सहकारी संस्थांना चामड्याच्या कच्च्या मालाचा पुरवठा होतो व चामड्याच्या तयार झालेल्या वस्तूंची विक्री या संस्थेमार्फत करतात. सध्या जिल्ह्यातील २,५०० चर्मकार या संस्थेचा फायदा घेतात.

**चामडे विक्री-केंद्र**

**कुटीर उद्योग विक्री-केंद्रे**

या संस्थेमार्फत हातमागाच्या कपड्याचे एक दुकान अमरावती येथे व दुसरे वरुड येथे चालविण्यांत येते. तसेच लहान उद्योगधंद्याच्या वस्तूंची विक्री या दुकानामार्फत होते.

जिल्ह्यांतील १२८ सहकारी औद्योगिक संस्था व मजूर सहकारी ठेकेदार संस्था या जिल्हा संस्थेच्या सभासद आहेत. या संस्थेमार्फत वेगवेगळे ७ विभाग चालू आहेत. या संस्थेत एकूण हिस्से भांडवल २५,६३० रुपये आहे. १९६०-६१ साली या संस्थेमार्फत सुमारे १ लक्ष २० हजार रुपये मालाची विक्री करण्यांत आली व सुमारे १३ हजार रुपयांचा फायदा झाला.

**तेलाच्या गिरण्या**

कपाशीनंतर दुसरे महत्वाचे पैसा देणारे पीक म्हणजे भुइमूग, तीळ, जवस, यासारखी गळिताची पिकें. अशा पिकांखाली अमरावती जिल्ह्यांत सुमारे एक लक्ष एकर जमीन आहे. तेलाचे १२ कारखानेहि या जिल्ह्यात आहेत.

**डाळीचे कारखाने**

अमरावतीची तूर प्रसिद्ध आहे. येथील तुरीची डाळ परदेशी पाठविली जाते. या जिल्ह्यांत तुरीची डाळ तयार करणारे सात कारखाने आहेत.

**कुंकू कारखाने**

अमरावतीचे अंबादेवीचे मंदिर विदर्भात नव्हे तर महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे. अंबादेवीचे दर्शनास आलेलें भाविक प्रसादाबरोबर कुंकू घेतल्याशिवाय जात नाही. त्यामुळे अमरावतीस कुंकवाची बरीच मागणी असते. ती भागविण्यासाठी अमरावती जिल्ह्यांत पांच कुंकवाचे कारखाने निघाले आहेत.

याशिवाय ३७ छापखाने, २० जनरल इंजिनीअरिंग कारखाने, अकरा सॉ मिल्स्, एक बिडी फॅक्टरी, एक आर्ट सिल्क डिझाईन्स फॅक्टरी आहे.

**औषध कारखाने**

अमरावती व मोझरी येथे २ रसशाळा व औषधांचे कारखाने आहेत.

**उद्योगाची नवी दिशा**

गेल्या कांही वर्षांत सहकारी तत्त्वांवर अधिकाधिक उद्योग अमरावती जिल्ह्यांत स्थापन होत आहेत. खाजगी मालकीचे व सहकारी संस्थांच्या मालकीचे कारखाने अलिकडच्या काळांत सरकारी प्रोत्साहनाने वाढत आहेत. ह्यांत औद्योगिक वसाहतीची स्थापना, उद्योगधंद्यांसाठीं कर्ज पुरवठा, उद्योग कोठें सुरू करता येईल याची पूर्व-पहाणी, उद्योगधंदे सुरू करण्यासाठी उद्योग विभागाचे तांत्रिक मार्गदर्शन वगैरेचा अंतर्भाव होतो.

**औद्योगिक वसाहत**

अनेक व्यक्तींचे छोटे छोटे कारखाने काढण्याची इच्छा असते. परंतु त्यांना कारखान्यासाठी योग्य इमारत, वीजेचा पुरवठा, पाणी पुरवठा, वगैरे आवश्यक सोयी असलेली जागा पुष्कळदा मिळत नाही. अशी सोय उपलब्ध करून देण्याच्या हेतूने औद्योगिक वसाहतीची कल्पना पुढे आली. विदर्भातील दोन औद्योगिक वसाहतींपैकी एक वसाहत अमरावती येथे अमरावती-बडनेरा रस्त्यावर नोव्हेंबर १९६० मध्यें सुरू झाली. या वसाहतीत ३० शेडस् तयार झाले असून कांही कारखान्यांचे काम सुरू झाले आहे. या वसाहतीसाठी १०॥ लक्ष रुपये मंजूर झाले आहेत. प्रस्तुत वसाहत ही अमरावती जिल्ह्यांत नवीन उद्योगधंद्याचे युग सुरू करील अशी अपेक्षा आहे. या वसाहतीत कारखानदारांची एक औद्योगिक वसाहत सहकारी संस्था स्थापन झाली असून वसाहतीची व्यवस्था या सहकारी संस्थेकडे देण्यांत येईल.

**सायकल कारखाना**

अमरावती-बडनेरा रस्त्यावर अमरावतीपासून ३ मैलावर सायकलचा कारखाना निघाला असून दरवर्षी १२ हजार सायकली निर्माण होतील. सायकलीचे प्रत्यक्ष उत्पादन सुरू झालेले नाही. लवकरच प्रत्यक्ष उत्पादनास सुरुवात होईल.

**प्लास्टिक कारखाना**

श्री. बनारसे यांचा प्लॉस्टिकचे स्विचेस, होल्डर्स, वगैरेसारख्या वीजेच्या उपयोगाच्या वस्तूंचा कारखाना या भागांत बराच लोकप्रिय झालेला आहे. हाहि कारखाना अमरावती-बडनेरा रस्त्यावरच आहे.

**उद्योगाची मार्गदर्शक योजना**

अखिल भारतीय खादी आणि ग्रामोद्योग कमिशन, अखिल भारतीय हस्तव्यवसाय बोर्ड, लघु उद्योग मंडळ व हातमाग मंडळ या अखिल भारतीय संघटनांच्या अनेक योजनांद्वारे मिळणाऱ्या सवलतींचा लाभ घेऊन वेगवेगळे उद्योगधंदे सुरू करण्यासाठी १९५७ मध्ये भारत सरकारने देशांत उद्योग मार्गदर्शक २६१ क्षेत्रें निवडली. त्यापैकी दोन महाराष्ट्रांत आहेत. एक कोल्हापूर येथे व दुसरे अमरावती येथे आहे. या योजनेमुळेहि अमरावती जिल्ह्याचा पुष्कळ फायदा झालेला आहे.

**उद्योगधंद्यांची पहाणी**

अमरावती जिल्ह्यांतील उपलब्ध कच्चा माल लक्षांत घेऊन लहानमोठे उद्योगधंदे कोठे सुरू करता येतील याची पहाणी होत असून अमरावती तालुक्यांत ३७, अचलपूर तालुक्यांत ३०, चांदूर तालुक्यांत १५, मेळघाट तालुक्यांत १०, मोर्शी तहसीलमध्ये १४ आणि दर्यापूर तहसीलीमध्ये १५, असे १२१ लघु उद्योग सुरू करण्याची शक्यता उद्योग विभागाने जाहीर केली आहे.

**कुटीरउद्योग प्रशिक्षण**

कुटीर उद्योगाचा प्रसार ग्रामीण विभागांत केल्याशिवाय शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिति सुधारणार नाही हे तत्त्व मान्य करून कुटीर उद्योगांचे जाळे जिल्हाभर पसरविण्यांत येत आहे. याच दृष्टीने कारागिरांसाठी प्रशिक्षण केंद्रे विकास खंडातून सुरू करण्यांत आलीत. यापैकी अचलपूर येथील केंद्रात कापड रंगाई व कापड छपाई, चांदूर रेल्वे येथील केंद्रात शिवणकाम, परतवाडा येथे सुतार व लोहार काम आणि चामडे काम व अमरावती येथे फौन्ड्री व मशीन काम, याचे प्रशिक्षण देण्यांत येते. याप्रीत्यर्थ अंदाजे ४॥ लक्ष रुपयांची तरतूद झालेली आहे.

**उद्योगधंद्यांसाठी कर्ज**

लहानमोठ्या उद्योगधंद्यांसाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना आहे. त्यानुसार डायरेक्टर ऑफ इण्डस्ट्रीज, स्टेट फायनान्स कॉर्पोरेशन, नॅशनल स्मॉल स्केल इण्डस्ट्रीज कॉर्पोरेशनकडून एक हजार रुपयांपासून ते १० लक्ष रुपयांपर्यंत कारखान्यांसाठी कर्ज देण्याची योजना आंखण्यांत आली असून तिचा लाभ या जिल्ह्यांतील लोकांना होत आहे.

# ८. वाहतूक व दळणवळण

अमरावती जिल्ह्यांत नागपूर रस्ते योजनेनुसार १,७५० मैल रस्ते असावयाला पाहिजेत. १९५१ मध्ये फक्त ४६३ मैल रस्ते होते. पहिल्या पंचवार्षिक योजनेनंतर ५७६ मैल रस्ते झाले. ३१-३-६१ ला म्हणजे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी ७०३ मैल रस्ते पूर्ण झाले. म्हणजे नागपूर रस्ते योजनेच्या शेकडा ४० टक्के रस्ते झाले. तिसऱ्या पंचवर्षीय योजनेत ३१० मैल रस्ते करण्याचा संकल्प आहे. व अशा रीतीने ९४८ मैल म्हणजे नागपूर योजनेच्या ५३ टक्के रस्ते तिसऱ्या पंचवर्षीय योजनेच्या अखेरीस अमरावती जिल्ह्यांत होतील.

**रस्ते**

## अमरावती जिल्ह्यांतील रस्ते

| | लांबी मैल | नवीन लांबी मैल |
|---|---|---|
| १. राष्ट्रीय राजमार्ग (नं. ६) : मुंबई-नागपूर रस्ता ... ... | ४७ | ... |
| २. राज्यमार्ग— | | |
| (१) चांदूर-बऱ्हाणपूर रस्ता (अमरावती-अचलपूर मार्ग) .. | १२२ | ... |
| (२) अकोट-अचलपूर-बैतूल रस्ता ... ... ... | ३८ | ... |
| (३) वरूड-मुलताई रस्ता ... ... ... ... | १२ | ७ |
| (४) अमरावती-वरूड-पांढुरणा रस्ता ... ... | ६० | ... |
| (५) यवतमाळ-धामणगांव (अमरावती जिल्ह्यांतील रस्ता) | ८ | ... |
| (६) अमरावती-वर्धा रस्ता (पोहरा-चांदूर रेल्वे, तळेगांव, पुलगांव, अमरावती जिल्ह्यांतील भाग). | २१ | २७ |
| एकूण ... | २६१ | ३४ |

| | लांबी मैल | नवीन लांबी मैल |
|---|---|---|
| ३. प्रमुख जिल्हा मार्ग— | | |
| (१) शेंदुरजना ते मोवाड रस्ता (अमरावती जिल्ह्यांतील पुसला भाग). | ... | १३·०० |
| (२) मोर्शी-आष्टी रस्ता (अमरावती जिल्ह्यांतील भाग) ... | ... | ५·३० |
| (३) अचलपूर-चांदूर बाजार-मोर्शी रस्ता ... ... | ३३·०० | ... |
| (४) वलगांव-किनखेड रस्ता (दर्यापूर-दहिहांडा मार्ग, अमरावती जिल्ह्यांतील भाग). | २५.७० | १३·०० |
| (५) चांदुर बाजार-आसेगांव-दर्यापूर रस्ता ... ... | ... | ३५·६० |
| (६) वलगांव-चांदुर बाजार रस्ता ... ... ... | १६.५० | ... |
| (७) आकोट-दर्यापूर-मुर्तिजापूर रस्ता (अमरावती जिल्ह्यांतील भाग). | २२.०० | ... |

अमरावती जिल्ह्यांतील रस्ते—चालू

३. प्रमुख जिल्हा मार्ग—चालू

| | | लांबी मैल | नवीन लांबी मैल |
|---|---|---|---|
| (८) | आकोट-हरिसाल रस्ता (अमरावती जिल्ह्यांतील रस्ता) | ३९.५० | ... |
| (९) | वलगांव-फुबगांव रस्ता ... ... ... | ... | १४·०० |
| (१०) | अमरावती-कुऱ्हा-अंजनसिंगी-धामणगांव रस्ता ... | ६·०० | २९.५० |
| (११) | चांदूर रेल्वे-आर्वी रस्ता, कुऱ्हा-कौण्डीण्यपूर मार्ग ... | ... | ६.५० |
| (१२) | चांदूर रेल्वे-पळसखेड रस्ता (अमरावती जिल्ह्यांतील भाग) | ... | ३०.४० |
| (१३) | चांदूर रेल्वे-रिथपूर रस्ता (कुऱ्हा-तिवसा मार्ग) ... | ४७·०० | ... |
| (१४) | अंजनगांव-आसेगांव-शिराळा-यावली-तळेगांव ठाकूर ते नागपूर-अमरावती रस्त्याला जोडणारा भाग. | ४.८० | ४३·०० |
| (१५) | अचलपूर-कोकर्डा-खोलापूर-भातकुली-लोणी-माहुली (राज्य मार्गास जोडणारा.) | ... | ४६·०० |
| (१६) | नागपूर-काटोल-जलालखेडा-वरूड रस्ता (अमरावती जिल्ह्यांतील भाग.) | ११.३५ | ... |
| (१७) | अंजनगांव-दर्यापूर रस्ता ... ... ... | ... | १८·०० |
| (१८) | अमरावती-भातकुली-आसरा-मुर्तिजापूर (अमरावती जिल्ह्यांतील रस्ता.) | ... | १७·५० |
| | एकूण ... | २०५.८५ | २७१.८० |
| | ए ... ... ... | ४७ | ... |
| | बी ... ... ... | २६१ | ३४.०० |
| | सी .. ... ... | २०५.८५ | २७१.०० |
| | प्रमुख रस्त्यांची एकूण लांबी ... | ५१३.८५ | ३०५.८० |

जिल्ह्यांतील इतर रस्ते—(४९) ५०२·५० मैल.
ग्रामीण रस्ते—(१७७) ४७६.७८ मैल.

| नवीन लांबी | | जिल्हा रस्ते | | | | | | मैल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७३.०० | १ | मेळघाट ... ... | १ | ते | ६ | ६ | | ८७.५० |
| ८३.०० | २ | दर्यापूर ... ... | ७ | ते | १३ | ७ | | ८३.०० |
| ३४.९५ | ३ | अचलपूर ... ... | १४ | ते | १८ | ५ | | ४५.०५ |
| ६९.०० | ४ | अमरावती ... ... | १९ | ते | २९ | ११ | | ७८.९५ |
| ५६.५० | ५ | मोर्शी ... ... | ३० | ते | ३५ | ६ | | ६२.०० |
| १५१.०० | ६ | चांदूर ... ... | ३६ | ते | ४९ | १४ | | १५१.०० |
| ४६७.४५ | | | | | एकूण | ४९ | | ५०२.५० |

अमरावती जिल्ह्यांत महाराष्ट्र राज्य ट्रान्सपोर्ट सर्व्हिसच्या बसेस जिल्ह्यांतल्या जवळजवळ सर्व भागांत जातातच. याशिवाय यवतमाळ, वर्धा, नागपूर, आकोला अशा शेजारच्या जिल्ह्यास सुद्धा त्या जोडल्या गेल्या आहेत.

**वाहतूक**

त्याबरोबरच इतर खाजगी कंपन्याहि वाहतुकीचे कार्य जलदगतीने करतात. सकाळी अमरावतीहून निघून जिल्ह्याच्या कोणत्याहि कोपऱ्यांत जाऊन रात्री अमरावतीस परत येता येते.

अमरावती-यवतमाळ हे ५७ मैलाचे अंतर असून मोटारीने ३ तास लागतात. दिवसांतून चार बसेस जातात.

अमरावती-अचलपूर शहर हे अंतर ३० मैलाचे असून पावणे दोन तास लागतात. दिवसांतून ११ बसेस जातात.

अमरावती-परतवाडा ३१ मैलाचे अंतर असून पावणेदोन तास लागतात व दिवसांतून २५ बसेस जातात.

तसेच अमरावती, यावली, वलगांव, आर्वी, वगैरे या गांवांनाहि राज्य मोटार सर्व्हिस बस जाते.

**रेल्वे**

मध्य रेल्वेचा मुंबई-नागपूर-कलकत्ता हा ब्रॉडगेज मार्ग अमरावती जिल्ह्यांतून जातो. अमरावती जिल्ह्यांत ४८ मैल ब्रॉडगेज रेल्वेचा मार्ग येतो. यावर खालील स्टेशने येतात: टाकळी, बडनेरा, टिमटाला, मालखेड, चांदूर, दिपोरी, धामणगांव व तळणी. नॅरोगेजचा एक मार्ग मुर्तिजापूरपासून निघून अचलपूरपर्यंत जातो. ह्या जिल्ह्यांत ३५ मैल नॅरोगेज रेल्वेचा मार्ग जातो व त्यावर खालील स्टेशनें येतात :—

दर्यापूर, बनोसा, लेहगांव, कोकर्डा, कापूस तळणी, अंजनगांव सुर्जी, पथ्रोट, चमक, नौबाग व अचलपूर.

तसेच आणखी एक नवीन मिटरगेज रेल्वेचा मार्ग तयार झाला आहे. तो म्हणजे हिंगोली-खंडवा मार्ग होय. या मार्गातील २४ मैल मार्ग अमरावती जिल्ह्यांतून मेळघाटच्या डोंगराळ भागांतून जातो. अमरावती जिल्ह्यांतील या डोंगराळ भागातून ही पहिलीच रेल्वेलाईन आहे. खांडवा-हिंगोली या. रेल्वे मार्गाच्या बांधकामासाठी अंदाजे १२.४० कोटी रुपये खर्च झाला असून यापैकी अमरावती जिल्ह्यांतून जाणाऱ्या रेल्वे मार्गाचे बांधकामासाठी ३ कोटी रुपये खर्चाचा अंदाज होता.


मेळघाट या डोंगराळ भागांतून हा रेल्वे मार्ग नेतांना बराच त्रास पडला. त्यासाठी फार मोठे परिश्रम करावे लागले. या डोंगराळ भागांतून ही रेल्वे नेण्यासाठी दोन बोगदे तयार झाले असून ह्या बोगद्याची लांबी जवळ जवळ अर्धा मैलपर्यंत आहे. हा भाग नागमोडी आहे. या जिल्ह्यांत ह्या रेल्वे रस्त्याचे कामासाठी १४५ नवीन पूल केले असून या मार्गावर वानरोड व धूळघाट ही दोन स्टेशने आहेत व त्यांचा या भागांतील उत्तम प्रतीच्या लाकूड निर्यातीसाठी फार मोठा उपयोग होईल. या रेल्वे मार्गावर पूर्णा व तापी या दोन नद्या आहेत. या रेल्वे मार्गामुळे विकास कार्य अधिक जोराने चालण्यास मदत होईल.

**पोस्ट ऑफिसेस**

अमरावती जिल्ह्यांतील २,००० किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या सर्वच गांवात पोस्ट ऑफिसेस आहेत. ५०० किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या सर्वच खेड्यापासून २ मैलाचे आंत पोस्ट ऑफिस आहे. जिल्ह्यांत २४४ ब्रँच पोस्ट ऑफिसेस-३२ सब-ऑफिसेस, अमरावती येथे १ हेड पोस्ट ऑफिस, अशी एकूण २७७ पोस्ट ऑफिसेस आहेत.

# अमरावती जिल्हा

## दळणवळण



**तार व टेलिफोन व्यवस्था**

जिल्ह्यांत अमरावती, अचलपूर, परतवाडा, अंजनगांव, बडनेरा, चांदूर रेल्वे, चांदूर बाजार, चिखलदरा, दर्यापूर, धामणगांव, धारणी, गुरुकुंज (मोझरी), करजगांव, मोर्शी, नांदगांवपेठ, शेंदुरजना घाट, शिरसगांव कसबा, वलगांव, वरूड व येवदा या गांवांना तार व टेलिफोनची व्यवस्था आहे.

## अमरावती जिल्ह्यांतील प्रवासी लोकांना उतरण्यासाठी सरकारी बंगले

### सर्किट हाऊस : ३

(१) अमरावती. (२) अचलपूर (परतवाडा). (३) चिखलदरा.

### इन्स्पेक्शन बंगले (वर्ग १) : ६

(१) अमरावती. (२) अचलपूर. (३) बडनेरा.
(४) घटांग. (५) मोर्शी. (६) वरुड.

### इन्स्पेक्शन बंगले (वर्ग २) : १६

(१) अंजनगांव. (२) आसेगांव. (३) बेलकुण्ड.
(४) बेनोडा. (५) चांदूर बाजार. (६) चांदूर रेल्वे.
(७) चिखलदरा. (८) दर्यापूर. (९) धारणी.
(१०) धामणगांव. (११) हरिसाल. (१२) खाटली.
(१३) पुसला. (१४) सेमाडोह. (१५) सावरखेड.
(१६) तिवसा.

### जंगल खात्यातील बंगले : १९

(१) पोहरा. (२) मेहदरी. (३) रायपूर. (४) माखला.
(५) हातरू. (६) बेटूम. (७) कोलकाडा. (८) चुणखेडी.
(९) जारीदा. (१०) राहूर. (११) रंगुबेली. (१२) चौराकुंड.
(१३) तारुबांदा. (१४) रंगराव. (१५) धारगड. (१६) कोगटू.
(१७) पातुलडा. (१८) चिखलदरा ब्रेसाईड. (१९) चिखलदरा पीचग्रोव्ह.

# ९. वीज पुरवठा

अमरावती जिल्ह्यास नागपूरजवळच्या खापरखेडा दक्षिण थर्मल ग्रीड वीज केंद्रांतून वीज पुरवठा होतो. या केंद्रातून सध्या ६०,००० किलोवॅट शक्ति निर्माण होते. यांत ३०,००० किलोवॅट शक्तीची वाढ करण्यांत येत असून लवकरच हे केंद्र ९०,००० किलोवॅट शक्तीचे होईल. आकोल्याजवळ पारस येथेहि ३०,००० किलोवॅट शक्तीचे एक नवे पॉवर हाऊस बांधण्यांत आलें आहे. तेथून या जिल्ह्यांतील कांही भागांस वीज पुरवठा होऊ शकेल.

वीज पुरवठ्याची शक्ति वाढल्यावर नव्या उद्योगधंद्यांना वीज पुरवठा करणे शक्य होईल. हल्लीच्या जिनिंग व प्रेसिंग फॅक्टऱ्याहि व ऑईल मिल्स, हातमाग वगैरेहि वीजेवर चालविता येतील.

शेतीकरिता पाणी उपसण्यासाठी वीजेचे पंप बसविता येतील. त्यामुळे ओलिताखालचे क्षेत्र वाढेल व अशा रीतीने या जिल्ह्याचे औद्योगिकरण व भरभराट होण्यास हातभार लागेल.

या जिल्ह्यांत सध्या सुमारे साडे तीन हजार विजेचे पंप चालू आहेत. खालील १२३ गांवांना वीजेचा पुरवठा झालेला आहे :—

**अमरावती तहसील.**—अमरावती, बडनेरा, बानोडा, बोरगांव, बनतगांव, कार्ली, मनसाला, नांदगांव, खंडेश्वर, नवसारी, रहाटगांव, रेवसा, शेगांव, वलगांव, वडगांव, अंजनगांववारी, लालखेडी.

**अचलपूर तहसील.**—अचलपूर, अबदुलपुरा, आरेगांव, बोपापूर, ब्राम्हणवाडा, एकलासपूर, हरम, गौलखेडा, जवर्डी, जीवनपुरा, करजगांव, कांडली, कोठेरा, कविठा, कुंडनपूर, कुरहा, खिराळा, खानीजानगर, काकडा, खाडेगांव नाका, कुष्ठा, माधान, काजळी, नौसारी, नौबाग, नारायणपूर, शिरसगांव, नरसरी, निमखेड, परतवाडा, पथरोट, हिवरखेड, पापलूसपूर, पांढरी, रायपूरा, शिरसगांव, सापना, सालेपूर, शिंदी बुजरुक, शेगांव, सुलतानपुरा, तोंडगांव, टवलार, वडगांव, फलेगांव, चांदूर बाजार, देउरवाडा, धोतरखेडा, धामणगांव.

**मोर्शी तहसील.**—आखतवाडा, बोरगांव, दापोरी, हिवरखेड, जरुड, मोर्शी, मलकापूर, पुसला, पाचलेगांव, शेंदुरजना, सातनूर, नेर पिंगळई, शिरखेडा, टेंभूरखेडा, वल्लभनगर, वरुड, रिथपूर, खापरखेडा, सुरळी, कुरळी, रोसनखेडा, पारडी (वरुडजवळ), पारडी (मोर्शीजवळ), पिंपळखुटा (जरुडजवळ), पिंपळखुटा (मोर्शीजवळ), लिहिदा, करजगांव (जरुडजवळ).

**मेळघाट तहसील.**—सावनगांव, लोणी, चिखलदरा.

**दर्यापूर तहसील.**—अंजनगांव, अडगांव, भंडारज, चौसाळा, दर्यापूर, कारला, लखड, सुजरी, वडनेरगंगाई, येवदा, कपूसतळणी, टारखेडा, धोणेगांव.

**चांदूर तहसील.**—आमला, आसेगांव, चांदूर रेल्वे, धामणगांव, दत्तापूर, धनोडी, शेंदुरजना खुर्द, तळेगांव, राजना, तळेगांव दशासर, वऱ्हा, धामणगांव (जुने), मंगरुळ दस्तगीर, तळेगांव ठाकूर, मोझरी, शेंदूरजना, तिवसा.

**वीज वापरांत झालेली वाढ**

| | | एप्रिल १९५१ | मार्च १९६१ |
|---|---|---|---|
| १. | वीज मिळणारी शहरें ... ... ... ... | २ | १३ |
| २ | वीजपुरवठा झालेली खेडीं ... ... ... ... | ... | ११० |
| ३ | घरगुती वीज वापरणारी घरें—संख्या ... | १,८२० | १०,३८७ |
| ४. | मोठ्या कारखान्यासाठी हायटेंशन ग्राहक ... ... | १ | २८ |
| ५ | शेतपाणी पुरविण्यासाठी वीज पंप ... ... | २१ | २,१५३ |
| ६ | वार्षिक विजेचा खप (युनिटमध्ये) ... ... | ७००,००० | १,६८०,२७३ |
| ७. | किलोवॅटस्‌मध्ये दाव ... ... ... ... | ६४३ | १,९०८,५६१ |

# १०. शिक्षण

**शिक्षण**

अमरावती जिल्ह्यांत एकूण १,५८४ गांवें आहेत. त्यापैकी ८५ खेड्यांत २५ हून कमी वस्ती आहे. ७८७ खेड्यांत व १७ शहरांत अशा ८०४ गांवांत प्राथमिक शाळा आहेत. ३०० ते ५०० लोकसंख्या असलेल्या १७ खेड्यांत व ५०० किंवा त्याहून जास्त लोकसंख्या असलेल्या १५ खेड्यांत जरी प्रत्यक्ष शाळा नसल्या तरी गांवांपासून एक मैलाचे आंतच शाळेची सोय आहे.

शिक्षणाचे बाबतींत हा जिल्हा आघाडीवर आहे. साक्षरतेचे जिल्ह्यांतील प्रमाण ३३.६ टक्के आहे. महाराष्ट्र राज्यांत साक्षरतेचे प्रमाण २९.७ टक्के आहे, हे लक्षांत घेता जिल्ह्याची प्रगति उल्लेखनीय आहे.

**पूर्वप्राथमिक शाळा**

प्राथमिक शाळेत दाखल करण्यापूर्वी लहान मुलांना चांगल्या संवयी लावणें, उत्तम वळण लावणें, खेळता खेळता त्यांच्या प्रवृत्ती कोणीकडे आहेत त्याचे निरीक्षण करणें, हे महत्वाचे कार्य बालक-मंदिरें करूं शकतात. त्या दृष्टीने बालक मंदिराचे महत्व आता पटले असून खेड्यापाड्यांतसुद्धा बालक मंदिरें सुरू होत आहेत. अमरावती जिल्ह्यांत एकूण ३५ बालक मंदिरें असून, त्यांत ८५० मुलें व ७५० मुली असे एकूण सहा वर्षांचे आंतील १,६०० बालविद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

**प्राथमिक शाळा**

या जिल्ह्यांत मुलांच्या १,०७४ प्राथमिक शाळा असून त्यांत ९०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मुलींच्या प्राथमिक शाळा ८६ असून त्यांत ३३,५०० मुलं शिक्षण घेत आहेत. अशा रीतीने प्राथमिक शिक्षण घेणारे विद्यार्थी व विद्यार्थीनी यांची एकूण संख्या १,२३,५०० आहे. सुमारे सव्वालक्ष विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी ४,५२१ प्राथमिक शिक्षक अमरावती जिल्ह्यांत शिक्षण देण्याचे पवित्र कार्य करीत आहेत. त्यापैकी ४,५२१ शिक्षक व ७३१ शिक्षिका आहेत. जिल्ह्यांत दहा प्राथमिक ट्रेनिंग कॉलेजेस असून दरवर्षी सुमारे एक हजार शिक्षकांना त्यांचा फायदा मिळतो.

**सक्तीचे शिक्षण**

सहा ते अकरा वयाच्या विद्यार्थ्यांना सक्तीचे मोफत शिक्षण मिळत असून त्याचा फायदा २१,००० विद्यार्थी व १,००० विद्यार्थीनी अशा एकूण २२,००० विद्यार्थ्यांना होतो.

**मूलोद्योग शाळा**

प्राथमिक शिक्षण देतांनाच मुलांना त्यांच्या पुढील आयुष्यांत उपयोगी पडेल अशा दृष्टीने एखादा व्यवसाय, उदाहरणार्थ शेती, विणकाम वगैरे शिकविण्यासाठी मूलोद्योग शिक्षणाची व्यवस्था अमरावती जिल्ह्यांत केली असून, उत्तर बुनियादी शाळा ५३ व कनिष्ट बुनियादी शाळा १३ अशा एकूण ६६ मूलोद्योग शाळा जिल्ह्यांत आहेत. त्यापैकी बहुतेक सूतकताई व विणकामाचे शिक्षण देतात. शेतीचे शिक्षणासाठी जिल्ह्यांत तीन विद्यामंदिरें आहेत.

**माध्यमिक शिक्षण**

माध्यमिक शिक्षणाची तरतूद या जिल्ह्यांत सरकार व खाजगी संस्था यांनी केली आहे. खाजगी संस्थांना या कार्यासाठी जिल्हा परिषद मदत देते. माध्यमिक शिक्षण देणाऱ्या अनेक शाळा विदर्भ विभागांत खाजगी संस्थांकडूनच चालविण्यात येतात. जिल्ह्यांत माध्यमिक व उच्च माध्यमिक मिळून एकूण १३० शाळा आहेत.

या जिल्ह्यांत मुलींसाठी १३ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा असून त्यांत सुमारे ३,६०० मुली शिक्षण घेत आहेत.

अमरावती जिल्ह्यांत उच्च शिक्षणाचीहि सोय विविध विषयांकरिता उपलब्ध आहे.

**उच्च शिक्षण**

अमरावती येथे सरकारी विदर्भ महाविद्यालय असून तेथे आर्टस् व सायन्स हे विषय शिकविले जातात. शिवाय शिवाजी शिक्षण संस्थेचे आर्टस्, सायन्स, कॉमर्स, लॉ अॅग्रीकल्चर तसेच शारीरिक शिक्षणाचे कॉलेजेस व बी. टी. कॉलेजेस चालू आहेत. अमरावती येथे राज महाविद्यालय, दर्यापूर व वरूड येथेहि शिवाजी शिक्षण संस्थेचे दोन आर्टस् कॉलेजेस अशी तीन नवीन कॉलेजेस उघडण्यांत आलीं आहेत. जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळातर्फे अचलपूर येथे जगदंबा महाविद्यालय आणि भारतीय विद्या प्रसारक मंडळातर्फे अमरावती येथे भारतीय महाविद्यालय नुकतेच सुरू झाले आहे. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे शारीरिक शिक्षणाचे कॉलेज चालू आहे. तसेच सरकारी बी. टी. कॉलेजहि चालू आहे. आयुर्वेद शिक्षणाची तीन कॉलेजेस अमरावती जिल्ह्यांत आहेत.

**तांत्रिक शिक्षण**

अमरावती येथे एक पॉलीटेक्नीक असून तेथे सिव्हिल, मेक्यानिकल व इलेक्ट्रीकल इंजिनियरींग शिक्षणाची व्यवस्था आहे. दरवर्षी ६० विद्यार्थ्यांना या संस्थेत प्रवेश मिळतो. या संस्थेकरितां सुमारे सव्वीस लक्ष रुपये किंमतीची नवीन इमारत पूर्ण होईल. याशिवाय उच्च माध्यमिक स्तरावर तांत्रिक शिक्षण मिळावे, म्हणून कला निकेतनमध्ये दरवर्षी ९ व्या वर्गात १२० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येतो.

माध्यमिक शिक्षणासाठी अमरावती येथे एक व्होकेशनल हायस्कूल, कलानिकेतन (गव्हर्नमेंट टेक्निकल हायस्कूल) व एक सरकारी इंडस्ट्रीयल ट्रेनिंग इन्स्टिटचूट आहे.

अमरावती जिल्ह्यांत एकूण १७६,००० विद्यार्थी असून जिल्ह्यांची एकूण १,२३२,७८० लोकसंख्या लक्षांत घेतां विद्यार्थ्यांचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण सुमारे १७ टक्के पडते.

सरकारतर्फे १९५६ मध्ये एक जिल्हा ग्रंथालय सुरू करण्यांत आले. या ग्रंथालयातर्फे खेडोपाडी उपकेंद्रे सुरू करून ग्रामीण भागांतून अक्षर वाङ्मयाची आवड व प्रसार करण्यांत येतो. सध्या ४६७

**ग्रंथालये**

उपकेंद्रातून वाचकांना वाचनीय साहित्य पुरविण्यांत येते. २४,२२९ वाचक या उपकेंद्रांतून पुस्तके आणि साहित्य नेतात. याशिवाय १४ खाजगी ग्रंथालये जिल्ह्यांत आहेत.

# ११. आरोग्य व सार्वजनिक स्वास्थ्य

अमरावती जिल्ह्यांत २५ मोठे सरकारी दवाखाने आहेत. त्यापैकी पांच अमरावती शहरांत आहेत.

**सरकारी दवाखाने—**

(१) ईरविन हॉस्पीटल.
(२) डफरिन हॉस्पीटल.
(३) कॅंप हॉस्पीटल.
(४) गोपीकिसन गणेशदास राठी टी. बी. हॉस्पीटल (२५ रूग्णांची व्यवस्था).
(५) विदर्भ महाविद्यालय इस्पितळ.

उरलेले २० अॅलोपथीक दवाखाने (जेथे संरकारद्वारा रूग्णांची राहण्याची सोय आहे असे दवाखाने) जिल्ह्यांत आहेत.

**अचलपूर तहसील—**

(१) सिटी हॉस्पीटल, अचलपूर.
(२) कॅम्प हॉस्पीटल, अचलपूर.
(३) चांदूर बाजार हॉस्पीटल.

**चांदूर रेल्वे तहसील—**

(४) चांदूर रेल्वे हॉस्पीटल.
(५) धामणगांव हॉस्पीटल.
(६) तळेगांव दशसहस्त्र हॉस्पीटल.
(७) तिवसा हॉस्पीटल.

**दर्यापूर तहसील—**

(८) दर्यापूर हॉस्पीटल.
(९) खोलापूर हॉस्पीटल.
(१०) अंजनगांव हॉस्पीटल.
(११) कोकर्डा हॉस्पीटल.
(१२) कापुसतळणी हॉस्पीटल.
(१३) साउर हॉस्पीटल.

**मेळघाट तहसील—**

(१४) धारणी हॉस्पीटल.
(१५) चिखलदरा हॉस्पीटल.

**मोर्शी तहसील—**

(१६) वरूड हॉस्पीटल.
(१७) मोर्शी हॉस्पीटल.
(१८) शेंदूरजना हॉस्पीटल.
(१९) शिरखेड हॉस्पीटल.

**अमरावती तहसील—**

(२०) मोदी हॉस्पीटल बडनेरा.

अमरावती जिल्ह्यांत जिल्हा परीषदेद्वारा खालील ॲलोपॅथिक दवाखाने (डिस्पेन्सरीज) चालविण्यांत येतात :—

**दवाखानें**—

(१) नांदगांव खंडेश्वर.
(२) वलगांव.
(३) धानोरा फशी.
(४) आसरा.
(५) नेरपिंगळाई.
(६) लोणी.
(७) जरूड.
(८) खेड.
(९) सिमाडोह.
(१०) कुऱ्हा.
(११) येवदा.
(१२) अडुळा बाजार.
(१३) अंजनसिंगी.
(१४) कोकर्डा.
(१५) कापूसतळणी.
(१६) शिराळा.

व एकूण ५७ आयुर्वेदिक दवाखाने चालविण्यात येतात :—

(१) अंजनगांव बारी.
(२) वाढोणा रामनाथ.
(३) टाकरखेडा.
(४) भातकुली.
(५) पळसमंडळ.
(६) यावली.
(७) माहुली चोर.
(८) वाठोडा शुक्लेश्वर.
(९) नांदगांव पेठ.
(१०) मंगरूळ चवाळा.
(११) नांदूरा बुजरूक.
(१२) पापळ.
(१३) माहुली जाहागिर.
(१४) पिंपळगांव निपानी.
(१५) फुल आमला.
(१६) आष्टी, चांदूर रेल्वे.
(१७) वऱ्हा.
(१८) मालखेड.
(१९) मंगरूळ दस्तगीर.
(२०) विरूळ रोंघे.
(२१) जवळा.
(२२) धामक.
(२३) झाडगांव दर्यापूर.
(२४) भंडारज.
(२५) सातेगांव.
(२६) खल्लार.
(२७) शिरसगांव कसबा.
(२८) घाटलाडकी.
(२९) चमक.
(३०) हिरूर.
(३१) काकडा.
(३२) शिंदी बुजरूक.
(३३) कुरळ.
(३४) आसेगांव पूर्णा.
(३५) असतपूर.
(३६) ब्राम्हणवाडा थडी.
(३७) तळवेल.
(३८) कुऱ्हा.
(३९) देउरवाडा.
(४०) सोनोरी.
(४१) पथ्रोट.
(४२) करजगांव.
(४३) बेनोडा.
(४४) पिंपळगांव कुऱ्हा.
(४५) राजुरा बाजार.
(४६) एकदरा.
(४७) आडगांव.
(४८) धामणगांव.
(४९) वेलोरा.
(५०) रिथपूर.
(५१) हिवरखेड.
(५२) पावनी.
(५३) मंगरूळी.
(५४) बैरागड.
(५५) सुसुर्दा.
(५६) काटकुंभ.
(५७) गौरखेडा.

या शिवाय खालील चार धर्मार्थ खाजगी आयुर्वेदिक दवाखाने अमरावती शहरांत आहेत :—

**धर्मार्थ दवाखानें**—

(१) जोग धर्मार्थ हॉस्पीटल.
(२) आयुर्वेद कॉलेजला जोडलेला आयुर्वेद दवाखाना.
(३) सत्यभामा आयुर्वेदिक दवाखाना.
(४) मुळे आयुर्वेद दवाखाना.

**सार्वजनिक स्वास्थ्य योजना**

अमरावती जिल्ह्यांत सार्वजनिक स्वास्थ्य योजना १९५८ च्या मे महिन्यांत लागू करण्यांत आली. त्या अन्वये जिल्हा स्वास्थ्य अधिकारी (डिस्ट्रीक्ट हेल्थ ऑफीसर) नेमण्यांत येऊन सार्वजनिक स्वास्थ्य विभागाचे काम त्यांच्याकडे सोपविण्यांत आले.

सार्वजनिक स्वास्थ्य योजनेप्रमाणे जिल्हा स्वास्थ्य अधिकाऱ्याचे हाताखाली प्रत्येक तालुक्याला एक स्वास्थ सहाय्यक व एक सॅनिटरी इन्स्पेक्टर असतो. सॅनिटरी इन्स्पेक्टरकडे एक सॅनिटरी पथक असते. जिल्ह्यासाठी सांथीचे रोगाकरिता विशेष आरोग्याधिकाऱ्याची (अेपिडेमिक मेडिकल ऑफिसरची) नेमणूक झालेली आहे.

सार्वजनिक स्वास्थ्य विभागाचे जिल्ह्यांतील मुख्य कार्य म्हणजे रोगराई होऊं नये म्हणून उपाय-योजना करणें होय. त्याबरोबर प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थापणे व निरनिराळया विकास खंडातील केंद्राची देखरेख करणे हे या विभागाचे महत्त्वाचे कार्य होय.

अमरावती जिल्ह्यांत सध्या खालील प्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्रे असून प्रत्येक केंद्राची ३ उपकेंद्रे आहेत :—

**आरोग्य केंद्रे—**

| सेंटर्स (केंद्रे) | सबसेंटर्स (उपकेंद्रे) |
|---|---|
| (१) प्राथमिक आरोग्य केंद्र, वरूड. | (१) लोणी, (२) शेंदूरजना, (३) पुसला. |
| (२) प्राथमिक आरोग्य केंद्र, मोर्शी. | (१) हिवरखेड, (२) अंबाडा, (३) शिरखेड. |
| (३) प्राथमिक आरोग्य केंद्र, अंजनगांव. | (१) कोकर्डा, (२) सातेगांव, (३) कापूस-तळणी. |
| (४) प्राथमिक आरोग्य केंद्र, दर्यापूर. | (१) खोलापूर, (२) साउर, (३) माहुली-जहांगीर. |
| (५) प्राथमिक आरोग्य केंद्र, तिवसा. | (१) वऱ्हा, (२) वरखेड. |
| (६) प्राथमिक आरोग्य केंद्र, तळवेल. | (१) करजगांव, (२) ब्राम्हणवाडा, (३) आसेगांव. |
| (७) प्राथमिक आरोग्य केंद्र, पथ्रोट | (१) शिंदी बु. (२) असतपूर, (३) रासेगांव. |
| (८) प्राथमिक आरोग्य केंद्र, चिखलदरा. | (१) सिमाडोह, (२) कुलगना, (३) चुर्णी. |
| (९) प्राथमिक आरोग्य केंद्र, धारणी. | (१) हरिसाल, (२) साद्राबाडी, (३) चाकर्दा. |
| (१०) प्राथमिक आरोग्य केंद्र, निंबोली. | (१) तळेगांव दशसहस्त्र, (२) घुईखेड, (३) धानोडी. |

प्राथमिक केद्रांत चिकित्सा विभागाबरोबरच प्रतिबंधक उपाय योजना व स्वास्थ्यवर्धक योजना कार्यान्वित केल्या जातात. माता बालसंगोपन, कुटुंब-नियोजन, कुष्ठ-निवारण, दुग्ध-वितरण यावर विशेश भर देण्यांत येतो. हेल्थ व्हीजिटर, मिडवाईव, स्वास्थ्य निरीक्षक, लेपर्स टेक्निशियन्स इत्यादि कार्यकर्त्यांना केंद्रावर नियुक्त करण्यांत येत असून प्राथमिक स्वास्थ्य केंद्राचे डॉक्टर्स त्यावर देखरेख व मार्गदर्शन करतात.

**कुष्ठ रोग**

आजपर्यंत केलेल्या पहाणीप्रमाणे अमरावती जिल्ह्यांत कुष्ठरोगाचे प्रमाण २.५ प्रतिशत आहे. गेल्यावर्षापासून वरूड, दर्यापूर व अंजनगांव या प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रत्येकी एक पहाणी, शिक्षण व उपचार केंद्रे आहेत आणि मोझरी, धारणी व तिवसा येथेहि अशी केंद्रे लवकरच स्थापन होतील.

अमरावती येथे एक लेप्रसी इरॅडिकेशन युनिट (कुष्ठरोग निर्मूलन केंद्र) असून ७० खेडयांतल्या ७०,००० लोकसंख्येला त्याचा उपयोग होतो. पहाणी व औषधि वितरणाचे काम हे पथक करते. वलगांव, नांदगांवपेठ, बडनेरा व भातकुली येथे दवाखान्यांतून उपचार करण्यांत येतात.

**उपचार केंद्र**

काशिखेड येथे एक महारोग उपचार केंद्र असून तेथे एक स्वास्थ्य सहाय्यकहि आहे व तो चार अुप-केंद्रावर जाऊन औषधोपचाराचे कार्य नियमितपणे करतो.

**खाजगी संस्थांचे कार्य**

श्री. जगदंबा कुष्ठ निवास महारोगी सेवा मंडळ (तपोवन), अमरावती येथेसुमारे ५०० कुष्ठ रोग्यांची उपचाराची सोय आहे. शेंदुरजना बाजार येथे एक उपकेंद्रहि उघडले आहे.

**प्रशिक्षणाची सोय**

कुष्ठरोग उपचारासाठी येथे एक नऊ महिन्याचा अभ्यासक्रम सुरू करण्यांत आला आहे. मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यांना या वर्गात प्रवेश मिळतो. शिक्षण चालू असतांना ५५ रुपये दरमहा विद्यावेतन मिळते. नऊ महिन्याच्या अभ्यासक्रमानंतर या प्रशिक्षणार्थींना कुष्ठरोग निवारण कार्यात नोकरी मिळते.

(२) अचलपूर तहसिलीत कोठारे येथे मिशनतर्फे कुष्ठ केंद्र चालविण्यांत येते. तेथे ३५० कुष्ठ रोग्यांची व्यवस्था आहे. चांदूर बाजार येथे त्यांच्यातर्फे एक सब-सेंटर उघडले आहे.

(३) पळसमंडळ येथे कस्तुरबा संस्थेतर्फे महारोगी निवारण सेवा संस्थेचे पहाणी, शिक्षण व उपचार केंद्र कार्य करीत आहे.

(४) कृषि सुधार मंडळामार्फत काशिखेड येथे एक लेप्रसी कॉलनी असून हल्ली दहा रोग्यांची तेथे सोय करण्यांत येते.

अमरावती जिल्ह्यांची लोकसंख्या गेल्या साठ वर्षांत कशी वाढली हे खालील आकड्यांवरून दिसून येईल :—

| वर्ष | | | लोकसंख्या | वाढ |
|---|---|---|---|---|
| सन् १९०१ | ... | ... | ८०६,८५९ | ... |
| सन् १९११ | ... | ... | ८७३,०१२ | ६६,१५३ |
| सन् १९२१ | ... | ... | ८२७,८६७ | —४५,१३५ |
| सन् १९३१ | ... | ... | ९४१,६०४ | ११३,७३७ |
| सन् १९४१ | .. | ... | ९८८,५२४ | ४६,९२० |
| सन् १९५१ | .. | ... | १,०३१,१६० | ४२,४३६ |
| सन् १९६१ | ... | ... | १,२३२,७८० | २०१,६२० |
| | | | एकूण वाढ ... | ४२५,९३९ |

**कुटुंब-नियोजन केंद्रे :**

या वरून हे दिसून येईल की पहिल्या महायुद्धाचे वेळची (१९२१ ची) खानेसुमारी सोडली तर प्रत्येक खानेसुमारीस या जिल्ह्याची लोकसंख्या वाढत आहे.

वाढत्या लोकसंख्येस आळा घालण्यासाठी अमरावती जिल्ह्यांत अंजनगांव, दर्यापूर, मोर्शी, वरूड, तळवेल, तिवसा व चिखलदरा येथे सात सरकारी कुटुंब-नियोजन (सुधार) केंद्रे सुरू आहेत. या केंद्रांत कुटुंबनियोजनासंबंधी शास्त्रीय माहिती दिली जाते व लोकांना साधने व औषध मोफत पुरविली जातात. शस्त्रक्रिया लोकप्रिय करण्यासाठी शस्त्रकिया शिबिरे घेण्यांत येतात. आतापर्यंत ५०० चे वर शस्त्रक्रिया निरनिराळ्या शिबिरांतून करण्यांत आल्या.

वरील सात सरकारी केंद्राशिवाय वनितासमाज, अमरावती, गुरुकुंज हॉस्पीटल, मोझरी या संस्थांकडून कुटुंब-नियोजन केंद्रे चालविण्यांत येतात व त्यांना सरकारी अनुदान देण्यांत येते.


अमरावती जिल्हा
आरोग्य व्यवस्था
धारणी
सेमाडोह
चिखलदरा
कोठारा
अचलपूर कँप
अचलपूर सिटी
पथ्रोट
चांदूर बाजार
खेड
मोर्शी
शेंदूरजनाघाट
वरुड
जरुड
अंजनगाव (सुर्जी)
कापूसतळणी
कोकर्डी
येवदा
अडुळा
दर्यापूर
भातकुली
साऊर
शिराळा
बडनेरा
अमरावती
आसरा
धानोरा
तिवसा
मोझरी
कुऱ्हा
आमला
अंजनसिंगी
चांदूर रेल्वे
निंबोली
धामणगांव
तळेगाव दशासार
प्राथमिक स्वास्थ्य केंद्र
क्षयरोग रुग्णालय
दवाखाने
नगरपालिका मान्य दवाखाने
शासकीय महारोग निवारण केंद्र
खाजगी महारोग निवारण केंद्र
शासकीय कुटुंब सुधार केंद्र
खाजगी संस्थांची कुटुंब सुधार केंद्रे
जनपद-सभा मान्य दवाखाने

**खाजगी सूतिका गृह** धापीबाई मॅटर्निटी होम व कस्तुरबा मॅटर्निटी होम, माधान, या सूतिकागृहांना सरकारी मदत देण्यांत येते.

डफरीन हॉस्पीटलमध्ये दोन वर्षाचा नर्सिंग व दायींचे शिक्षण देणारा प्रशिक्षण वर्ग आहे.

**प्रशिक्षण कार्यक्रम :** तसेच दाई वर्गाचा शिक्षणक्रम गुरुदेव हॉस्पीटल, गुरुकुंज आश्रम मोझरी येथे व दुसरा डफरीनमध्ये आहे. ईर्विनमध्ये नासिंगचा तीन वर्षाचा प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम आहे.

**क्षयरोग निवारण** १९६० साली विदर्भ विभागाच्या बी.सी.जी. टीमने अमरावती जिल्ह्याची पाहणी केली व १०२,७८६ माणसांची तपासणी करून ४१,८०६ व्यक्तींना क्षयरोग प्रतिबंधक लस टोचली.

गेल्या सात वर्षापासून अमरावती जिल्ह्यांत राष्ट्रीय मलेरिया प्रतिबंधन केंद्र कार्य करीत असून त्याचे मुख्य केंद्र अचलपूर येथे ठेवण्यांत आले आहे. या पूर्वी आकोला व अमरावती जिल्ह्यांतील विशिष्ट

**मलेरिया प्रतिबंधन केंद्र** भागापुरतेच हे केंद्र कार्य करीत असे. परंतु आता पूर्ण अमरावती जिल्ह्यासाठीच हे स्वतंत्र केंद्र करण्यांत आले असून त्यासाठी एका स्वतंत्र मलेरिया प्रतिबंधक अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांत आली आहे.

खाद्यपदार्थात भेसळ होऊ नये म्हणून सरकारने कायदेशीर उपाययोजना केली आहे. संशयित पदार्थांचे पृथःकरण करून ते शुद्ध आहेत किंवा त्यांत अन्य पदार्थ मिसळलेले आहेत, त्याचे पृथःकरण

**प्रादेशिक अन्न रसायन शाळा** करण्यासाठी अमरावती येथे एक प्रादेशिक अन्न रसायन शाळा उघडण्यांत आली असून, तेथे एका स्वतंत्र केमिस्टची नेमणूक करण्यांत आली आहे. विदर्भ विभागांतील चार जिल्ह्यासाठी ही रसायन शाळा कार्य करीत आहे. या चार जिल्ह्यांतील नगरपालिकांमार्फत खाद्यपदार्थ परीक्षणासाठी या रसायन शाळेकडे येत असतात.

जिल्ह्यांतील प्रायमरी सेंटर्स खेड्यांत असल्यामुळे तेथे संपूर्ण रसायन शाळेची सोय होणे शक्य नसते.

**रेफरनल लेबोरेटरी :** सर्व प्रायमरी सेंटर्ससाठी अमरावतीच्या ईर्विन हॉस्पीटलमध्ये एक रेफरनल लेबोरेटरीचा विभाग उघडण्यांत आला आहे.

अमरावती येथील ईर्विन हॉस्पीटलमध्ये गुप्तरोग उपचारासाठी एक विभाग उघडला असून

**गुप्तरोग उपचार** त्यासाठी एक स्वतंत्र इमारत बांधण्यांत आली आहे. गुप्तरोग उपचार कार्य स्वतंत्ररीत्या या इमारतीत चालू होईल.

जिल्ह्याच्या महत्वाच्या यात्रा कौंडिण्यपूर, बहिरम, सालबर्डी व ऋणमोचन वगैरे ठिकाणी पिण्याचे

**यात्रा-मेळे यांत प्रतिबंधक इलाज** स्वच्छपाणी पुरवठा, स्वच्छता (आरोग्य) व औषधोपचाराची व्यवस्था सार्वजनिक स्वास्थ्य खात्यामार्फत पाहण्यात येते.

अमरावती व दर्यापूर तालुक्यांतील विहिरींच्या खाऱ्या पाण्यामुळे लोकांना नळाचे पाणी प्यावे लागते. त्यामुळे कॉलरा होण्याचा संभव असतो. ही शक्यता टाळण्याचे प्रयत्नहि या स्वास्थ्य कार्यालयाद्वारा चालू असतात.

# १२. समाज कल्याण आणि आदिवासी कल्याण

हरिजन, गिरिजन व अन्य विमुक्त व आर्थिकदृष्टया मागासलेल्या लोकांचे विकासासाठी जिल्हयांत समाज कल्याण योजनेद्वारा कार्य चालू आहे. हे कार्य विविधप्रकाराने चालू आहे. अमरावती जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येपैकीं हरिजन लोकांची संख्या १,४३,४८५ चे वर आहे. आदिवासी लोकांची संख्या सुमारे ३६,००० आहे. या लोकांचे विकासासाठी घरे बांधण्यासाठी आर्थिक मदत व कर्ज, पाण्याचे व्यवस्थेसाठी (विहिरी बांधण्यासाठी) मदत, बैलगाड्या व बैल खरेदी करण्यासाठी, नवीन उद्योग सुरू करण्यासाठी, तालीमखाने व आखाडे यांचेसाठी, विद्यार्थ्यांना विद्यार्जन करता यावे यासाठी फी, पुस्तकें व राहण्याची, भोजनाची व्यवस्था करून देण्याचें कार्य यासाठी मदतहि समाजसेवा खात्यामार्फत दिली जाते.

आतापर्यंत हरीजन व आदीवासी लोकांच्या मुलांना शाळा कॉलेजात विद्यार्जन करता यावे यासाठी वसतिगृहें चालविण्याचे कार्य फार मोठ्या प्रमाणावर झालें असून जिल्हयांत ६ हरिजन वसतिगृहें व ३ आदिवासी वसतिगृहांना समाज कल्याण खात्यामार्फत मदत दिली जाते.

हरिजन वसतिगृहें पुढीलप्रमाणें आहेत :—

**हरिजनांसाठी व आदिवासींसाठी वसतिगृहे**

| | | विद्यार्थी |
|---|---|---|
| (१) | आदर्श विद्यार्थी वसतिगृह, अमरावती ... | ९० |
| (२) | श्रीराम शिक्षण संस्था, टाकरखेडा ... | ४० |
| (३) | दलितोद्धार वसतिगृह, परतवाडा ... | २० |
| (४) | हरिजन वसतिगृह, मोर्शी ... ... | २० |
| (५) | दलीत वर्ग विद्यार्थी वसतिगृह, वरूड ... | २० |
| (६) | गुरूदेव दलित वर्ग वसतिगृह, मोझरी ... | २५ |
| | एकूण ... | २१५ |

आदिवासी विद्यार्थी वसतिगृहें

| | | |
|---|---|---|
| (१) | अमरावती छात्रावास, अमरावती ... | ३० |
| (२) | विदर्भ आदिवासी सेवामंडळ वसतिगृह, अचलपूर. | २० |
| (३) | आदिवासी वसतिगृह, शेंदूरजनाघाट ... | २५ |
| | एकूण ... | ७५ |

याशिवाय सर्व जमातीय ५ वसतिगृहांतून ३० हरिजन विद्यार्थ्यांच्या रहाण्याची सोय करण्यांत येते.

कमी उत्पन्न असलेल्या पालकांचे मुलांना फीची सवलत या योजनेद्वारा देण्यांत येते. आतापर्यंत फक्त ९०० रुपयापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या पालकांचे मुलांनाच ही सवलत मिळत असे. महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर ही सवलत १,२०० रुपयापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या पालकांचे पाल्यांनाहि मिळू लागली व त्यामुळे या सवलतीचा फायदा अधिक विद्यार्थ्यांना होऊं लागला आहे. गेल्या २ वर्षात जिल्हयांतील १९,०५८ विद्यार्थ्यांना फायदा मिळाला व त्यासाठी ८,६९,८११ रुपयांची फी सरकारने भरली.

**फीची सवलत**

याशिवाय विद्यार्थ्यांना पुस्तकें व अन्य मदतहि या योजनेद्वारा देण्यांत येते.

हरिजन, गिरिजन व विमुक्त जातीचे लोकांना घरें बांधण्यासाठीहि या योजनेद्वारा मदत करण्यांत येते. साधारणपणे एक घर बांधण्यासाठी ७५० रुपये देण्यांत येतात. आतापर्यंत जिल्ह्यांत ८३ लोकांनी या योजनेचा फायदा घेतला असून ८३ घरे बांधण्यांत आली आहेत. यासाठी गेल्या २ वर्षात १,२२,२५० रुपये या खात्यातर्फे अनुदान देण्यांत आले.. याशिवाय विहिरी बांधण्यासाठी सवलतीचा फायदा लोक घेत असून, आतापर्यंत ३४ विहिरी बांधण्यांत आल्या आहेत. १०० गरजू लोकांना बैलगाड्या घेण्यासाठी तसेच बैल खरेदी करण्यासाठी या योजनेद्वारा मदत देण्यात आली आहे.

**हरिजनांसाठी घरें**

अस्पृश्यता निवारण कार्यहि करण्यांत येत आहे. या जिल्ह्यांत अस्पृश्यता बऱ्याच प्रमाणांत कमी झाली असून, गेल्या वर्षी अस्पृश्यता निवारण कार्य केल्याबद्दल सातेगांव या गांवाने जिल्ह्यांत पहिला क्रमांक पटकावून महाराष्ट्र राज्य शासनाद्वारा दिले जाणारे ५०० रुपयाचे पारितोषिक मिळविले आहे.

**अस्पृश्यता निवारण**

बाल गुन्हेगार, निराधार, अनाथ व कायद्याने शिक्षा झालेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी व त्यांचे संगोपन, संरक्षण करण्यासाठी याच योजनेद्वारा रिमांड होमहि या जिल्ह्यांत बडनेरा येथे सुरू करण्यांत आले आहे.

**रिमांड होम**

या कार्याशिवाय लोकांचे विकासासाठी लोकरंजन व लोकशिक्षणाद्वाराहि कार्य केल्या जाते. लोकांना विकासविषयक कार्यक्रम समजावून सांगण्यासाठी चित्रपट व कला पथकाचा संच याद्वारा काम घेण्यांत येत आहे.

**प्रचार कार्य**

राष्ट्रपतींच्या घोषणेनुसार मेळघाट तालुका अनुसूचित क्षेत्र म्हणून जाहीर झाला आहे.

मेळघाट हा प्रामुख्याने सातपुडा पर्वताने व्यापलेला आहे. सुमारे १,२७१ चौरस मैलाचा टापू राखीव जंगलाने व्यापलेला आहे. यांत सुमारे १८० वनग्रामे आहेत. जंगलांचे प्रमुख उत्पन्न म्हणजे सागवानी लाकूड व इतर इमारती लाकूड, तिखाडी, रोसा तेले, गवत व बांबू. तिखाडी गवतापासून रोसा तेलाचे उत्पादन करण्याचे कारखाने ह्या विभागांत आहेत. लाकूड कटाई, बांबू कटाईचे काम जंगल खात्यामार्फत होत असते.

**मेळघाट अनुसूचित क्षेत्र.**

सन् १९४६ पूर्वी ह्या विभागांत जंगल खात्यामार्फत, जनपद सभेमार्फत, नगरपालिका व शिक्षण खात्यांमार्फत प्राथमिक पाठशाला चालविण्यात येत असत. १९४६ नंतर आदिवासी कल्याण विभागामार्फत ह्या भागांत प्रथमतः १५ पाठशाळा सुरू करण्यांत आल्या. पुढे १९५४ नंतर मेळघाट तालुक्यातील सर्व प्राथमिक पाठशाळा आदिमजाती कल्याण विभागांकडे देण्यांत आल्या. आदिमजाती कल्याण विभागामार्फत ६३ प्राथमिक पाठशाळा, ३ माध्यमिक पाठशाळा आणि ३ वसतिगृहें चालविली जात असून प्राथमिक पाठशाळेतून २,४७७ मुले आणि ९१४ मुली शिक्षण घेत आहेत. त्यापैकी आदिवासी जमातीची १,७८० मुले असून ५२० आदिवासी मुली आहेत. माध्यमिक पाठशाळेतून १८४ मुले आणि १२ मुली शिक्षण घेत असून त्यांत ११८ मुले आणि ३ मुली आदिवासी जमातीच्या आहेत. वरील सर्व शाळांतून एकूण १३९ शिक्षक असून त्यापैकी ३३ आदिवासी जमातीचे व १३ हरिजन आहेत आणि २१ शिक्षक प्रशिक्षित आहेत. याशिवाय शिक्षणखात्यातर्फे एक विद्यालय धारणी येथे काढण्यांत आले आहे.

**आदिवासींचे शिक्षण**

आदिमजाती कल्याण विभागातर्फे खालील कार्य हाती घेण्यांत आलें :—

(१) प्राथमिक पाठशाळा, माध्यमिक पाठशाळा व वसतिगृहांची स्थापना करणे आणि त्यांचे संचालन. (२) आदिवासी जमातीचे सांस्कृतिक, सामाजिक आणि नैतिक विकास कार्य. (३) पशुसंवर्धन कार्य,

सान्डाची योजना. (४) कुक्कुट पालन योजना. (५) शतकी विकास योजना. (६) कुटिरोद्योग शिक्षण. (७) सहकारी दुकाने. (८) पाणीपुरवठा. (९) प्राथमिक उपचार केंद्र आणि परिचारिकामार्फत आदिवासी स्त्रियांना बाळंतपणात मदत. (१०) स्टॉकमनमार्फत जनावरांना औषधोपचार. (११) आदिवासीकरिता गृहनिर्माण योजना. (१२) गावकऱ्यांना शिक्षकामार्फत औषधोपचार आणि (१३) कायदासल्ल्याची मदत.

**विकास केंद्रे**

वरील कार्य एकसूत्रीपणाने चालण्याच्या हेतूने चिखलदरा, धारणी व साद्राबाडी येथे विकास केन्द्रे स्थापन करण्यांत आलेली आहेत आणि तेथे मन्डळ संघटक ह्या अधिकाऱ्यामार्फत ही कार्ये चालविली जातात. वरील सर्व ठिकाणी सरकारतर्फे वसाहत बांधण्यांत आलेली आहे.

शेतकी विकास योजनेतर्फे (५८-५९ मध्यें) ८६ आदिवासी पण गरीब कास्तकारांना २४,७०० रु. किंमतीच्या बैलजोडया, नांगर, बी-बियाणे, दुध-दुभत्याच्या गायी, म्हशी इत्यादि विनामूल्य अनुदान रूपाने वाटण्यांत आल्या आहेत. केंद्र सरकार पुरस्कृत योजनेप्रमाणे २० आदिवासी गरीब कास्तकारांना सोनापूर, दहिहंडा, कलमखार, धारणी व सादराबाडी येथे प्रयेकी १,००० रुपयांस एक याप्रमाणे घर बांधून देण्याचे कार्य सुरू आहे व ३ विहिरी खोदण्यांत आल्या आहेत. पुढील वर्षाकरितां पुन्हा १३ घरें आणि ६ विहीरींचें कार्य सुरू आहे.

आदिवासी जनतेत आरोग्याविषयीच्या सरकारी योजनाबद्दल प्रचार करण्याकरिता एक खास पथक उभारण्यांत आलेले असून कार्य जोमांत चालू आहे. परिचारिका गावोगांव हिंडून लहान आदिवासी मुलां-मुलींना स्नान घालून मुलांची निगा कशी राखावी ह्याचे प्रात्याक्षिक देत असतात. तसेच गर्भवती स्त्रियांना बाळंतपणानंतर लागणारी सर्व मदत या परिचारिका केंद्रातर्फे देण्यांत येते. प्रत्येक प्राथमिक शाळांतून मुलांना माध्यान्ह भोजन सरकारमार्फत देण्यांत येत असते. त्याकरिता मासिक ६० रुपये खर्च करण्यांत येतो. तसेच मुलींना मोफत कपडे वांटण्यांत येतात.

**कायद्याची मोफत मदत**

आदिवासी लोकांत कोर्ट-कचेरी, भांडण-तंटे करण्याची प्रवृत्ति सर्वसाधारण कमीच आढळते. तथापि काही प्रसंग निर्माण झाल्यास त्यांना कायद्याची मोफत मदत मिळण्याची सोय केली आहे.

**मनोरंजन**

करमणुकीद्वारा शिक्षण देण्यासाठीं या भागांत सिनेमाचे खास एक युनिट असून खेडोपाडी सिनेमाचे कार्यक्रम दाखविण्यांत येतात. प्रत्येक केंद्रांत एक रेडिओ ठेऊन रेडिओचे कार्यक्रम ऐकण्याची व्यवस्था आहे.

**नृत्यपथके**

साद्राबाडी येथील नृत्य पथक मुंबईस प्रजासत्ताक दिनास व काजळडोह येथील नृत्य पथक दिल्ली येथे जागतिक प्रदर्शनाचे वेळेस कार्यक्रम करण्यासाठी गेले होते. त्यांचे कार्यक्रम फारच लोकप्रिय ठरले. राष्ट्रपतींच्या हस्तें त्यांचा गौरव करण्यांत आला.

**आदिवासींचे जीवन**

कोरकू जमातीसंबंधी ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाही. त्याबद्दल अनेक दंतकथा प्रचलित आहेत. कोरकू जमात रावणाच्या वंशाची आहे असाहि एक प्रवाद आहे. रावणाचे राज्य उत्तर हिंदुस्थानपर्यंत पसरलेले होते. त्याचे कांही सरदार याहि भागांत वास्तव्य करीत असत. कोरकू लोक मेघनाथाची पूजा करतात. मेघनाथ हा रावणाचा पुत्र होता; व म्हणूनच त्यांचा संबंध रावणापर्यंत लावण्यात आलेला असावा. आर्यांनी दक्षिणेकडे मुलुखगिरी चालू केल्यानंतर त्यांचे या वन्य जातीशी संघर्ष चालू झाले. ज्या वन्य जाती आर्यांपुढे टिकाव धरू शकल्या नाहीत किंवा ज्या आर्यांमध्ये समाविष्ट होऊ शकल्या नाहीत त्यांनी जंगलाच्या पहाडी दऱ्याखोऱ्यांचा आश्रय घेतला आणि ते तेथेच आजपर्यंत राहिले व आपले वैशिष्ठ्य कायम ठेवले. आर्यांच्या चेहऱ्यामोहऱ्यापेक्षा ह्या जमातीच्या लोकांच्या चेहऱ्यामोहऱ्याची ठेवण अगदीच वेगळ्या घाटणीची आहे. त्यांचे नाकाची ठेवण थोडी चपटी असून केस कुरळे आहेत ; ओठ जाड असून रंगाने कृष्णवर्णी आहेत.

कोरकू ही भटकी जमात आहे. दऱ्याखोऱ्यांतून, दुर्गम पहांडातून ५ ते १०० घरापर्यंत वस्ती असलेली त्यांची गांवे दृष्टीस पडतात. थोड्या कारणाकरिता एक गांव सोडून दुसऱ्या गांवी ते सहज जाऊन आपली वसाहत करतात. ही प्रवृत्ति असण्याचे मुख्य कारण त्या लोकांना स्वत:च्या मालकीची जमीन नाही, हे असावे. गवत कटाई, लाकूड कटाई, जंगलातील रस्ते करणे, तसेच जंगलखात्याचे इतर काम करणे हाच त्यांचा मुख्य उद्योगधंदा आहे. ह्या कामाबद्दल त्यांना एक ते दीड रुपयापर्यंत मजूरी मिळते. जंगलखात्यामार्फत ह्या लोकांना पूर्वी खानगी गाड्या मिळत. खानग म्हणजे फॉरेस्टचा टाकाऊ माल लायसन्सवर कापून विकण्याची सवलत. अशा मालावर त्यांना पूर्वी ४० ते ५० रु. पर्यंत उत्पन्न मिळत असे. या सवलतीचा दुरूपयोग होतो, असे जेव्हा जंगलखात्यास आढळून आले, तेंव्हा ह्या पद्धतीवर आता बरेच नियंत्रण बसविण्यांत आले आहे. वन ग्रामातून राहणाऱ्या कोरकूंना जंगल खात्याचे कायद्याप्रमाणे घरामागे एक, ह्याप्रमाणे मजूर द्यावा लागतो. त्याबद्दल त्याला मजुरी मिळते. अशा कामास कोरकू लोक बिगार म्हणतात. अशी मजूरी त्यांना सर्वत्र वर्षभर मिळत असते. ह्याशिवाय लोककर्म विभागाची कामे असतात. त्यातहि हे लोक मजूरी करतात. जंगल खात्याने कोरकु लोकांना स्थायीपणा आणण्याचे हेतूने जमिनी दिल्या आहेत. त्यांत ते शेती करतात. त्यांना प्रत्येक जोडी मागे १ रु. कर द्यावा लागतो. ह्यांची शेते मुख्यत: तांदुळ, गहूं, हरबरा, मसूर, बटाटे, मिरची पिकविणारी आहेत. धान्याचा साठा करून ठेवण्याची प्रवृत्ति ह्या लोकांत सहसा आढळत नाही. हे लोक फार कर्जबाजारी आहेत. त्यांच्या सवयी त्याला कारणीभूत आहेत. सर्वसाधारण हे लोक मांसाहारी आहेत. एका मासळीकरिता संपूर्ण दिवस खर्च करतील ; तर सशाच्या मागे लागून सारा दिवस घालवतील. शिकार सर्वांनी मिळून खाण्याची प्रथा आहे. जमिनीवरून वाघाची शिकार हे लोक सहज करतात. झाडावर मचाण बांधून गाऱ्यावर हेला अथवा बकरा बांधून शिकार करण्याऱ्या लोकांची हे लोक आपसात निर्भत्सना करितात.

**धार्मिकता**

माता पूजा व देवी पूजेवर ह्यांचा विश्वास आहे. प्रत्येक गांवी वर्गणी गोळा करून देवीची पूजा केली जाते. देवीला बकरा बळी दिला जातो. गांवाबाहेर स्वयंपाक करून ते भोजन करतात. मांसाचा तुकडा तांदुळ अगर कुटकीच्या भातावर वाढून त्यावर मुगाच्या डाळीचे वरण घेतले की त्यांचा भोजनाचा थाट संपतो. हे लोक सागाच्या पानावर जेवण करितात. रोजच्या जेवणात हिस्सा पद्धति असते. जे कांही घरी तयार केलेले असेल त्याचे सारखे हिस्से करून वाटून घेतात. तांदूळ हे त्यांचे मुख्य खाद्य आहे. त्याला हे बाबा चावली म्हणतात. वस्त्रांचे बाबतीत हे लोक अल्प संतुष्ट असतात. घराघरांतून रात्रीच्या वेळी शेकोट्या पेटविलेल्या आढळतात व त्याचे उजेडातच त्यांचा कारभार चालतो.

ह्या लोकांत डागण्या देण्याची प्रथा सर्रास आढळून येते. कुठेहि दुखले की डाग देतात. त्यांचा भुताखेतावर विश्वास फार. गांवात एक पुजारी असतो त्याला "भूमका" म्हणतात. त्याच्या तंत्राने सारा गांव चालतो. भूमका मांत्रिकाचे काम करतो. त्याचे अंगात देव येतो. तो देव कौल देतो. बकरा-कोंबडा नवसादाखल देण्यांत येतो. ह्या भुमक्याला पैर्याड असेहि म्हणतात.

सुशिक्षित लोकांना हे लोक जांगडी म्हणतात. मुलांना जांगडी आला म्हणून धाक दाखवितात. चोरी करण्याची प्रवृत्ति त्यांच्यांत फारशी नाही. दारूचे व्यसन पूर्वी असे पण आज त्याचे प्रमाण बरेच कमी झाले आहे. यात्रेमध्ये जाऊन फिरणे त्यांना प्रिय आहे. घरातील सर्व लहानमोठे यात्रेला जातात. नेमलेल्या तिथीवर सणवार करणे ह्यांना फारसे माहीत नाही. पैसा हाती आल्यास बाजारानंतर ते सण साजरा करतील. लग्न मात्र शुक्रवारी करण्याची प्रथा आहे.

कोरकू जमातीत स्त्रियांचे वर्चस्व फार आहे. मुलाबाळांच्या भांडणात वडील पुरुष सहसा भाग घेत नाही. नुकसान झाल्यास आकांडतांडव करीत नाही. हे कदाचित गरीब स्वभावाचे लक्षण असू शकेल. घरे एका रांगेत व घराला घरे लागून असतात. घराला एक दार समोर व एक दार मागे ठेवतील आणि बाहेर जाताना मागचे दारानेच जाण्याची ह्यांच्यात प्रथा आहे. घरांत धान्य ठेवण्यासाठी मातीच्या सुंदर चंबूच्या आकाराच्या कोठ्या असतात. त्या फारच मजबूत असतात. त्याचे आड त्यांचे स्वयंपाक घर असल्याचे आढळून येते. स्त्रियांत कुंकू लावण्याची पद्धत नाही. क्वचित स्त्रिया भांगात शेंदूर भरतात. मुलांना शाळेत पाठविण्यांत

त्यांना मोठासा आनंद वाटत नाही. कारण त्यामुळे आपल्या कामधंद्याचे नुकसान होते असे त्यांना वाटते. पेरणीचे वेळी मुलांचा उपयोग फार करतात. मुलगा पेरणीच्या वेळी नांगरावर बसून सरत्यातून धान्य सोडतांना आढळतो. मुलाबाळांना बरेच स्वातंत्र्य आहे. नैतिक बंधनावर विशेष कटाक्ष नाही. नैतिक गुन्ह्यांबाबत खुनशी प्रवृत्ति त्यांचेत नाही असे निदर्शनास येते.

कांही भागांत कापसाची बी जाळून ती मनगटावर दाबून फोड आणतात. असे चट्टे बहुतेक पुष्कळ कोरकूंच्या हातांना आढळतील. ते हे वीरत्वाचे प्रतीक मानतात. ह्याबाबत जी दंतकथा आहे ती अशी : हनुमानाने लंका जाळली व त्यानंतर रामाने रावणाचा पराभव करून त्यास ठार मारले. रावण स्वर्गास गेला. त्याच्याबरोबर मरण पावलेले सर्व स्वर्गास गेले. त्यानंतर स्वर्गास जाणाऱ्या आपल्या प्रत्येक प्रजाजनास रावण विचारीत असे की तूं माझेसाठी काय केलेस ? त्यावेळीं त्याचे वंशज प्रजाजन आपले हातावरील व अंगावरील डाग दाखवीत आणि म्हणत, आम्ही तुमचेकरितां लढाई केली, त्याची ही खूण आहे. ह्या कथेला कोणताच आधार नाही. फक्त कोरकूंची माहिती सांगणारे लोक असे सांगतात.

पुरूषांना कोषाचा फेटा फार आवडतो आणि स्त्रियांना रुंद काठाचे लुगडे विशेष प्रिय असतें. डोक्याचे केस वाढविण्याचा ह्या लोकांना बराच शौक आहे. घर शेणाने सारवून स्वच्छ ठेवण्याची आवड स्त्रियांत उपजतच आहे. कोरकूच्या घरासमोरील आंगण सारवून अगदी स्वच्छ दिसेल. पाण्याची भांडी अगदी स्वच्छ आढळतात. गुंड, त्यावर घागर व घागरीवर छोटा गंज ठेवून कोरकू महिला मोठ्या मौजन पायातील नुपुरांचा आवाज करीत जात असलेल्या आढळून येतील. स्वयंपाक झाल्यावर प्रथम पुरुषांनीच जेवावे असा ह्यांच्यांत दंडक नाही. फुलांचे तुरे फेटयावर खोचण्याची ह्यांची आवड डोळयांत भरण्यासारखी आहे.

बाल विवाहाची प्रथा ह्यांच्यात नाही. सामुदायिक नृत्य पद्धतीची प्रथा ह्यांच्यात आहे. ढोलकीच्या वादनावर नृत्य प्रकार बदलत असतात. ह्यांचा भाषासंग्रह फार लहान आहे.

ह्यांचा जन्म सोहळासुद्धा मोठा मजेदार असतो. बाळंतपणानंतर ५ दिवसांनी पाचवी करतात; पंचाना बोलाविले जाते. बाळंतीण पाणी भरलेला लोटा पंचासमोर ठेऊन त्यांच्या पाया पडते. पंच लोक लोटयांत पैसे टाकतात. भोजन दिले जाते. १२ व्या दिवशी बाळंतिणीला नदीवर नेऊन न्हाऊ घालतात व मग ती आपल्या कामकाजास सुरवात करते.

ह्या जमातीत पुरुषांची नांवे बाटू, बुडा, दादू, तुमला, शुल्ली, बिगी, जुगार, कालू, मातीन्ग, टेपा, भोप्या, जिरगावासु, साजू, मानु, खानु, गानु, अशी आढळून येतात, तर स्त्रियांची नांवे जाणकू, माणकी गगनाथ, चारखु, मितु, बुन्डी, हिराय अशी आढळतात. त्यांची आडनांवे झारा, तोता, कनसदा, भुसुफ, जाउ, वेढे, शिलू, साकोम, चिलाटी, सुसुम अशा तऱ्हेची असतात.

ह्या जमातीत गोत्र आहेत. गोत्र म्हणजे मूळ कुळाचे नांव. गोत्राच्या उपपत्तीबाबत जी एक ंतकथा सांगण्यात येते ती अशी :

फार प्राचीन काळी मेळघाटमध्ये दैत्यांची वस्ती होती. एकदा त्यांनी ह्या मानवांवर हल्ला केला. बहुतेक सर्व लोक त्यांचे भक्ष्यस्थानी पडले. दैत्य गेल्यानंतर उरलेल्या थोडया लोकांनी आपल्या मुलाबाळांचा तपास केला. एक मुलगा सिवन नांवाच्या झाडाखाली बसलेला आढळला. तेव्हा त्याला "वैठे" असे म्हणू लागले. दुसरा मातीच्या ढिगाराखाली लपलेला आढळला, त्याला घापडी अथवा "कासदा". म्हणू लागले. कोरकू भाषेत कासदा म्हणजे माती असा अर्थ होतो. तिसरा मातीच्या ढिगावर खान्डीवर बसलेला आढळला. त्यास "अखन्डे" म्हणू लागले. चौथा पाण्यांत आढळला त्याला "मावसी" म्हणू लागले. पुढे त्याचा विस्तार वाढत गेला आणि ते स्वतःस त्याच्या गोत्राचे समजू लागले. त्यांची गोत्रे खालीलप्रमाणे आढळतात—

अखंडे, बैठे, कासदा, मावशी, सोसो, चिलाटी, जांबू, चिचा, सेलू, भूसुम घी, धिकार, चांडत, च्युथर, तोटा, दार्शिमा, रूमा, ठाकूर वगैरे. त्यांच्या देवताची नांवे : महादेव, खेकादेव, माता आणि मुठवा. देवतांच्या भीतीमुळे ते देवतांची पूजा करतात. त्यांचे मुख्य सण खालीलप्रमाणे आहेत भवाई, आखाडी, गिरोटी, पोळा, दिवाळी, दसरा, तिळसंक्रांत, फागुन, सिवोली. प्रत्येक सणाची गाणी आणि नाच वेगळे असतात. भुमका ठरवील त्यावेळी त्यांचे सण साजरे होतात व त्यांत गांवातील सर्व लोक भाग घेतात.

भवार्द हा सण त्यांचा नवीन वर्षारंभानिमित्त असतो. आखाडी हा सण जुलै महिन्यांत पौर्णिमेला येतो. त्या दिवशी ते महादेवाची पूजा करतात आणि प्रार्थना करतात की, हे देवा आमच्या जनावरांचे वाघापासून, सापापासून संरक्षण कर. भवार्द ते अखाडीपर्यंत एकच एक गाणे गाऊन नाचतात. त्यांत सर्व भाग घेतात. ते गीत खालीलप्रमाणे :

"सोनेकी दिवला रूपली बती रो
पहिली आरती कोने देवा खेती रो

पहिली आरती धरती माई सेवा रो
दुसरी आरती अस्मान सेवा रो

तिसरी आरती मुडवा देवा सेवा रो
चवथी आरती शिव देवा सेवा रो

पाचवी आरती चांदेवा सेवा रो
छटवी आरती सुरज देवा सेवा रो

हे हरे मावथी जो महिना देडा जोडी यो नरे
जिरोती जा महिना खेळ खेळ पोलाजी महिना हरे."

वरील गाणे गातांना स्त्रिया आणि पुरुष जो नाच करतात त्याला "देडा" नाच म्हणतात.

झिरोती हा सण ऑक्टोबर महिन्यात साजरा करतात. हे लोक "झिरोती" सणांत मृतात्म्यांना श्रद्धांजलि अर्पण करतात. त्यानंतर पोळा हा बैलांचा सण करतात. त्यावेळी सुद्धा ते विशिष्ट गाणी गाऊन नाच करतात. खेळा देवाच्या पूजेकरिता ते दसरा सण ऑक्टोबरमध्ये साजरा करतात. दिवाळीच्या सणांत गाईला खिचडी खाऊं घालून तिची पूजा करतात. तिळसंक्रांत सणांत ते चंद्राची पूजा करतात. त्यांचा सर्वात मोठा आणि आनंदाचा सण म्हणजे फागुन. ह्या सणांत ते मेघनाथाची पूजा करतात. नवे कपडे घालून नाच करतात. गावाबाहेर एक मोठा खांब गाडला असतो. त्यावर एक मचांग बांधलेली सर्वत्र आढळते. त्यालाच मेघनाथ म्हणतात. रात्रभर तेथे होळी पेटलेली असते. त्याचे सभोवार नाच-गाणे चालू असते. आणि लोक आपले नवस येथेच फेडतात. होळीची राख मोठ्या आदराने कपाळाला लावतात. पुरुषांचे, स्त्रियांचे व मुलांचे जथ्थे अलग अलग फिरून फागवा मागतात आणि त्याचा गूळ विकत घेऊन ते खातात. गूळ हा त्यांचा मोठा आवडता पदार्थ आहे.

मुलाचे लग्न करावयाचे झाल्यास वराकडून दोन माणसे, दोन काठ्या घेऊन वधूच्या बापाकडे जातील आणि त्याच्या घराला त्या काठ्या खोचतील, आणि नंतर मुलीची मागणी करतील. मुलीच्या पालकाने नाही म्हटल्यास काठ्या काढून घेतात आणि परत फिरतात. जेथे त्यांचे लग्न ठरले असेल तेथे पंच बसून देवाण-घेवाण करतील. मुलीच्या पालकास ऐपतीप्रमाणे २०० ते २५० रु. देणे, वधूस दोन साड्या, वधूच्या आईस भारी किंमतीची साडी, १० दुपट्टे, एक खंडी ज्वारी, ५ कुडव तुरीची डाळ, १ मण मिरची, तंबाखूच्या पाच जुड्या, ५ शेर ओढण्याचा तंबाखू आणि १ मूंडाचा बैल. मामा व आक्का म्हणजे मुलीची मोठी बहीण यांना प्रत्येकी १। रुपया देण्याचा ठराव म्हणजे पासोडी म्हणतात. पंचांना १५ रु. देण्यांत येतात. हा सर्व खर्च मुलाचे पालकास करावयाचा असतो. मुलीकडून पंचाला फक्त १० रु. देण्यांत येतात. एवढे झाल्यावर लग्न पक्के झाल्याचे समजतात.

**लग्नाची प्रथा**

लग्नाचे दिवशी रात्रीच वर आणि वराकडील मंडळी मुलीच्या गांवी पोचतात आणि गावाबाहेर मुक्काम करतात. सकाळी वधूकडील लोक वरपक्षाच्या लोकांना भेटण्यास गावाबाहेर येतात. सायंकाळी वधूकडील हळद मुलास लावतात. वऱ्हाडी मंडळीसह वर मुलीच्या मांडवात येतो. सर्वांचे पाय धुण्यांत येतात. मंडपात दोन पाट मांडतात. एका पाटावर वधू केस मोकळे सोडून पूर्वेकडे तोंड करून बसते. वराचा मोठा भाऊ तिचे केस विंचरून तिच्या डोक्यावर पदर ठेवतो. त्यानंतर वधू आपले वडील दिराचे

व दीर आपले सुनेचे तोंड पाहणार नाही हे त्यांचेवर नैतिक बंधन असते. नंतर दुसऱ्या पाटावर लग्नाचा मुलगा पश्चिमेकडे तोंड करून बसतो. वराचे ओंजळींत तांदूळ टाकण्यांत येतात. मुलगा ते तांदूळ मुलीच्या ओंजळीत टाकतो. असे पांच वेळा करण्यात येते. त्यानंतर मांडवावरून पांच गडवे पाणी वधूवरांचे अंगावर टाकतात. ते पाणी त्यांच्या अंगावर पडू नये म्हणून लोक वधूवरांना चटदिशी दूर करतात. त्यानंतर वर वधूला कडेवर घेऊन मांडवास पांच वेळा प्रदक्षिणा करतात. नंतर त्यांचे नाच-गाणे होते. त्यानंतर वर पक्षाकडील लोक परत् फिरतात. वधूला ज्यावेळी नेण्यांत येते, त्यावेळी तिचेकडील नातेवाईक खूप रडतात.

वर दिलेली प्रथा सर्वमान्य आहे. ज्या वराजवळ इतका खर्च करण्याची ताकद नसते, तो मुलीच्या घरी घरजावई म्हणून राहतो. त्याला "लमझाना पहली" म्हणतात. मुलाला मुलीच्या घरी अशा वेळी ५-६ वर्षेपर्यंत चाकरी करावी लागते. अशा पद्धतीस बापाकडून मुलगी दान दिल्या जाते.

मुलगी स्वतःच्या पतीची निवड करू शकते. ती अशा वेळी मुलांचे घरी निघून जाते. मुलीचे आईबाप मुलीचा शोध करीत त्याचे घरी जातात. पंचाला बोलाविण्यांत येते आणि मुलाकडून मुलीच्या बापास धनधान्य दिले जाते. पंचाना त्याचा भाग मिळतो. केव्हा केव्हा परिचित मुलगा परिचित मुलीला घेऊन जातो. मग मुलीचे आईबाप तेथे जाऊन पंचाला बोलावून वर पक्षाकडून कांही नगदी रक्कम घेतात. पंचाला त्याचा भाग मिळतो.

वडील भाऊ मरण पावल्यास, दीर आपल्या भावाच्या पत्नीशी लग्न करतो. ही सर्वमान्य पद्धत आहे. विधवा बाई दुसऱ्या पुरुषाशी सुद्धा लग्न करण्यास मोकळी असते. अशा वेळी तिच्या मुलाला पोसण्याची जबाबदारी त्याला घ्यावी लागते. ह्या लोकांत एकत्र कुटुंब पद्धति सर्रास प्रचारात आहे. एका एका कुटुंबांत ३० ते ४० पर्यंत लोक असलेले आढळून येतात.

# १३. दारूबंदी कार्य

अमरावती जिल्हा संपूर्ण दारूबंदीखाली असून या जिल्ह्यांत दारूबंदी प्रसाराचे कार्य जिल्हाभर सुरू आहे. या प्रचार कार्यासाठीं एक दारूबंदी प्रचार अधिकारी असून या अधिकाऱ्यामार्फत ठिक-ठिकाणी सभा घेऊन गावागांवात दारूबंदी समिति स्थापून, चलचित्रपट दाखवून, दारूबंदीचे कार्य केले जात आहे.

जिल्ह्यांत दारूबंदी कार्य करणाऱ्या अशा ५०० ग्रामपंचायतीतून दारूबंदी समित्या स्थापन झालेल्या आहेत. या समितीद्वारा स्थानिक स्तरांवरून कार्य होत आहे.

दारूबाजांना योग्य वळण लावण्यासाठीं, त्याचें रंजन करण्यासाठीं व त्याच वेळीं त्यांना शिक्षण देण्यासाठीं जिल्ह्यांत २ संस्कार केंद्रें शासनामार्फत चालविण्यांत येत आहेत. ही संस्कार केन्द्र चिखलदरा व बडनरा या गांवी आहेत. याशिवाय दोन खाजगी सार्वजनिक संस्थांनाहि संस्कार केंद्रें चालविण्यास देण्यात आली आहेत. संस्कार केंद्राशिवाय ग्रामीण भागातून कांहीं भजन मंडळे, संस्था किंवा कलापथकामार्फत दारूबंदीविषयक प्रचार कार्य केल्यास त्यांनाहि दारूबंदी खात्यामार्फत मदत देण्यांत येते. दारूबंदीविषयक माहिती जनतेस देण्यासाठीं यात्रांतून प्रदर्शनेंहि भरविण्यांत येतात.

याशिवाय दारू गाळणारावर नियंत्रण ठेवणें, बेकायदा दारू गाळणारास दंड अथवा शिक्षा देणें व कायदेशीररीत्या दारूबंदी अमलांत आणण्याचे काय पोलीस विभागाद्वारे होतच आहे. या जिल्ह्यांत दारूबंदी प्रसाराचे कार्य केल्याबद्दल पुसला व आसेगांव या दोन गांवांना शासनामार्फत १२५ रु. चीं पारितोषिकें देण्यांत आली असून या गावाचा "दारूबंदी ग्राम" म्हणून बहुमान करण्यांत आला.

# १४. जिल्ह्यांतील गौरवस्थानें

## विदर्भाचे नन्दनवन–चिखलदरा

विदर्भाचे आरोग्यधाम किंवा नन्दनवन म्हणून चिखलदरा ओळखला जातो. पूर्वीच्या मध्यप्रदेशांत पचमढी व चिखलदरा ही दोन थंड हवेची ठिकाणें होती. मध्यप्रदेशांत पचमढीकडे अधिक लक्ष दिले गेले व त्यामुळें चिखलदऱ्याची वाढ विशेष झाली नव्हती. मुंबई राज्यांत विदर्भ आल्यानंतर थोड्याच दिवसांत विदर्भाचे थंड हवेचे ठिकाण म्हणून मुंबई सरकारने या वन नगरीच्या सुधारणेकडे लक्ष केंद्रित केले. चिखलदरा आज विदर्भाचेच नव्हे तर महाराष्ट्रातील एक उत्तम थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध झाले आहे.

चिखलदरा हे समुद्र-सपाटीपासून सुमारे ३,६०० फूट उंचीवर सातपुड्याचे कुशीत आहे. हे अमरावतीपासून ६२ मैल दूर असून उत्तम डांबरी रस्त्याने जोडले आहे. स्टेट ट्रान्सपोर्टच्या बसेस नियमितपणे बाराहि महिने सुरू असतात. येथें वीज, तार टेलीफोन व पोस्टाची सोय आहे. महाराष्ट्र सरकारने मध्यम वर्गियांसाठीं सुट्टीची निवासस्थाने (हॉलीडे कँप) बांधली असून तेथे जरूरी-पुरते फर्निचर, भांडी वगैरेच्या सोयी करण्यांत आल्या आहेत. दर दिवसास २½ रुपये नाममात्र भाड्यांत ह्या सोयी या निवासस्थानांत उपलब्ध होतात. एप्रिल-मे महिन्यांत १० दिवसांपर्यंत यांतून जागा मिळते. एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, अमरावती ह्यांचेकडे अर्ज केल्यास या निवास-स्थानांत जागा मिळू शकते. निवासस्थानांत प्रत्येक गाळ्यास स्वतंत्र स्नानगृह, संडास, २४ तास पाणी असलेले नळ, वीज वगैरे सर्व सुखसोयी उपलब्ध आहेत. हे निवासस्थान फार लोकप्रिय झाले आहे. एका उपहारगृहाचीहि व्यवस्था येथें करण्यांत आली आहे.

या थंड हवेच्या ठिकाणाचा शोध १८२३ सालीं हैद्राबाद कॉंटींजन्ट ब्याटरीचे कॅप्टन रॉबीन्सन यांनी लावला.

चिखलदरा येथे एक मोठा सरकारी बगीचा आहे. तेथे उत्कृष्ठ कॉफी पिकते. चिखलदरा हे महाराष्ट्रांतील उत्कृष्ठ कॉफी पिकविणारे एक ठिकाण होय. चिखलदरा येथील नयनमनोहर

**कॉफी उत्पादन**

वनश्री, निसर्गरम्य व शांत वातावरण यामुळें "सुंदर ठिकाण" म्हणून या ठिकाणास संबोधता येईल. येथें कॉफीचे लागवडीचे क्षेत्रांत सरकार पद्धतशीर वाढ करीत असून लवकरच येथे कॉफी उपसंशोधन केंद्र उघडण्यांत येणार आहे. सुमारे २४० एकर जमिनीवर कॉफी व सोयाबीनची लागवड करण्यांत येत आहे

आठ पॉईन्टस––लॉंग पॉईन्टस, प्रास्पेन्ट पॉईंट, मन्की पॉईन्ट, बेला पाईन्ट, बन्ड पॉईन्ट, हरिकेन पॉईन्ट, पंचबोल, किचकदरा सारखी किती तरी रम्य ठिकाणें, निसर्गाचे सुदर देखावे, हिरवीगार वनश्री व शांत वातावरण पाहिले म्हणजे येथून जाऊच नये असे प्रत्येकाला वाटते. वैराट हे या ठिकाणचे सर्वात उंच शिखर आहे.

पूर्वी चिखलदऱ्यास पिण्याच्या पाण्याची फार टंचाई होती. उन्हाळ्यांत तर पाणी विकत घ्यावें लागे. परंतु महाराष्ट्र सरकारने हा प्रश्न कायमचा सोडविण्याच्या दृष्टीने २५ लक्ष रुपयाची योजना

**पाणीपुरवठ्याची सोय**

आंखून तळ्यावर पंपिंग सेट बसवून पाणीपुरवठा करण्याची योजना हाती घेतली आहे.

चिखलदरा बगीचा इतके दिवस म्युनिसिपालिटीकडे होता, तो आतां जंगल विभागाकडे देण्यांत आला आहे. त्याचे फॉरेस्ट पार्क (वनउद्यान) व बोटानिकल गार्डनमध्यें रूपांतर करण्यांत येत आहे.

**चिखलदरा बगीचा**

सुमारे अकरा एकराचा हा पार्क आहे. येथे मुलांना खेळण्यासाठीं झोके, घसरगुंड्या, सिसॉ सारखी मनोरंजक खेळणी साधने ठेवण्यांत येणार असून बाल मनोरंजन विभाग अधिक उपयुक्त व सुदर करण्यांत येणार आहे.

**आमझरी बगीचा**

चिखलदऱ्यापासून सुमारे ३ मैलांवर असलेला आमझरी बगीच्यातहि सुधारणा करण्यांत येत असून, चिखलदऱ्यास पुरेल येवढा भाजीपाला व निरनिराळ्या जातीची फळेहि या बागेतून पुरविली जातात. बारमाही भाजीपाला मिळण्याचे दृष्टीने भाजीपाला लावण्यांत येत आहे.

**बीर तलाव**

बीर तलावाचे परीसरांतील ३५ चौरस मैलाच्या क्षेत्रांत शोभिवंत झाडांची लागवड करण्यांत आली आहे. यामुळें हा भाग वनश्रीच्या सौंदर्याने नटेल. एवढेच नव्हे तर पाण्याने सुद्धा समृद्ध होईल. दरवर्षी सुमारे १५ मैल अशा रीतीने शोभिवंत झाडांची लागवड होणार आहे. पुष्कळसे बंधारे घालूनहि पाणीपुरवठा वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत.

**करमणूक**

चिखलदरा येथील सरकारी बगीच्यात क्लब असून तेथें टेनिस, बॅडमिंटन, कॅरम, बुद्धीबळ वगैरे खेळांची सोय आहे. नशाबन्दी विभागामार्फत येथे संस्कार केन्द्र चालू असून एक लहानसे वाचनालयहि ह्या ठिकाणी आहे.

**गाविलगढ**

चिखलदऱ्यापासून सुमारे १ ते १॥ मैलांवर गाविलगढचा इतिहासप्रसिद्ध किल्ला आहे. हा किल्ला ई. स. १३२५ च्या सुमारास बांधला असावा. किल्लयाचा दिल्ली दरवाजा, परिपाथा दरवाजा, दरबार हॉल आणि मशिदीचा अवशेष येवढेच काय ते शिल्लक आहेत. ही मशिद या किल्ल्याच्या सर्वांत उंच भागावर आहे. त्यामुळें बऱ्याच अंतरावरून ती दिसते. अहिर किंवा गवळी राजाच्या ताब्यांत हा किल्ला पूर्वी असावा असा अन्दाज आहे.

**वैराट**

वैराट हे चिखलदऱ्यापासून सुमारे ६ मैल लांब आहे. सातपुड्याचे हे सर्वांत उंच शिखर असून त्याची उंची समुद्र सपाटीपासून ३,८६६ फूट आहे. टेकडीवर महादेवाचे व वैराटेश्वराचे देऊळ आहे.

**पद्धतशीर वाढीची योजना**

चिखलदरा या निसर्गरम्य व थंड हवेच्या ठिकाणाची पद्धतशीर वाढ करण्याचे महाराष्ट्र सरकारने ठरविले असून तेथे प्लॉटस् पाडण्यांत आले आहेत व ते नाममात्र किंमतीस लवकरच विकले जातील. तसेच तेथे कॉफी उपसंशोधन केंद्र सुरू होणार आहे. शिवाजी शिक्षण संस्थेनें येथे हायस्कूल सुरू केले असून समाज कल्याण योजनांचे कार्यहि या भागांत मूळ धरू लागले आहे. थोड्याच दिवसापूर्वी कोणास फारसे माहिती नसलेले चिखलदरा हे अमरावती जिल्ह्याचे किंवा विदर्भाचेच नव्हे तर साऱ्या महाराष्ट्रांतील एक उत्कृष्ट थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध झाले आहे.

## श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती

सर्वसाधारण गरीब व मध्यम परिस्थितीतील व्यक्तींस आपल्या मुलांना सहजासहजी शिक्षण देता यावे आणि त्यांस सुशिक्षित व सुसंस्कृत करतां यावे, या उद्देशाने शिक्षण प्रसाराचे कार्य करणारी एक संस्था अमरावतीस आहे. ह्या संस्थेचे नांव श्री शिवाजी शिक्षण संस्था. ही संस्था डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सन १९३१ मध्यें स्थापन केली असून ही संस्था आपले शिक्षण प्रसाराचे कार्य विदर्भाच्या परिसरांत करीत आहे. विदर्भात शिक्षणाचे प्रमाण वाढविण्याचे कार्यात ह्या संस्थेचा बराच मोठा

आजमितीला ह्या संस्थेचा आय-व्यय सुमारे एक कोटींचा असून त्यावरून संस्थेच्या कार्याची कल्पना येते. विदर्भाच्या बहुतेक सर्व जिल्ह्यांतून ह्या संस्थेमार्फत शाळा, कॉलेजेस, बालक मंदिरे व कन्या शाळा आदि विविध शिक्षण संस्था काढण्यांत आल्या आहेत. या संस्थेमार्फत चालणाऱ्या, अशा संस्थांची संख्या १७१ असून त्याद्वारा शिक्षणप्रसार कार्य चालू आहे.

विद्यालयें, महाविद्यालयें, कन्या शाळा तसेच ग्रामसेवक प्रशिक्षण वर्ग, ग्रामसेविका प्रशिक्षण वर्ग, रूरल इन्स्टिटयूट, गांधी ग्रामोद्योग मंदीर, जनता कॉलेज आदि संस्था या संस्थेमार्फत चालविण्यांत येत आहेत.

शिक्षण संस्थाशिवाय कस्तुरबा औषधालय, व्यायाम शाळा, मुद्रणालय व स्पोर्टस असोसिएशन आदि विभागांतून जनहिताय कार्य चालू आहे. संस्थेचे वैशिष्टय म्हणजे अमरावती, नागपूर आदि शहरांत विद्यार्जन करणाऱ्या गरीब व अनाथ विद्यार्थ्यांना मोफत राहण्याची सोय छात्रालयातून केली जाते हे होय. या छात्रालयांतील विद्यार्थ्यांनी एम.ए.,एम. एससी. आदि मोठ्या पदवी परीक्षा पास केलेल्या आहेत.

दिल्लीजवळ ह्या वर्षी एक नवे कॉलेज काढण्याचा संस्थेने निर्णय घेतला आहे. ग्रामीण उद्योगांना चालना देण्याकरितां व खेडे गावांत नवीन नवीन उद्योग सुरू करण्यास विद्यार्थ्यांस तयार करण्याचे उद्देशाने गांधी ग्रामोद्योग मंदीरामार्फत कार्य चालू आहे. संस्थेजवळ शेती असून यापुढें याच संस्थेत कृषि महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ काढण्याचा संस्थेचा मानस आहे. या संस्थेतून २५ हजार विद्यार्थी दरवर्षी शिक्षण घेतात व विद्यार्जन करतात.

संस्थेची माहिती देण्याचे उद्देशाने व शिक्षणांतील सर्व प्रवाहावर साधकबाधक चर्चा व्हावी म्हणून शिवाजी पत्रिका हे पाक्षिक काढण्यांत येत असते. संस्थेने आपला रौप्य महोत्सव १९५८ साली साजरा केला असून कार्य नेटाने चालविण्याचा निर्धार केला आहे. शिक्षण क्षेत्रातील संस्थेचे कार्य उल्लेखनीय व गौरवपूर्ण आहे.

## हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती

शारीरिक बलसंवर्धनाचे दृष्टीने व्यायामाची आवश्यकता लोकांना पटवून देणे, शारीरिक शिक्षण नवतरुणांना प्राप्त करून देणे आणि व्यायाम प्रकाराचे संशोधन करून त्यास शास्त्रशुद्ध स्वरूप देण्याचे कार्य करणारी एक संस्था अमरावतीत आहे. त्या संस्थेचे नांव हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ हे आहे. ही संस्था सन १९१४ मध्यें स्थापन झाली. या व्यायाम प्रसारक मंडळाद्वारा अमरावती येथें दररोज सांजसकाळ व्यायामाचे वर्ग चालविण्यांत येतात. कुस्ती, काठी, कसरत, मलखांब, गदगाफरी, लेझीम, डम्बेल्स आदि व्यायाम प्रकाराचे पथकापथकातून शिक्षण देण्यांत येते. शहरातील सुमारे ३५० विद्यार्थी रोज ह्या वर्गांना उपस्थित असतात.

या व्यायाम प्रकाराशिवाय वाद्यवृंद, मलखांब आदीचे शिक्षण देखील देण्याची सोय करण्यांत आली आहे व त्याचा फायदा बरेचसे विद्यार्थी घेतात. व्यायामाचा प्रसार व प्रचार व्हावा या हेतूने ह्या व्यायाम प्रसारक मंडळामार्फत शारीरिक शिक्षकांचा सर्टिफिकेट शिक्षण वर्ग काढण्यांत आला असून तो एक वर्ष मुदतीचा आहे. ह्या काळांत ह्या वर्गातील विद्यार्थ्यांना व्यायामाचे बहुतेक सर्व प्रकार शिकविले जाऊन त्यांना व्यायाम शिक्षकांचे प्रशिक्षण दिले जाते. ह्यांत बरेच विद्यार्थी शिक्षण घेतात. या वर्गाचें सर्टिफिकेट घेतलेल्या लोकांना महाविद्यालय व विद्यालये आदीतून शारीरिक शिक्षकांच्या नोकऱ्या मिळतात. या प्रदेशातील व लगतच्या भागातील दूरदूरचे युवक ह्या वर्गात शिक्षण घेण्यासाठीं येतात.

भारतीय व्यायाम पद्धतीचा प्रसार देशाबाहेर अन्य देशांत करण्याचे उद्देशाने व इतर राष्ट्रातील व्यायाम प्रकाराचे शास्त्रशुद्ध स्वरूप समजून घेण्याचे उद्देशाने ह्या मंडळामार्फत आतापर्यंत बरीचशी पथके देशाबाहेर पाठविण्यांत आली आहेत. १९३६ साली जर्मनी, इंग्लैंड, हालँड, १९४९ साली स्वीडन, जर्मनी, डेन्मार्क, स्वित्झर्लंड, फ्रान्स व इंग्लंड, १९५३ सालीं तुर्कस्तान, इराक, सिरीया आदि ठिकाणीं या मंडळांनी आपल्या संस्थेत व्यायाम शिक्षण घेणाऱ्या युवकांच्या सहली काढून भारतीय व्यायाम पद्धतीचे दर्शन घडविले आहे.

या व्यायाम प्रसारक मंडळामार्फत व्यायाम प्रकाराचे सामान गांवोगावच्या आखाड्यांना पुरविण्यांचे उद्देशाने विक्री भांडार चालविण्यांत येत असून, व्यायामाचे सामान मिळण्याची सोय करण्यांत आली आहे.

या मंडळाच्या विद्यमाने अखिल भारतीय शारीरिक शिक्षण परिषद व महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषद भरवून भारतीय व्यायाम पद्धतीने शास्त्रशुद्ध स्वत्व व महत्व ठरविण्याचे कार्य करण्यांत आले. व्यायाम प्रसाराचे कार्य करणाऱ्या संस्थांना एकत्रित आणण्याचे महत्वाचे कार्य ह्या मंडळामार्फत करण्यांत यत आहे.

अमरावतीतील सार्वजनिक कार्यात ह्या मंडळाची सर्वांनाच मदत होते. या मंडळाचे कार्यालय अमरावतीतील इतिहास प्रसिद्ध अंबादेवीचे मंदिराजवळ आहे. या मंडळामार्फत साजरा होणारा दसरा उत्सव म्हणजे अमरावतीकरांचे एक आकर्षणच होय.

भारतांत व्यायाम प्रसार व संशोधनाचे कार्य करणाऱ्या ज्या ज्या म्हणून कांही संस्था आहेत त्या सर्वांत ह्या संस्थेचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे.

---

## जगदंबा कुष्ठ निवास (तपोवन), अमरावती

नागपूर विदर्भाच्या भागांत महारोग निर्मूलनाचें कार्य करणाऱ्या ज्या कांही संस्था आहेत, त्यांतील महत्वाची एक संस्था अमरावतीस आहे. ती म्हणजे " जगदंबा कुष्ठ निवास ".

अमरावती शहराच्या पूवस अवघ्या तीन मैलावर ह्या संस्थेचे कार्य स्वतंत्ररीत्या चालू आहे. शहरापासून दूर, निसर्गरम्य वातावरणांत मानव सेवेचे कार्य ह्या संस्थेद्वारा पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांचे संचालनाखाली चालू आहे.

महारोगाविषयी आज समाजांत अनेक गैरसमजुती आहेत, त्या घालवून महारोगाने पछाडलेल्या रोग्यांना रोगमुक्त करण्याचे व रोगमुक्त झालेल्या परंतु विकलांग अशा स्थितीत असलेल्या लोकांचा सांभाळ करण्याचे, असें त्रिविध कार्य ह्या संस्थेद्वारा चालू आहे. ही संस्था या भागांत गेल्या दहा वर्षापासून कार्य करीत आहे.

रोग्यांना औषधोपचार करण्यासाठीं स्वतंत्र दवाखाना, ऑपरेशन थिएटर व तज्ञ डॉक्टरांची सोय या संस्थेत केली आहे. रोग्यांना राहण्यासाठीं खास वॉर्डसमधून सोय करण्यांत आली आहे. स्त्रियांसाठीं व पुरुषांसाठीं वेगवेगळे वॉर्डस असून भोजनाची व्यवस्थाहि खास भोजनगृहाद्वारा करण्यांत आली आहे.

रोग्यांना बिनामूल्य औषधोपचार करण्यांत येतात व रोगमुक्त होताच त्यांना दवाखान्यातून जाण्याची मुभा मिळते. परंतु रोगमुक्त झालेल्या रोग्यांना समाज आपल्यांत घेत नसेल तर त्यास येथेच काम देण्यांत येते. विकलांग रोगीहि येथेच ठेवून घेण्यांत येतात कारण त्यांना त्यांच्या विकलांग अवस्थत कांहीं काम करून पोट भरणे शक्य नसते. याच दृष्टीने या जगदंबा कुष्ठ निवासांत मुद्रणालय, विणकर विभाग, सुतार विभाग, चर्मकला विभाग, कृषि विभाग आदि उद्योग सुरू करण्यांत आले असून या भागांत कार्य करण्याचा बराचसा भार महारोगापासून मुक्त असलेले रोगीच उचलतात.

**विनामूल्य उपचार**

या कुष्ठ निवासांतील रोग्यांचें जीवन आश्रमीय पद्धतीचे आहे. सांजसकाळ प्रार्थना, भजनादि कार्यक्रम, सर्वांना एकच भोजनाची व्यवस्था व सारखीच वागणूक देण्यांत येते. महारोगाने पछाडलेल्या लहान मुलांना शिक्षण देण्याची सोयहि या ठिकाणी करण्यांत आली आहे. महारोगी मातांच्या बालकांचें संगोपनहि स्वतंत्ररित्या करण्यांत येते.

महारोग निर्मूलन कार्य करण्यास लागणारे कार्यकर्ते तयार करण्यासाठीं व त्यांना औषधोपचार करण्यासाठीं शिक्षण देऊन कार्यकत तयार करण्याच्या उद्देशाने "कुष्ठ रोग प्रशिक्षण वर्ग" सुरू करण्यांत आला असून त्या द्वारा विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. महाराष्ट्रांत प्रशिक्षण देणारे हे एक प्रमुख प्रशिक्षण केंद्र आहे. या वर्गातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना सरकारमार्फत नोकरी देण्याची व्यवस्था सरकारने केली आहे.

महारोगाबाबत लोकांना माहिती देण्याच्या उद्देशाने "जीवन" नांवाचे पाक्षिक या संस्थेद्वारा काढण्यांत येते. शिवाय महारोगी मित्रमंडळाचीहि अभिनव कल्पना येथें आहे. या आश्रमास सरकारी मदत व लोकांची सहानुभूति याचा मोठाच आश्रय आहे.

महारोग निर्मूलन करणारी ही संस्था ह्या भागांतील उदात्त सेवाधर्म पाळणारी गौरवशाली संस्था होय.

---

## गुरुकुंज आश्रम, मोझरी

अमरावतीपासून नागपूर मार्गावर अवघ्या २१ मैलावर संत तुकडोजी महाराज यांचे संचालनाखाली चालणारा एक "गुरुकुंज आश्रम" आहे. गुरुदेव सेवा मंडळाची स्थापना २३ नोव्हेंबर १९४३ रोजी तुकडोजी महाराजांनी केल्यावर मोझरी ह्या चांदूर तहसिलीतील एका खेडयाजवळ अमरावती--नागपूर रस्त्यावर हा आश्रम स्थापन करण्यांत आला.

मानवी वृत्तीचा विकास करून सचोटीच्या व्यवहारास मानवास प्रवृत्त करणें, आपल्या धार्मिक अधिष्ठानावर पक्के राहून संकुचित वृत्तीचा मानवी मनांत वावरणारा अविष्कार काढून टाकण्यासाठीं व मानवास खऱ्या मानव धर्माची आणि ग्रामविकासाची शिकवण देण्याचे उद्देशाने श्री. तुकडोजी महाराजांनी गुरुदेव सेवा मंडळ स्थापन केले. आतां ह्या मंडळाच्या कल्पनेस देशव्यापी स्वरूप प्राप्त झाले आहे.

श्री. तुकडोजी महाराजांच्या कल्पनेस साद देणारे कार्यकर्ते त्यांना मिळाले व त्यांचा कार्यव्याप आतां सारखा वाढत आहे. भारतांत सर्व प्रदेशांतून गुरुदेव सेवा मंडळाच्या शाखा, उपशाखा स्थापन झाल्या असून या सर्वांचें प्रधान कार्यालय गुरुकुंज आश्रमांत आहे. या आश्रमांत कार्याचे दृष्टीने नवीन प्रचारक तयार करणें, लोकांना संगीत व भजन कला शिकविणे, नवतरुण कार्यकर्त्यांना ग्राम विकासाचे पाठ देणें, व्यायामाचे शिक्षण देऊन व्यायामाचे महत्व खेडोपाडयांत पोहोचविण्याचे दृष्टीने कार्यकर्ते तयार करणें, आदि कार्य केले जाते.

आज या आश्रमाच्या परिसरांत तुकडोजी महाराजांचे संचालनाखाली श्री गुरुदेव प्रकाशन संस्था, गुरुदेव विद्या मंदिर, गुरुदेव महिला मंदिर, गुरुदेव गोरक्षण विभाग आदि अनेक विभागांतून कार्य चालू आहे. गुरुकुंज आश्रमाशिवाय नागपूर, आमगांव आदि अनेक ठिकाणी लहानमोठ्या प्रमाणावर आश्रम चालविण्यांत येऊन सर्वत्र ग्रामविकास व ग्रामसुधार कार्य चालते. गुरुकुंज आश्रमांत एक विद्यालय असून नव्यानेच या आश्रमांत शुद्ध आयुर्वेद महाविद्यालय उघडण्यांत आले आहे. या आश्रमांतील विविध विभागाचा खर्च ४ लाख रुपयाचे घरांत आहे. गुरुदेव सेवा मंडळाच्या शाखा ज्या ज्या ठिकाणी आहेत तेथे तेथे गृहोद्योग व ग्रामोद्योग काढण्यांत येऊन लोकांना कामे देण्याचे व लघु उद्योग प्रसाराचे कार्य ह्या आश्रमाद्वारा केले जाते.

या आश्रमाच्या परिसरांतच सरकारमार्फत पटवारी प्रशिक्षण वर्ग व ग्रामसहायक वर्ग चालविण्यांत येतात. ह्या गुरुकुंज आश्रमास आतांपावेतो माजी राष्ट्रपती डॉ. राजेन्द्र प्रसाद, राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन, चिंतामणराव देशमुख, राजकुमारी अमृतकौर, कैलासनाथ काटजू आदि अनेक थोरामोठ्यांनी भेटी देऊन व येथील कार्याची आस्थेने पाहणी करून कार्याबद्दल आदर व्यक्त केला. अमरावती जिल्ह्यांतील हा आश्रम म्हणजे ह्या जिल्ह्यांतील एक भक्ती-स्थानच होय.

**थोरांच्या भेटी**

---

## रूरल इंस्टिटयूट

भारतीय लोकसभेने विद्यापिठीय शिक्षणांतील मूलगामी उणीव दूर करण्यासाठी १९५४ मध्यें श्रीमाळी समिति नियुक्त केली. सुमारे एक-दीड वर्ष या समितीने विभिन्न शिक्षण प्रयोगाची सूक्ष्म पाहणी केली. ग्रामीण समाज व्यवस्थेतील शैक्षणिक समस्यांचा अभ्यास केला. या सर्वांचे मंथन करून तिने भारत

सरकारला रूरल इंस्टिटचूट स्थापन करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार भारत सरकारने सबंध भारतांत दहा रूरल इंस्टिटचूट प्रस्थापित करण्याचा निर्णय घेतला. त्यांतील एक अमरावतीच्या श्री शिवाजी लोकविद्यापीठाला व्यवस्थापनाकरितां मिळाली.

१९५६ च्या जुलैमध्यें अमरावतीच्या या संस्थेचा नवा संसार मोर्शी रस्त्यावरील श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या परिसरांत सुरू झाला. आज नव्या भव्य इमारतींत संस्थेचे कार्य जोमाने सुरू आहे.

येत्या शैक्षणिक वर्षापासून रूरल इन्स्टिटचूट आपल्या यशस्वी सातव्या वर्षांत पदार्पण करील. आतापर्यंत संस्थेने शिक्षणाच्या विभिन्न क्षेत्रांत भरीव कार्य केले. अभ्यासक्रम यशस्वीरित्या उत्तीर्ण झालेली विद्यार्थ्यांची पहिली तुकडी गेली दोन वर्षे काम करीत आहे. थोरामोठयांच्या तोंडून अनेकदां संस्थेविषयी प्रशंसोद्गार ऐकूं येतात. विदर्भातील श्रेष्ठ श्रेणींतील शिक्षणसंस्थांत आतां रूरल इन्स्टिटचूटची सहज गणना होऊं लागली आहे.

विद्यापिठीय शिक्षणक्रमांत असलेल्या मूलगामी उणीवा दूर करण्याच्या हेतूने रूरल इन्स्टिटचूटस् अस्तित्त्वांत आल्या. रूरल इन्स्टिटचूटच्या अभ्यासक्रमांत ग्रामीण जीवनाचे सातत्यानें अभ्यासकाला स्मरण राहील अशी योजना आहे. ग्रामीण जीवनाला केन्द्र समजून अभ्यास विषयांची मांडणी करण्यांत आली आहे. ग्रामीण जीवनाच्या सखोल व शास्त्रीय अध्ययनासाठीं आवश्यक असणाऱ्या विषयांचा समावेश सहेतुकपणे अभ्यासक्रमांत केला गेला आहे. "ग्रामीण प्रश्न" या सारखा एखादा नवा विषयहि या हेतुमुळेच घडवावा लागला.

**वैशिष्ठचे**

ग्रामीण जीवनाचा अनुभव यावा म्हणून विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासाठीं प्रत्येक वेळी ग्रामीण विभागांत जावे लागते. आपल्याला प्राप्त झालेले ज्ञान प्रत्यक्ष जीवनाशी निगडित करण्याची संधि या विद्यार्थ्यांना लाभते. आपल्या ज्ञानाचा साक्षात ग्रामीण जीवनांत उपयोग करून पाहण्याची व्यवस्था प्रस्तुत अभ्यासक्रमाने हेतुपूर्वक आंखलेली आहे. ज्ञानाचा ग्रामीण जीवनांत उपयोग करण्याची प्रांजळ वृत्ति अभ्यासक्रमांत निर्माण करणे आजच्या काळांत आवश्यक झाले आहे. विद्यार्थ्यांने कमावलेल्या वैज्ञानिक ज्ञानाचा समाजाला पूर्णपणे उपयोग होऊं शकला नाही तर ती राष्ट्रीय हानि आहे. ती रूरल इन्स्टिटचूटने टाळण्याचा यत्न केला आहे. ज्ञानाचा प्रवाह ग्रामीण जीवनाकडे नेण्याचा हा अभिनव प्रयोग आहे. शिक्षित पिढी आणि ग्रामीण जनता यात अधिक नैसर्गिक व निकट सख्य निर्माण करणारे हे पाऊल आहे. या शिक्षणक्रमांत राष्ट्रीय दृष्टि पहिल्यानेच प्रभावाने येत आहे.

प्रारंभी कृषि आणि ग्रामीण सेवा अशा दोनच विषयाचा अभ्यासक्रम प्रस्तुत महाविद्यालयांत सुरू करण्यांत आला. कृषिविषयक शिक्षणक्रम दोन वर्षाचा असून प्रामुख्याने ग्रामीण युवकांना कृषि विज्ञान अवगत व्हावे, असा उद्देश आहे. वैज्ञानिक ज्ञान प्राप्त झाल्यामुळे हा युवक अनेक आधुनिक उपकरणांशी व पद्धतीशी परिचित होऊन स्वाभाविकच अधिक यशस्वी शेती करायला किंवा करवून घ्यायला समर्थ होईल. तसेंच कृषि उत्पादनाकडे शास्त्रीय चिकित्सेने पाहण्याची वृत्ति त्याच्या ठिकाणी उत्पन्न होईल.

**अध्ययनाच्या शाखा**

या कृषि विज्ञानासोबतच इतरहि पूरक विषयांचें ज्ञान विद्यार्थ्याला दिले जाते. केवळ एकटया शेतीचाच विचार करून ग्रामीण जीवनाची इतर अंगे अलिप्त राहूं नयेत म्हणून, युवकांची सर्वांगीण उन्नति व्हावी असा विचारहि काळजीपूर्वक केला जातो. विधायक स्वरूपाचे ग्रामीण नेतृत्व युवकांना सहज सांभाळता येईल. इतरांना उचित व अचूक मार्गदर्शन करण्याची शक्ति निश्चितच त्यांच्या ठिकाणी निर्माण झालेली असेल.

ग्रामीण सेवा अभ्यासक्रम पदवी पातळीवरील ग्रामीण कार्यकर्ता निर्माण करण्याच्या खास उद्देशा-नेच तयार झाला आहे. सहाजिकच या शिक्षणक्रमांत विषयांची विविधताहि साधली गेली. सामान्यपणे जीवनांत व्यवस्थित मार्गदर्शन व सुयोग्य संघटन करण्यासाठीं आवश्यक असणारे बहुतेक विषय यांत समाविष्ट केले आहेत. त्यामुळे ग्रामीण जीवनाचे आवश्यक आकलन या विद्यार्थ्यांना सहज होते. शिवाय ग्रामीण वातावरणांत काम करण्याचा भरपूर अनुभव पदरी असतोच. अर्थातच अधिक समरसतेने आणि समंजसपणे हा कार्यकर्ता ग्रामीण विभागांत रचनात्मक कार्य करण्यास समर्थ होतो.

गेल्या चार वर्षांपासून रूरल इंजिनिअरिंगमधील तीन वर्षांचा अभ्यासक्रमहि सुरू झाला आहे. ग्रामीण विभागांतील या क्षेत्रांतील उणीव दूर करण्याचा उद्देश याच्या पाठीशी आहे. इंजिनिअरिंगची प्रामुख्याने ग्रामीण भागांत काहींतरी विधायक कार्य करण्याची दृष्टि अभ्यासक्रमांत उत्पन्न व्हावी अशी अपेक्षा आहे. यांत्रिक विज्ञानाने आजवर आपल्याकडे ग्रामीण परिस्थितीचा फारसा विचार केलेला नव्हता. हे वैगुण्ये नष्ट करण्याचा प्रयत्न या अभ्यासक्रमाद्वारें होतो.

रूरल इन्स्टिटयूटमधील सर्वच अभ्यासक्रमांत ग्रामीण जीवन मध्यवर्ति मानले आहे. त्या अनुषंगानेच शास्त्राचे अध्ययन व अभ्यास येथें सुरू आहे. ग्रामीण जीवनाला नवा उजाळा देऊन ते उन्नत करण्यासाठीं आवश्यक असणारी शैक्षणिक व्यवस्था रूरल इंस्टिटयूटच्याद्वारा आंखली गेली.

इंग्रजी, मराठी, हिंदी, कृषिशास्त्र, विस्तारशास्त्र, इतिहास, लोकशासन, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, गृहशास्त्र, पशु-संवर्धन, ग्रामीण प्रश्न, इंजिनियरिंग, सार्वजनिक आरोग्यशास्त्र, मानसशास्त्र, सुतारी, विज्ञान आदि किती तरी शास्त्रांच्या सप्रयोग अध्ययनाची येथे व्यवस्था आहे.

रूरल इन्स्टिटयूटकडे ग्रामीण विभागांतील बुद्धिमान विद्यार्थीवर्ग आकर्षित व्हावा म्हणून भारत सरकारने विद्यावेतनाची योजना आंखली आहे. हुशार, होतकरू व लायक अशा विद्यार्थ्यांना विद्यावेतन देऊन भारत सरकार सक्रिय उत्तेजन देत आहे. प्रत्येक वर्षातील शेकडा ४० लायक विद्यार्थ्यांना दरमहा २० ते ३० रुपये प्रमाणें शिष्यवृत्ति दिली जाते. त्यामुळें बऱ्याच होतकरू विद्यार्थ्यांस शिक्षण घेणे शक्य होते.

याशिवाय इतर महाविद्यालयांतून मिळणाऱ्या मागासलेल्या जातींच्या २५० ते ८७० रु. पर्यंत स्कॉलरशिप्स् याहि महाविद्यालयांत अनेकांना लाभल्या आहेत. बाराशे रुपयांखालील उत्पन्न असणाऱ्यांना मिळणारी फी-माफीची सवलतहि येथे उपलब्ध आहे.

याखेरीज रूरल इन्स्टिटयूटचे संचालकातर्फे अनेक विद्यार्थींना दरवर्षी विशेष सवलती देण्यांत येतात. यांत कित्येकांना फी माफ होते, तर कित्येकांना द्रव्यसहाय्य लाभते.

**सरकारी मान्यता**

रूरल सर्व्हिसेसच्या डिप्लोमाला भारत सरकार व महाराष्ट्र राज्य व नागपूर विश्वविद्यालय यांनी विद्यापीठाच्या पहिल्या पदवीएवढी नोकरीच्या संदर्भात मान्यता दिली आहे. त्यामुळे सर्वसाधारणपणे बी. ए. किंवा बी. कॉम. वगैरे पदवीधरांना मिळू शकणाऱ्या सर्व प्रकारच्या नोकऱ्यांसाठीं रूरल सर्व्हिसेसचा डिप्लोमा असणारांची निवड होऊ शकते. कित्येक ठिकाणी तर या विद्यार्थ्यांची विशेष आवडीने निवड झाल्याची दिसून येते.

---

## विज्ञान मंदीर

ग्रामीण भागांत राहणाऱ्या लोकांना विज्ञानाची माहिती व्हावी व त्याचा वापर व्यवहारात करण्यास त्यांना प्रवृत्त करावे, या उद्देशाने मध्यवर्ति सरकारचे शास्त्रीय संशोधन व सांस्कृतिक कार्य विज्ञान मंदीर योजनेद्वारा चालू आहे.

महाराष्ट्र राज्यांत असलेले हे पहिले विज्ञान मंदिराचे कार्य, या जिल्ह्यांत अमरावती येथे चालू झाले आहे. विज्ञान मंदिर योजनेद्वारा विज्ञानाचे ज्ञान ग्रामीण भागापर्यंत पोहोचविण्याचे कार्य ग्रंथालय, संग्रहालय व प्रयोगशाळा याद्वारा होत आहे. शाळांतून व ग्रामीण भागांत गावोगावी सायन्स क्लबची स्थापना करणें, शास्त्रीय विषयांवर व्याख्याने, विज्ञानविषयक चित्रपट, माहितीपट दाखविणे, प्रदर्शन व कांहीं प्रात्यक्षिके करून दाखविणे वगैरे कार्य मंडळामार्फत करण्यांत येते.

अमरावती येथील विज्ञान मंदिरांत जमिनीचे पृथक्करण, पाण्याचे पृथक्करण व याबाबतचा सल्ला, विविध किटाणुबाबतची माहिती, पिकांवरील किडे कसे नाहीसे करावे, याबाबतची माहिती, व अन्नपदार्थांतील भेसळ यांची तपासणी करण्याचे कार्य सध्या चालू आहे याशिवाय या मंदिरात ग्रंथालयहि असून त्यांत विज्ञानविषयक माहिती देणारी पुस्तकें, माहि-तीविषयक भिंति पत्रकें व कांही पुस्तिका स्थानिक वनस्पति, पशुपक्षी, किटाणू यांचे नमुने ठेवले आहेत. जिल्ह्यांतील लोक ह्या विज्ञान मंदिराचा फायदा घेत आहेत.

# १५. यात्रा व मेळावे

दरवर्षी आश्विन शुद्ध १ पासून विजया दशमीपावेतो दहा दिवस नवरात्र महोत्सव साजरा केला जातो. हजारो माणसे या कालांत श्री जगदंबा देवीचे दर्शनास येतात. अष्टमीचे दिवशी देवळांत होमहवन होते व दसऱ्यास देवीची पालखी सीमोल्लंघन मैदानावर नेण्यांत येते. दसऱ्याचे दुसरे दिवशी नेहरू मैदानावर रावण, कुंभकर्ण व शूर्पणखा यांच्या मोठमोठ्या प्रतिमा जाळण्यात येतात. त्या वेळेस नयनमनोहर आतिषबाजी केली जाते. सदर प्रसंगी सुमारे एक ते दीड लाख नागरिक उपस्थित असतात. अमरावती शहरातील ही सर्वात मोठी यात्रा होय.

**नवरात्र महोत्सव**

श्री संत गाडगे महाराज यांची कर्मभूमी पश्चिम महाराष्ट्र असली तरी जन्मभूमी अमरावती जिल्ह्यांतील दर्यापूर तालुक्यातील कोतेगांव होय. म्हणूनच त्यांनी शेवटच्या घटकेला अमरावतीला येण्याचा निश्चय केला व अमरावती येथेच त्यांनी इहलोकाची यात्रा संपविली. त्यांचे पुण्यतिथीचे दिवशी गाडगे नगरमध्ये त्यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी हजारो भक्त येतात. दरवर्षी ही यात्रा मार्गशीर्ष एकादशीला भरते.

**श्री संत गाडगे महाराज पुण्यतिथी**

बहिरम हे ठिकाण अचलपूरपासून सुमारे १४ मैलावर बैतुल रस्त्यावर आहे. येथील वैशिष्ट्य म्हणजे हिंदू, मुसलमान वगैरे सर्व धर्मांचे लोक बहिरमला मानतात. दरवर्षी ऑक्टोबरमध्ये मोठी यात्रा भरते व ती सुमारे एक महिनाभर चालू असते. सुमारे एक लक्ष लोक या यात्रेस जमतात. शेतकऱ्यांच्या जीवनास लागणाऱ्या प्रत्येक गोष्टींची, बैलजोड्या, नांगर, वखर, अवजारे, कापड, छकडे, बंड्या, भांडीकुंडी वगैरे मोठी बाजारपेठ येथे भरते. या जिल्ह्याच्या सरहद्दीवरील ही मोठी व जास्त दिवस चालणारी यात्रा होय. ही यात्रा मार्गशीर्ष महिन्यांत भरते.

**बहिरमची यात्रा**

मोर्शीपासून अवघ्या पांच मैलावर हे खेडे आहे. येथे दोन झरे असून एक ऊन पाण्याचा व एक थंड पाण्याचा आहे. या झऱ्यांत आंघोळ केल्यास त्वचेचे रोग बरे होतात असा समज आहे. कर्नल मिजेस टेलर यांनी असे लिहून ठेवले की १८५७ सालीं त्यांनी येथे आंघोळ केली व त्यामुळ त्यांचा मलेरिया तात्पुरता थांबला.

**सालबर्डी**

दरवर्षी महाशिवरात्रीस (मार्च महिन्यांत) येथे मोठी यात्रा भरते व तेथे सुमारे ५०,००० चे वर लोक जमतात. ही यात्रा तीन दिवसपर्यंत असते. तेथे भुयारात महादेवाचे देऊळ आहे. या ठिकाणची लोककथा अशी आहे की, रामचंद्रांनी सीतेचा त्याग केल्यावर ती येथे येऊन राहिली व लव-कुश यांनी शामकर्ण नांवाचा घोडा, जो रामचंद्रांनी सोडलेला होता तो येथेच अडविला व त्यांच्यात मोठी लढाई झाली. त्यांत राम-लक्ष्मणाचा पराभव झाला व ते मूर्छित होऊन पडले. त्यांचे कपडे व दागीने यांच्यावरून सीतेने त्यांना ओळखले व वाल्मिकी ऋषींनी त्यांना परत जिवंत केले. नंतर सीतेला घेऊन ते अयोध्येकडे गेले. सीतेची न्हाणी वगैरे गोष्टी येथे अजूनहि भाविक लोक दाखवितात. बाबुखान पेंढारी याचा किल्लाहि येथे जवळच आहे.

हे लहानसे पुराणप्रसिद्ध गांव वर्धा नदीचे काठावर चांदूर (रेल्वे) तहसिलीत असून ते अमरावतीपासून २२ मैलावर आहे. विदर्भाची अत्यंत प्राचीन राजधानी कुंडिणपूर, वर्धा नदीचे काठी, पौराणिक कालापासून प्रसिद्ध आहे. येथे कार्तिकी पौर्णिमेस (नोव्हेंबर) मोठी यात्रा भरते. सुमारे ५०,००० लोक यात्रेसाठी जमतात. रुक्मिणीदेवीचे वडील रुक्मय यांची राजधानी येथे होती. देऊळवाडा हे या खेड्याखाली दडले गेल्याची आख्यायिका आहे. येथून रुक्मिणी अंबादेवीचे दर्शनास नवस फेडावयाला गेली होती. रुक्मिणीचे लग्न शिशुपाल राजाशी ठरले होते, पण तिला ते पसंत नव्हते. अंबादेवीचे देवळाजवळ ती आली असतांना श्रीकृष्णाने येथूनच तिचे हरण केले. रुक्मिणीला परत आणल्याशिवाय कुंडीनपूरला परत येणार नाही, असा पण रुक्मिणीचा भाऊ रुक्मि याने केला. परंतु श्रीकृष्णाने त्याचा पराभव केल्यामुळें आपली प्रतिज्ञा त्यास पूर्ण न करता आल्यामुळे त्याने भोजकट नांवाचे नवीन नगर स्थापून तेथे आपली

**कौंडिण्यपूर**

राजधानी केली. हे भोजकट म्हणजे अमरावतीपासून आठ मैलांवर असलेले भातकुली होय. भातकुलीस अद्यापि रूक्मीचे मंदिर आहे. येथे कांही जैन मंदिरे आहेत. रुक्मिणी व शिशुपाल यांचे होणारे लग्न न झाल्याने लग्नासाठी आलेले पाहुणे येथेच राहिले म्हणून वऱ्हाडी यांच्यापासून वऱ्हाड व पुढे त्याचा अपभ्रंश बेरार झाला असावा असे म्हणतात. अमरावती शहराचे नांवहि अंबादेवीचे ठिकाण, इंद्राची राजधानी ती अमरपुरी म्हणजे अमरावती असा असावा असे म्हणतात.

**ऋणमोचन**

हे गांव अमरावतीपासून सुमारे १८ मैलांवर पूर्णा नदीचे काठी वसले आहे. पौष महिन्यातल्या (जानेवारी) दर रविवारी येथे यात्रा भरते. या यात्रेस सुमारे २५ ते ३० हजार लोक जमतात. या यात्रेस गेल्याने व तेथे स्नान केल्याने मनुष्याचे सर्व क्लेश दूर होऊन त्याला मोक्ष प्राप्त होतो असा समज आहे.

**रिथपूर**

रिथपूर हे महानुभाव पंथाचे काशीक्षेत्र समजले जाते. चैत्र व आषाढी पौर्णिमेस येथे यात्रा भरते. सुमारे दहा हजार लोक या यात्रेस जमतात. श्री चक्रधर स्वामींनी स्थापन केलेल्या महानुभाव पंथाचे गुरु श्री गोविंद प्रभु यांचे रिथपूर येथे निवासस्थान होते.

**भिलटेक**

चांदूर तालुक्यांत असून येथे नागोबाचे देऊळ आहे. दरवर्षी पौष शुद्ध प्रतिपदेस (डिसेंबर-जानेवारी) येथे यात्रा भरते.

**नेरपिंगळाई**

मोर्शी तालुक्यात असून अमरावतीपासून सुमारे २५ मैलावर आहे. पिंगळाई देवीचे देऊळ टेकडीवर असून दसरा व चैत्र पौर्णिमेस येथे यात्रा भरते.

**मार्की**

अमरावतीपासून ३२ मैलांवर असून दरवर्षी चैत्र महिन्यांत (मे) मार्की नाथाची यात्रा भरते. या यात्रेस सुमारे ५,००० लोक जमतात.

**बेनोडा**

हे गांव मोर्शी तालुक्यांत मोर्शीहून पुढे १३ मैल मोर्शी-वरूड रस्त्यावर आहे. १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामांत उत्तमगांवहून स्वातंत्र्यवीरांचा मोर्चा बेनोडा येथील पोलिस स्टेशनकडे येत होता. १६ ऑगस्ट १९४२ रोजी पोलीस स्टेशनपासून सुमारे २ फर्लांगावर मिरवणूक असतांनाच निर्घृण गोळीबार करण्यांत आला व या मोर्चातील आठ स्वातंत्र्यवीरांनी आपला देह धारातीर्थी ठेवला या हुतात्म्योंचे पुण्यस्मरण करून त्यांना श्रद्धांजलि वाहण्यासाठी दरवर्षी १६ ऑगस्टला आजुबाजूच्या खेडयातील लोक हुतात्म्यांच्या फोटोची मिरवणूक शहीद स्मारकापर्यंत नऊन त्यांना श्रद्धांजलि अर्पण करतात.

**यावली**

हें गांव अमरावती तहसिलीत असून तें अमरावतीपासून १६ मैलावर आहे. या ठिकाणी दरवर्षी जानेवारीचे १७ तारखेस एक यात्रा भरते. यावली येथे १९४२ सालीं स्वातंत्र्य संग्रामांत ८ देशभक्तांनी आपले बलिदान केले. त्यांचे स्मरणार्थ येथे यात्रा भरते.

याशिवाय देऊरवाडा, रेवसा, वडनेरगंगाई, ब्राम्हणवाडा, धुईखेड, कोंडेश्वर, वाल्मिक तीर्थ आदि ठिकाणी लहान मोठ्या यात्रा भरतात.

# १६. वृत्तपत्रें व प्रसिद्धि

अमरावती हा जिल्हा राजकीय, समाजिक व शैक्षणिकदृष्ट्या आघाडीवर असलेला जिल्हा आहे. राजकीय घटना, पक्ष, विकास कार्य व सामाजिक, आर्थिक व अन्य इतर क्षेत्राबाबत माहिती देण्याचे कार्य वृत्तपत्राद्वारे फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. या जिल्ह्यांत सध्या एकूण चौदा नियतकालिकें चालू असून त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :—

| | | |
|---|---|---|
| (१) | हिन्दुस्थान ... ... | दैनिक. |
| (२) | उदय ... ... | द्विसाप्ताहिक. |
| (३) | लोकदर्शन .. ... | साप्ताहिक. |
| (४) | सुप्रभात ... ... | दैनिक. |
| (५) | आवाज ... ... | साप्ताहिक (उर्दू). |
| (६) | प्रागतिक शिक्षण ... | पाक्षिक. |
| (७) | शिक्षण मार्ग दर्शन ... | पाक्षिक |
| (८) | जीवन ... ... | पाक्षिक. |
| (९) | अमरावती टाईम्स ... | साप्ताहिक (उर्दू). |
| (१०) | गुरूदेव ... ... | मासिक. |
| (११) | सहकारी विदर्भ ... | मासिक. |
| (१२) | ज्योति प्रकाश ... | साप्ताहिक. |
| (१३) | नाग-विदर्भ. ... ... | द्विसाप्ताहिक. |
| (१४) | वाटचाल ... | साप्ताहिक. |

एकूण वृत्तपत्रे १४—दैनिके २, द्विसाप्ताहिके २, साप्ताहिके ५, पाक्षिके ३, मासिके २.

वरील स्थानिक वृत्तपत्रांशिवाय भारतातील अनेक मराठी, हिन्दी, गुजराथी, इंग्रजी भाषातील दैनिके मासिके, साप्ताहिके या जिल्ह्यात येतात. महाराष्ट्रातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांचे वार्ताहर अमरावतीस असून जिल्ह्यातील बातम्यांना सर्वदूर प्रसिद्धि देण्याचे कार्य त्यांचेमार्फत होते.

## जिल्हा प्रसिद्धि कार्यालय

सरकारी योजना कार्यास प्रसिद्धि देणे, सरकारी वार्ता वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करणे, योजना कार्याची उद्दिष्टें व ध्येय याबाबतची माहिती लोकांना देऊन, योजना कार्यात त्यांचे सहकार्य मिळविण्याचे कार्य जिल्हा प्रसिद्धि कार्यालयाद्वारा करण्यांत येते. योजना कार्याबाबत जनमताचा कानोसा घेऊन ते सरकारला कळविणे हें कार्यहि या खात्यामार्फत होत असते.

जनतेस जिल्ह्यातील विकास कार्याबाबत अद्यावत माहिती मिळत राहावी, जिल्ह्याच्या अंग-उपांगाबाबत, वैशिष्टयांबाबत माहिती व्हावी या उद्देशाने जिल्हा प्रसिद्धि कार्यालयांत जिल्हा माहिती केन्द्र सुरू करण्यात आले आहे. या माहिती केन्द्रावर विविध योजनाविषयक माहिती, चार्टस्, मॉडेल्स, आराखडे, नकाशे, भित्तिपत्रके याद्वारा देण्यांत येते. शिवाय कांही योजनाविषयक पुस्तके, वृत्तपत्रे व सन्दर्भ ग्रंथहि या माहिती केन्द्रावर ठेवण्याची सोय करण्यांत आली आहे. जिल्ह्यांतील लोकांना व इतर प्रवाशांना तर या माहितीचा फारच फायदा होतो.

**माहिती केंद्र.**

जिल्ह्यांतील विकास कार्यावर लेख लिहून ते जिल्हा वृत्तपत्रातून प्रसिद्ध केले जातात. शिवाय दौरे आयोजित करून पत्रकारांना विकास कार्याचे दर्शन घडविणे, हे कार्य या कार्यालयामार्फत केले जाते.

ग्रामीण भागांतील जनतेस देशातील विकास कार्य, घटना व इतर बाबींविषयीं माहिती होत रहावी व खेड्यातील मनोरंजनाची सोय उपलब्ध व्हावी या हेतूने, खेड्यातील लोकांसाठीं ग्रामपंचायतीस (सार्वजनिक मंडळास) रेडियो देण्याची सोय करण्यांत आली आहे. हे रेडिओ ग्रामीण रेडिओ योजनेद्वारा अल्प किंमतीत देण्यांत येतात. या सर्व रेडिओच्या दुरुस्तीचे काम व त्यांना बॅटऱ्या पुरविण्याचे कार्यहि रूरल ब्रॉडकास्टींग विभागामार्फत केले जाते.

**रेडिओ केंद्र**

या सवलतीचा फायदा घेण्यास अनेक ठिकाणचे अर्ज येत आहेत. आतापर्यंत या जिल्ह्यांत २२६ रेडिओ सेट्स असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :—

| तहसिलीचे नांव | रेडिओ सेटस्‌ची संख्या |
|---|---|
| अमरावती ... ... | ३८ |
| अचलपूर ... ... ... | ५९ |
| चांदूर रेल्वे ... ... | ४५ |
| मेळघाट ... ... ... | ४ |
| मोर्शी ... ... ... | ५७ |
| दर्यापूर ... ... ... | ६३ |

जिल्ह्यात १२ नभोवाणी शेतकरी मंडळें आहेत.

वरील विविध कार्यक्रमांचे जिल्हाभर आयोजन करून विकास योजना कार्याचे प्रचार कार्य या जिल्ह्यांत होत आहे.

**चित्रपटगृहे.**

अमरावती शहर हे पूर्व महाराष्ट्रांतील एक महत्वाचे सांस्कृतिक केंद्र आहे. ते चित्रपट व्यवसायाचे प्रदर्शन आणि वितरण या दृष्टीने महत्वाचें केंद्र आहे.

अमरावती शहरांत चित्रपट वितरणाच्या ३९ संस्था व ९ चित्रपट प्रदर्शनगृहे आहेत. अमरावती शहराव्यतिरिक्त अचलपूर येथे २, धामणगांव २, दर्यापूर १, अंजनगांव २, वरूड १, चांदूर १, बडनेर येथे २; अशी ११ चित्रपटगृहे व नाटक आणि तमाशांसाठी ४ रंगभवने आहेत.

## संकीर्ण

**उद्योग विनियोग केंद्र**

इन्टरनॅशनल लेबर आर्गनायझेशनच्या १९११ साली झालेल्या अधिवेशनांत उद्योग विनिमय केन्द्र (एम्प्लॉयमेंट एक्सचेंज) या कल्पनेला जन्म मिळाला. दुसऱ्या महायुद्धानंतर भारतांतील कांही प्रमुख शहरांतून एम्प्लायमेंट एक्सचेंजची स्थापना झाली. महायुद्धातून परत आलेल्या हजारो सैनिकांना उद्योगधंदे किंवा नोकऱ्या देणे, हा या एक्सचेंजचा उद्देश होता. परंतु स्वातंत्र्योत्तर काळांत या यंत्रणेच्या उद्देशात आणि कार्यपद्धतीत बदल करण्यांत आला आणि १९५६ साली एम्प्लॉयमेंट एक्सचेंज ही केंद्रीय सरकारच्या यंत्रणा कक्षेतून राज्य सरकारच्या यंत्रणेत आणण्यांत आली.

अमरावती येथील एम्प्लॉयमेंट एक्सचेंज १९५०-५१ मध्ये स्थापन करण्यांत आले. कामधंदा नसलेल्यांना उद्योग मिळवून देणे आणि औद्योगिक संघटणांना उमेदवार मिळवून देणे, असे दुहेरी कार्य या एक्सचेंजमार्फत होत असे.

सुरवातीला सर्वसाधारण समजूत अशी होती की फक्त सरकारी नोकऱ्यांची माहिती या केंद्रांत मिळते आणि हे कार्यालय फक्त सरकारी नोकऱ्यांसाठीच आहे.

१९५६ साली ही (एक्सचेंज) राज्य सरकारच्या अधिकारक्षेत्रांत आल्यानंतर सरकारी कार्यालया-बरोबरच नगरपालिका, जनपदसभा, खासगी शिक्षण संस्था, जिनिंग फॅक्टरीज या केंद्राचा उपयोग करून घेत.

कंपलसरी नोटिफीकेशन ऑफ व्हेकन्सीज हा कायदा १९५९ मध्ये लोकसभेने मंजूर केला. महाराष्ट्र सरकारनेहि या स्वरूपाचा एक कायदा मंजूर करून त्यान्वयें सर्व सरकारी खाती, तसेंच ज्या ज्या निमसरकारी व खाजगी संस्था यंत्रणेत ५० पेक्षा अधिक कर्मचारी असतील, त्यावर रिकाम्या झालेल्या जागेची माहिती एम्प्लॉयमेंट एक्सचेंजला कळविण्याचे बंधन घातले आहे.

अमरावती येथील उद्योग विनिमय केंद्र हे वऱ्हाडच्या चार जिल्ह्यासाठी स्थापन झाले होते. द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या काळांत अकोला, यवतमाळ आणि बुलढाणा येथे जिल्हा उद्योग विनिमय केंद्र स्थापन झाल्यामुळे अमरावती येथील (एम्प्लॉयमेंट एक्सचेंज) चे कार्यक्षेत्र अमरावती जिल्ह्यापुरतेच राहिले आहे.

**नोकऱ्यांविषयीची माहिती**

या योजनेमुळे देशांतील विविध संस्थांत उपलब्ध असलेल्या नोकऱ्या, त्यासाठी आवश्यक असलेली, शिक्षण-पात्रता, पगार वगैरे माहिती गोळा करण्याचे कार्य या एक्सचेंजद्वारे, सुरूं झालेले आहे.

विद्यार्थीदशेंतच विद्यार्थ्याला भावी आयुष्यांत कोणता उद्योग करता येण्यासारखा आहे विविध क्षेत्रांत उपलब्ध असलेली संधि, याबाबत माहिती देण्याचे उद्देशाने अमरावती येथे युवक व्यवसाय मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्यांत आले आहे. नोकरी आणि व्यवसायांच्या दृष्टीने पोषक शिक्षण देणाऱ्या संस्थाची माहिती या केंद्राद्वारे विद्यार्थ्यांना दिली जाते.

## सांख्यकीय संघटना

जिल्ह्यांतील विकास कार्याची आणि सरकारी कार्याची माहिती एकत्रित करून झालेले कार्याचे मूल्यमापन करण्याचे उद्देशाने राज्य सांख्यकीय (स्टॅटिस्टीक्स) संघटनेचे जिल्हा कार्यालय अमरावती येथे द्वितीय पंचवार्षिक योजना काळांत सुरू झालेले आहे. जिल्हा सांख्यकीय अधिकारी यांना मदत करण्यासाठी विकास खंडांत सांख्यकीय सहाय्यक असून विकास खंडातील माहिती गोळा करण्याचे कार्य ते करीत आहेत.

## श्रम संघटना

दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळांत अमरावती येथे डिस्ट्रीक्ट लेबर ऑफिसरचे कार्यालय सुरू झाले आहे. औद्योगिक संस्थांचे मालक व त्यातील कर्मचारी यांचे संबंध सलोख्याचे रहावे, तसेंच मजूरांच्या हिताच्या दृष्टीने होणाऱ्या कायद्याची अंमलबजावणी व्हावी, यासाठी डिस्ट्रीक्ट लेबर ऑफिसर यांचे कार्यालय अमरावती येथे सुरू करण्यांत आले आहे.

मजुरांच्या मनोरंजनासाठी अमरावती, बडनेरा, व अचलपूर येथे कामगार कल्याण केंद्रें स्थापन करण्यांत आली आहेत.

## शहर योजना

शहरांतील लोकसंख्या वाढत आहे, त्यामुळे शहरांचाहि विस्तार वाढत आहे. शहरांची बांधणी सुटसुटींत व्हावी यासाठी अमरावती व अचलपूर या शहरांचा मास्टर प्लॅन तयार करण्यांत आला असून बडनेरा शहरांचा मास्टर प्लॅन अमरावती शहर योजनाअधिकारी करीत आहे.

# १७. जिल्हा परिषद

दिनांक १ मे, १९६२ पासून महाराष्ट्रांत लोकशाही विकेंद्रीकरण कायदा अंमलांत आला असून त्यानुसार जिल्हा परिषदांच्या निवडणुका झाल्या. ही घटना महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनांत मोठे परिवर्तन घडवून आणणारी आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागांतील आजचें जीवन आणि १५ वर्षांपूर्वीचें जीवन यांत बराच मोठा फरक पडला आहे. सर्वसामान्य शेतकरी आतां विकास कार्याविषयी जागरूक होत असल्यामुळें परिणामतः राजकीय दृष्टयाहि जागृत होत चालला आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांची आणि कामकऱ्यांची अस्मिता जागृत झाली आहे. आणि म्हणूनच, या जागृत नवीन पिढीच्या आकांक्षा पूर्ण करणारा लोकशाही विकेंद्रीकरणाचा हा धाडसी प्रयोग आहे.

लोकशाही विकेंद्रीकरणाची नवी योजना, हें योग्य दिशेनें धैर्यानें टाकलेलें पाऊल असून जिल्हा हा या योजनेचा मूलभूत घटक होय. बलवंतराय मेहता समितीनें सुचविल्याप्रमाणें तालुका हे मूलभूत विकास क्षेत्र न स्वीकारण्यास कांहीं कारणें आहेत. पहिलें कारण असें कीं लोकल बोर्डस्, स्कूल बोर्डस्, विकास मंडळें इत्यादि स्थानिक स्वरूपाच्या संस्था आजवर जिल्हापातळीवरच काम करीत आल्या आहेत. तेव्हां या नवीन योजनेचा सांगाडा उभारण्यासाठीं, या परंपरेचा भक्कम आधार घेणें हितावह आणि सोयीचे ठरणार आहे. जनतेला संस्थांचा विचार जिल्हा पातळीवरून करण्याची संवय जडली आहे. तिचाच उपयोग करणें इष्ट होईल. दुसरें असें कीं, 'जिल्हा' हाच घटक मानला तर स्थानिक नेतृत्वाच्या वाढीस पुरेसा वाव मिळेल. तिसरे म्हणजे योजनाबद्ध कार्यक्रम अंमलांत आणण्याच्या मार्गांत, लहान घटकामुळें अनेक अडचणी उपस्थित होण्याची शक्यता आहे. शिवाय साधनसामग्री, निरनिराळ्या कार्यांतील एकसूत्रीपणा, कर्मचारी आणि कामगार इत्यादि बाबतींत जिल्हा हेंच अत्यंत सोयिस्कर क्षेत्र आहे.

बलवंतराय समितीच्या अहवालांत अप्रत्यक्ष निवडणुकीची कल्पना मांडण्यांत आली असली तरी आपल्या राज्यांत जिल्हा परिषदा प्रत्यक्ष मतदानानें निवडल्या आहेत. कारण अप्रत्यक्ष निवडणुकां-बाबत लोकांना पुरेसा उत्साह वाटत नाहीं. त्यामुळें एकदा ग्रामपंचायतींच्या निवडणुका झाल्या कीं लोकांचा मग जिल्हा परिषदांशीं तसा प्रत्यक्ष संबंध असणार नाहीं. तेव्हां ज्या पातळीवरील संघटनेच्या हातीं खरी सत्ता असेल, त्या संघटनेच्या निवडणुका प्रत्यक्ष मतदानानेंच व्हावयास पाहिजे. म्हणून जिल्हा परिषदांच्या निवडणुका प्रत्यक्ष होणें श्रेयस्कर आहे.

पण विकास गटाचा अध्यक्ष, जिल्हा सहकारी संघटनेचा प्रमुख व इतर अशाच प्रकारच्या संघटनांचे प्रमुख जिल्हा परिषदांचे सभासद असून निवड अप्रत्यक्षरीत्या झाली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांचें कार्यक्षेत्र परिषद कार्यापासून अलग ठेवण्यांत आलेले आहे. जिल्हाधिकाऱ्यांचा परिषदेशीं संबंध येतो तो केवळ परिषदेचे नोकर निवडण्यासाठीं असलेल्या समितीचे सदस्य या नात्यानें. पण यामुळें जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाचें महत्त्व संपुष्टांत येईल असें मानण्याचें कारण नाहीं. कारण जिल्हाधिकाऱ्याला अन्य अनेक प्रकारचीं कामें जबाबदारीनें पार पाडावयाचीं असून त्या दृष्टीनें त्याला भरीव अधिकारहि देण्यांत आलेले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकाराचें व कार्यक्षेत्राचें स्थूलमानानें पुढील स्वरूप राहील.

राज्य सरकारच्या आदेशानुसार जिल्हाधिकाऱ्याला जिल्हा परिषदेच्या कामकाजासंबंधी कोणतीहि माहिती अगर आंकडेवारी मागविण्याचा अधिकार आहे.

जिल्हा परिषद अगर पंचायत समिती यांच्या ठरावाच्या अंमलबजावणीनें अगर अन्य कोणत्याहि आदेशामुळें शांतता भंग होईल, अगर जनतेस त्यामुळें त्रास होईल असें जिल्हाधिकाऱ्यांचें मत असले तर आपल्या लेखी आदेशानें अशी अंमलबजावणी स्थगित करण्याचा त्यांना अधिकार आहे. मात्र या आदेशाची प्रत संबंधित परिषद व कमिशनर यांच्याकडे पाठविली पाहिजे. कमिशनरांना सदर आदेशांत जरूर तो फेरफार करण्याचा अधिकार आहे.

निकडीच्या प्रसंगी सार्वजनिक आरोग्य व सुरक्षितता याबाबतींत कांहीं विशेष असे असाधारण काम पार पाडणें असल्यास ती बाब परिषदेच्या कक्षेंतील असली तरी जिल्हाधिकाऱ्याला त्या संबंधी जरूर ती व्यवस्था करण्याचा अधिकार आहे व यासाठीं होणारा खर्च अगर द्यावयाचा मेहेनताना परिषदेनें देण्याची सूचना करण्याचा जिल्हाधिकाऱ्याला अधिकार आहे.

जिल्हापरिषदेच्या कार्यासाठीं घ्यावयाच्या नोकरांची निवड करण्यासाठीं या कायद्यान्वयें अस्तित्वांत येणाऱ्या समितीवर जिल्हाधिकारी पदसिद्ध सभासद आहेत.

जिल्ह्यांतील कायदा व सुव्यवस्था पालनाची जबाबदारी सर्वस्वी जिल्हाधिकाऱ्यांची आहे.

लोकशाही विकेंद्रीकरण कायदा अंमलांत आल्यापासून म्हणजेच १ मे, १९६२ पासून आपल्या राज्यांतील प्रत्येक जिल्ह्यांत जिल्हा परिषदेची स्थापना करण्यांत आली आहे. या परिषदेवरील प्रतिनिधी जनतेनें निवडून दिले असून जास्तीत जास्त ३५,००० लोकसंख्येला एक, या प्रमाणांत हे प्रतिनिधी निवडले आहेत. या परिषदेत प्रतिनिधींची संख्या जास्तींत जास्त साठ आणि कमीत कमी चाळीस आहे. त्यांत एक स्त्री प्रतिनिधी (सभासद), अनुसूचित जाति आणि संयुक्त सहकारी संस्थेचे अध्यक्ष हे सहयोगी सभासद म्हणून या परिषदेंत घेण्यांत आले आहे.

ही परिषद जिल्ह्यांतील विकास कार्याबाबत पूर्ण जबाबदार राहणार आहे. आणि म्हणून परिषदेच्या स्थायी समितीत अर्थ समिती,बांधकाम समिती, कृषि समिती, सहकार समिती, शिक्षण समिती आणि आरोग्य समिती अशा अनेक समित्या असतील. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हे स्थायी समितीचे पदसिद्ध अध्यक्ष राहतील.

जिल्हा परिषदेसाठीं एक मुख्य कार्यकारी अधिकारी आणि दुसरा उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती राज्य शासनाकडून करण्यांत आली आहे.

जिल्ह्यांतील प्रत्येक गटासाठीं पंचायत समिती असून ती लोकांनीं निवडून दिलेली आहे. या समितीवर निवडून आलेले सभासद, एक स्वीकृत सभासद, शेतकी सहकारी संस्थेचे अध्यक्ष, गटांतील स्त्रिया, अनुसूचित जाति आणि जमाति यांचे प्रतिनिधी समितींत निवडून आलेले नसल्यास प्रत्येकी एक, आणि पंचायतीच्या सभासदांनीं निवडून दिलेले दोन सरपंच इतके सदस्य आहेत.

पंचायत समितीसाठीं एका गटविकास अधिकाऱ्याची नेमणूक झाली आहे. गटविकास अधिकारी हा पंचायत समितीचा पदसिद्ध चिटणीस आहे. पंचायत समितीचे सभापति आणि उपसभापति निवडून दिलेले आहेत.

जिल्हा परिषदेवर विकास कार्याची अंमलबजावणी अगर देखभाल करण्याची जबाबदारी सोपविण्यांत आली असून जिल्हा परिषद शासनाचे याबाबतींत प्रतिनिधी म्हणून काम पाहील. जिल्हा परिषद शक्यतो सर्व कामें पंचायत समित्याद्वारें पार पाडील. कांहीं ठराविक कामें मात्र पंचायत समित्या मार्फतच पार पाडलीं जातील. जिल्हा परिषदेकडे पुढील कामें सोपविण्यांत आलीं आहेत.

## शेतकी

१. शेतकी शाळा स्थापन करणें, त्यांची व्यवस्था ठेवणें, त्या सुस्थितींत राखणें आणि त्यांना अनुदानें देणें (सहाय्यित शेतकी शाळांना अनुदान देणें या बाबी समाविष्ट करून). परंतु त्यांत पुढील गोष्टींचा समावेश होणार नाहीं :—

(१) अभ्यासक्रम ठरवून देणें,

(२) पाठ्य पुस्तकें विहित करणें,

(३) शेतकी शाळांची तपासणी, आणि ;

(४) वार्षिक परीक्षा घेणें.

२ पीक स्पर्धा.

३. पीक संरक्षण.

४. पीक मोहिमा (खरीप आणि रब्बी पिकांच्या मोहिमा आणि भातशेतीची लागवड धरून).

५. मिश्र खतें व स्थानिक खतें.

६. रासायनिक खतें, शेतीचीं अवजारें आणि शेतीसाठीं लागणारें लोखंड, पोलाद आणि सीमेंट यांचें वांटप.

७. सुधारलेल्या शेतीपद्धतीचें प्रात्यक्षिक.

८. दुय्यम बीज केंद्राचें आदर्श प्रात्यक्षिक.

९. सुधारलेल्या बियाणांची आयात व वांटप.

१०. गुदामें बांधणें आणि त्यांची व्यवस्था ठेवणें.

११. शेतीची प्रगति व सुधारणा.

१२. घातक वनस्पतींचा नाश करणें.

१३. अन्यस्थानीय झाडें लावून तीं आपल्या प्रदेशांत वाढविणें.

## पशुसंवर्धन

१४ पशुवैद्यकीय सहाय्य (जिल्ह्यांतील गुरांचीं रुग्णालयें वगळून परंतु गुरांचे दवाखाने, पशुवैद्यकीय सहाय्य केंद्रें आणि खेडयांतील पशुवैद्यकीय पेटया समाविष्ट करून.)

१५. गुरांच्या, घोडयांच्या आणि इतर पशुधनाच्या पैदाशीची सुधारणा (यांत कृत्रिम रेतन उपकेंद्रें, प्रमुख ग्राम केंद्रें, वळू बैलांचीं प्रमुख केंद्रें, वैरण सुधारण्याच्या जागा, वैरण मुरवायचे खड्डे, तालुका आणि जिल्हा पशुधन सुधारणा संघ व इतर तत्सम संस्था स्थापणें आणि मेंढयांच्या पैदाशीचें वांटप यांचा समावेश होतो).

१६. सुधारलेल्या कोंबडया पुरविणें.

१७. गुरांचीं प्रदर्शनें व मेळावे भरविणें.

## जंगलें

१८. गांवजंगलें व कुरणें (यांत कुरणाच्या व जळण कारणांकरितां गांवजंगलांचा विकास करावयाच्या उपाययोजनांचा समावेश होतो).

## समाज कल्याण

१९. मागासलेल्या वर्गाचा शैक्षणिक विकास. यांत पुढील बाबींसंबंधीच्या उपाययोजनांचा समावेश होतो.

(१) मागासलेल्या वर्गाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, नादाऱ्या व परीक्षेची फी देणें, आणि

(२) मागासलेल्या वर्गाच्या विद्यार्थ्यांकरितां वसतिगृहें आणि शाळा स्थापन करणें, त्यांची व्यवस्था ठेवणें. यांत वसतिगृहांचें बांधकाम व त्यांची व्यवस्था करणें, यासाठीं वसतिगृहांस अनुदानें देण्याचा आणि अशा वसतिगृहांस तसेंच शाळांस इतर सहाय्य देण्याचा समावेश होतो. परंतु त्यांतून जिल्ह्यापेक्षां अधिक क्षेत्रासाठींचीं वसतिगृहें वगळण्यांत येतील.

२०. मागासलेल्या वर्गाचा आर्थिक विकास, यांत पुढील बाबींचा समावेश होतो :—

(१) शेतीची साधनसामग्री खरेदी करण्यासाठीं व्यक्तिशः शेतकऱ्यांस कर्जाच्या व अर्थ-सहाय्याच्या स्वरूपांत आर्थिक सहाय्य देणें ;

(२) कुटीरोद्योग आणि उद्योगधंदे यांसाठीं व्यक्तिशः कारागीरांस कर्जाच्या व अर्थसहाय्याच्या स्वरूपांत आर्थिक साहाय्य देणें ;

(३) विमुक्त जातींना चरखे पुरविणें;

(४) मागासलेल्या क्षेत्रांत दळणवळणाचा विकास करणें ;

(५) सहकारी स्टोअर्सची व्यवस्था ठेवणें आणि कर्मचाऱ्यांच्या व्यवस्थेसाठीं बहुउद्देशीय सहकारी संस्थांस अर्थसहाय्य देणें (ज्यांचें खेळतें भांडवल, प्रत्येकीं पांच लाख रुपयांहून अधिक नाहीं आणि ज्यांचें अधिकारक्षेत्र जिल्ह्यापेक्षां कमी आहे, अशा सहकारी संस्थांशी संबंध येत असेल तेथवर) ;

(६) हस्तव्यवसायाच्या केंद्रांची स्थापना करणें ; आणि

(७) गुरांच्या पैदाशीचा आणि कुक्कुटप्रजनन केंद्राचा विकास.

२१. अस्पृश्यतेचें निवारण. यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(१) हरिजन सप्ताह साजरे करणें ;

(२) झुणका-भाकर कार्यक्रम ;

(३) सवर्ण हिंदु आणि हरिजन यांच्यांतील आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देणें ; आणि

(४) अस्पृश्यता निवारणासाठीं उत्कृष्ट काम करणाऱ्या खेड्यांस बक्षिसें देणें.

२२. मागासलेल्या वर्गाच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम, यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(१) महिलांच्या आणि बालकांच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम व योजना ;

(२) बालवाड्यांची स्थापना करणें व त्यांची व्यवस्था ठेवणें ,

(३) मागासलेल्या वर्गाच्या विकासासाठीं प्रचार व प्रसिद्धि करणें ;

(४) मागासलेल्या वर्गासाठीं करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करणें ;

(५) सामाजिक मेळे भरविणें ;

(६) मागासलेल्या वर्गासाठीं संस्कार केंद्रें, सामूहिक व करमणुकींचीं केंद्रें आणि सामूहिक सभागृहें ; चालविणें ,

(७) विमुक्त जातींना कपडे पुरविणें;

(८) औषधी खरेदी करण्यासाठीं व्यक्तींना आर्थिक सहाय्य देणें आणि स्वतः होऊन मदत देऊं केलेल्या संस्थांना, वैद्यकीय मदत देण्यासाठीं अनुदानें देणें ;

(९) मागासलेल्या वर्गाच्या इसमांसाठीं घरांची तरतूद करणें ; आणि

(१०) पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची तरतूद करणें.

२३. मागासलेल्या वर्गाचें प्रशिक्षण, यांत पुढील बाबींचा समावेश होतो :—

(१) प्रशिक्षण शिबिरांचें आयोजन करणें ; आणि

(२) तांत्रिक प्रशिक्षण आणि पारंपारिक व्यवसायांच्या सुधारलेल्या पद्धतीचें प्रशिक्षण

## शिक्षण

२४. प्राथमिक शाळांची आणि मूलोद्योग शाळांची स्थापना, व्यवस्था, त्या सुस्थितींत ठेवणें, त्यांची तपासणी करणें आणि त्यांना भेटी देणें, सहाय्यित शाळांना अनुदानें देणें, समाविष्ट करून पुढील गोष्टीं-संबंधीच्या बाबी वगळून :—

(१) अभ्यासक्रम ठरवून देणें ;

(२) पाठ्य-पुस्तकें ठरविणें ;

(३) शिष्यवृत्त्या देण्यासाठीं परीक्षा घेणें ;

(४) विदर्भातील प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा आणि चौथ्या वर्गाच्या परीक्षा घेणें ; आणि

(५) मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७, अन्वयें राज्य सरकारकडे निहित केलेले इतर अधिकार.

२५. माध्यमिक शाळांची स्थापना, त्या सुस्थितींत ठेवणें, त्यांची तपासणी करणें आणि त्यांना भेटी देणें, परंतु त्यांतून पुढील गोष्टी वगळण्यांत आल्या पाहिजेत :—

(१) अभ्यासक्रम ठरविणें ;

(२) पाठ्य-पुस्तकें ठरविणें ;

(३) परिक्षण अनुदानाचे दर आणि त्यासाठींच्या शर्ती ;

(४) उच्च शाळांचें उच्चतर माध्यमिक शाळांत रूपांतर करण्यासाठीं परवानगी देणें ;

(५) फीचे दर ;

(६) मान्यतेच्या सर्वसाधारण शर्ती ठरविणें ;

(७) प्राथमिक आणि उच्च शाळांच्या शिष्यवृत्तिसाठीं परीक्षा घेणें ; आणि

(८) सहाय्यक-अनुदान-संहितेनुसार, शिक्षण संचालकांकडे विशेषरीत्या सोंपविण्यांत किंवा राज्य सरकारकरितां राखून ठेवण्यांत येतील असे इतर अधिकार.

खाजगी माध्यमिक शाळांच्या बाबतींत, अनुदानें व कर्जें यांबाबत केवळ शिफारस करणें आणि शिक्षण संचालकांची मंजुरी मिळाल्यानंतर त्यांचें वांटप करणें.

२६. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या संबंधांत विद्यार्थ्यांस कर्जें आणि शिष्यवृत्त्या देणें.

२७. माध्यमिक शाळांच्या इमारती बांधणें आणि त्या सुस्थितींत ठेवणें.

२८. इतर शैक्षणिक उद्दिष्टें.

२९. शाळांसाठीं साधनसामग्री व क्रीडांगणें, यांची तरतूद करणें.

## वैद्यकीय

३०. तालुका दवाखाने आणि तालुका दवाखान्यांच्या दर्जांत वाढ करणें.

३१. सिव्हिल आणि कॉटेज रुग्णालयें, त्याचप्रमाणें सिव्हिल रुग्णालयाप्रमाणें असलेलीं इतर मोठीं सरकारी रुग्णालयें वगळून इतर रुग्णालयें.

३२. वैद्यक व्यवसायांची अर्थ-सहाय्यित केंद्रें.

३३. ग्रामीण वैद्यकीय मदत केंद्रें आणि सार्वजनिक वैद्यकीय मदत.

३४. पिसाळलेलीं कुत्रीं चावल्यानंतर, निर्धन इसमावर त्यासाठीं प्रतिबंधक असा इलाज करणाऱ्या संस्थांना आर्थिक सहाय्य देणें.

३५. खाजगी धर्मार्थ रुग्णालयें, औषधालयें, प्रसूतिगृहें आणि तत्सम इतर संस्था.

## आयुर्वेद

३६. आयुर्वेदिक व युनानी दवाखाने (यांत अशा दवाखान्यांना अनुदानें देण्याचा समावेश होतो).

३७. खेड्यांतील आयुर्वेदिक औषधांच्या पेट्यांतील औषधांचा सांठा पुन्हां भरून काढणें.

## सार्वजनिक आरोग्य

३८. प्राथमिक आरोग्य केंद्रें.

३९. फिरती आरोग्य पथकें.

४०. वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यासाठीं एकत्रित पथकें.

४१. देवीप्रतिबंधक लस टोचणें.

४२. शालेय आरोग्य सेवा.

४३. 'यॉज' रोगाविरूद्ध उपचारासाठीं उपाययोजना.

४४. प्रसूति व शिशुकल्याण केंद्रें.

४५. खेड्यांत औषधी पेट्या ठेवणें.

४६. आरोग्य शिक्षणासाठी सोयी.

४७. ग्रामीण साफसफाई.

४८. सार्वजनिक आरोग्य रक्षणासाठीं आवश्यक ती उपाययोजना करणें.

४९. गलिच्छ वस्त्यांचें पुनर्वसन (त्या कारणांसाठीं खाजगी व्यक्तीस किंवा संस्थांस कर्जें देण्याचा समावेश करून).

## इमारती व दळणवळण

५०. (१) ग्रामीण रस्ते ,
(२) इतर जिल्हा रस्ते ;
(३) प्रमुख जिल्हा रस्ते ; आणि
(४) वर दिलेल्या रस्त्यांवरील पूल ;

यांचें बांधकाम, ते सुस्थितींत राखणें व त्यांची दुरुस्ती.

५१ ग्रामीण उद्यानें आणि बगीचे (राष्ट्रीय उद्यानें आणि बगीचे वगळून).

५२ जिल्हा परिषदेच्या गरजांच्या संबंधांतील प्रशासनविषयक आणि इतर इमारतींचें बांधकाम.

५३. रस्त्यांव्यतिरिक्त दळणवळणाचीं इतर साधनें.

५४. सार्वजनिक नावा. ..

५५. रस्त्याच्या आजूबाजूस झाडें लावणें.

५६. छोटे लोहमार्ग व ट्रामचे मार्ग.

५७. टेलिफोन लाईन्स.

## सार्वजनिक आरोग्यविषयक इंजीनियरिंगचीं कामें

५८. ग्रामीण पाणीपुरवठा
५९. ग्रामीण विभागांतील जत्रांसाठीं सुरक्षित पाणीपुरवठा
६०. ग्रामीण गटारें
६१. पिण्यासाठीं, स्नानासाठीं किंवा स्वयंपाकासाठीं लागणारें पाणी दूषित होऊं नये म्हणून त्याचें संरक्षण करण्यासाठीं बांधकाम.

(प्रत्येक बाबतींत पांच लाख रुपयांहून अधिक भांडवली खर्चाच्या योजना वगळून.)

## पाटबंधारे

६२. छोटी पाटबंधाऱ्यांचीं कामें [प्रत्येकीं २५० एकर किंवा त्याहून कमी एकर (जमीन) भिजविणारीं जलसिंचनाचीं कामें].

## उद्योगधंदे व कुटीर उद्योग

६३. स्थानिक उद्योगधंदे
६४. स्थानिक कला

(कुटीरोद्योग व लहान प्रमाणावरील उद्योगधंदे यांचे बाबतींत दहा हजार रुपयांपर्यंतचीं कर्जें मंजूर करण्याच्या मर्यादेपर्यंत.)

६५. जिल्ह्यापेक्षां मोठ्या असलेल्या क्षेत्रासाठीं असलेल्या संस्था व संशोधन संस्था वगळून प्रशिक्षण संस्था आणि शाळा.

६६. प्रशिक्षण-उत्पादन केंद्रें आणि उत्पादन केंद्रें.

६७. विक्री भांडारें व विक्रीचीं दुकानें.

६८. वैयक्तिकरीत्या कारागीरांस सहाय्यक अनुदानें व कर्जें देणें.

६९. प्रशिक्षण घेणारांस विद्यावेतनें देणें.

७०. कुटीर उद्योग आणि ग्रामोद्योग यांची वाढ व विकास.

७१. कुटीर उद्योग किंवा ग्रामोद्योग यांतील उत्पादनासाठीं विक्रीच्या सोयी उपलब्ध करून देणें.

७२. औद्योगिक संस्थांस सहाय्यक अनुदानें व कर्जें देणें.

७३. हातमाग.

७४. वजनें व मापें अधिनियम यांच्या अंमलबजावणीशीं संबंधित असलेले अंमलबजावणीचें काम.

## सहकार

७५. सहकारी संस्थांची नोंदणी (ज्या संस्थांचें खेळतें भांडवल पांच लाख रुपयांहून अधिक नसेल आणि ज्यांचें अधिकारक्षेत्र एका जिल्ह्यापेक्षां कमी आहे, केवळ अशाच संस्थांच्या बाबतींत).

७६. वरील नोंद ७५ मध्यें निर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या संस्थांच्या उपविधींस मंजूरी.

७७. वरील नोंद ७५ मध्यें निर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या संस्थांचे सदस्य होण्यास प्रवेश न मिळाल्यामुळें केलेलीं अपीलें.

७८. सहकारी संस्थांवरील, प्रशासनविषयक देखरेख (केवळ संस्थांनीं आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांनीं अंगिकारलेला, व्यापाराचा दर्जा सुधारण्याच्या तसेंच त्यांच्या कामांची व्याप्ति वाढण्याच्या दृष्टीनें संस्थांचें सर्वसाधारण कामकाज, त्यांची व्यवस्था आणि त्यांची आर्थिक परिस्थिति यांची तपासणी करण्याच्या मर्यादेपर्यंतच)

(**टीप.**—नोंदी ७५, ७६, ७७ आणि ७८ मध्यें दिलेलीं वरील कामें, जिल्हा परिषदेखालीं काम करणाऱ्या सहाय्यक रजिस्ट्रारनें, सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारनें केलेले नमुनेवजा उपविधि आणि काढलेल्या सूचना यांनुसार पार पाडावयाचीं आहेत. जेव्हां एखाद्या नवीन प्रकारच्या सहकारी संस्थेची नोंदणी करावयाची असेल व तिच्यासाठीं नमुनेवजा उपविधि उपलब्ध नसतील, तेव्हां तिचे उपविधि, अशा संस्थांची नोंदणी करण्यापूर्वी सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारकडून प्रथम संमत करून घेतले पाहिजेत.)

७९. सहकारी संस्थांची वाढ आणि व्याप्ति वाढविणें (सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या बाबतींत).

८०. राज्य सरकारकडून आर्थिक साहाय्य मिळण्यासाठीं सहकारी संस्थांच्या अर्जाचें प्रवर्तन करणें.

८१. शेअर भांडवलांत सहभागी होण्याच्या बाबतींत सहकारी संस्थांचें (सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारकडून निर्दिष्ट करण्यांत येतील अशा) अर्जाचें, संयुक्त संस्थांकडे प्रवर्तन करणें.

८२. ज्या बाबतींत, सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारनें घालून दिलेल्या शर्तीस अधीन राहून राज्य सरकार शेअर घेऊं शकते त्या बाबतींत सहकारी संस्थांचे शेअर घेणें.

८३. शेतीच्या उत्पन्नाच्या बाजारांवरील देखरेख व नियंत्रण (हें देखरेखीचें व नियंत्रणाचें काम केवळ जिल्हापातळीवरीलच असेल).

## प्रकाशन

८४. फिरत्या प्रकाशन गाड्या.

८५. जिल्हा प्रदर्शनें आयोजित करणें.

८६. करमणुकीच्या कार्यक्रमाद्वारें प्रसिद्धि.

८७. ग्रामीण विभागासाठीं नभोवाणीचे कार्यक्रम.

## सामूहिक विकास

८८. सामूहिक विकास कार्यक्रम.

८९. स्थानिक विकास कामांचा कार्यक्रम.

## समाज शिक्षण

९०. सामूहिक मनोरंजन केंद्रें.

९१. प्रौढ साक्षरता केंद्रें.

९२. क्रीडा, खेळ, क्रीडांगणें, सामग्री, इत्यादि आणि कल्याणकारी संघटना.

९३. किसान मेळे.

९४. बाहेरील भागांना भेटी देण्याचा कार्यक्रम आंखणें.

९५. माहिती वितरण.

९६. अल्पमुदतीचीं शिबिरें.

९७. महिला संघटना व कल्याण.

९८. शिशु संघटना व कल्याण.

९९. फिरत्या चित्रपट गाड्या.

१००. ग्रंथालयें आणि वाचनालयें.

१०१. जत्रा, देखावे आणि प्रदर्शन.

## ग्रामीण घर बांधणी

१०२. ग्रामीण घर बांधणी.

**संकीर्ण**

१०३. ग्रामोद्धार.

१०४. आदर्श गांवें वसविणें (त्यासाठींचीं अनुदानें आणि कर्जें धरून).

१०५. खेड्यांचें आर्थिक कल्याण.

१०६. लोकांचें आरोग्य, सुरक्षितता, सुख किंवा सोय यांची ज्यामुळें वाढ होण्याचा संभव आहे अशीं स्थानिक स्वरूपाचीं कामें.

१०७. बाजार.

१०८. धर्मशाळा, विश्रामगृहें, मुशाफिरखानें, सराई, वगैरे.

१०९. चावड्या.

११०. इतर सार्वजनिक संस्था.

१११. औद्योगिक बेकारी वगळून (इतर) स्थानिक बेकारी.

११२. गांवठाणांची सुधारणा करणें व तीं वाढविणें (त्या कारणासाठीं द्यावयाचीं अनुदानें व कर्ज धरून).

११३. नवीन गांवठाणें वसविणें (त्या कारणांसाठीं द्यावयाचीं अनुदानें व कर्जें धरून).

११४. जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचें स्वास्थ्य.

११५. जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांसाठीं घरांची तरतूद.

११६. सार्वजनिक जागांत आणि उद्यानांत झाडें लावणें व त्यांची जोपासना करणें.

११७. रानटी जनावरांचा नाश करण्याबाबत बक्षिसें.

११८. जाहीर सत्कार, सभारंभ आणि मनोरंजन.

११९. स्थानिक यात्रांबाबत व्यवस्था करणें.

१२०. दफन भूमि व दहन भूमि (प्रेतांची विल्हेवाट लावण्याचें काम धरून).

१२१. ग्राम पंचायतीचे पंच, सरपंच आणि बिनसरकारी इसम यांचीं संम्मेलनें.

१२२. स्थानिक भटक्या गरीब लोकांसाठीं मदत.

१२३. गरीबांसाठीं घरांची व्यवस्था करणें.

गटयादी

**हीं कामें पंचायत समितीच्या अधिकारक्षेत्रांतील**

**शेतकी**

(१) खरीप व रबी पीक मोहिमा ;

(२) प्रकृष्ट भातशेतीची लागवड ;

(३) शेतीची प्रगति व सुधारणा ;

(४) सुधारलेल्या शेतीपद्धतीचें प्रात्यक्षिक व त्याबाबत प्रचार करणें आणि नमुनेदार शेतकीच्या संस्था स्थापन करणें व त्या सुस्थितींत ठेवणें ;

(५) शेतीविषयक सुधारलेल्या अवजारांचा प्रचार करणें ;

(६) फळें व भाजीपाला यांच्या उत्पादनांत वाढ करणें ;

(७) गुदामें बांधणें व त्यांची व्यवस्था ठेवणें ;

(८) रासायनिक खतें, शेतीचीं अवजारें व शेतीसाठीं लागणारें लोखंड, पोलाद व सिमेंट यांचें वांटप करणें.

## पशुसंवर्धन

(९) खेड्यांतील पशुवैद्यकीय पेट्या ;

(१०) पशुवैद्यकीय सहाय्य केंद्रें ;

(११) तालुका पशुधन सुधारणा संघ व तशाच प्रकारच्या संस्था स्थापन करणें ;

(१२) वैरण सुधारण्याच्या जागा ;

(१३) वैरण मुरवावयाचे खड्डे ;

(१४) कोंबड्यांच्या सुधारलेल्या पैदाशीचें वांटप ;

(१५) मेंढ्यांच्या सुधारलेल्या पैदाशीचें वांटप.

(१६) गुराढोरांचीं प्रदर्शनें व मेळावे भरविणें.

## जंगलें

(१७) गांवजंगलें व कुरणें (चांगल्या प्रतीचें गवत उगविणें या गोष्टींचा समावेश करून) ;

(१८) कुरण व जळण यांच्या कारणासाठीं गांवशिवारांच्या विकासासाठीं उपाययोजना.

## समाज कल्याण

(१९) मागासलेल्या वर्गांचा आर्थिक विकास, यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(अ) शेतीची साधनसामग्री खरेदी करण्यासाठीं कर्जें व अर्थसहाय्य यांच्या रूपानें व्यक्तिशः शेतकऱ्यास आर्थिक साहाय्य देणें ;

(ब) कुटीरोद्योग व व्यवसाय यांसाठीं कर्जें व अर्थसहाय्य यांच्या रूपानें व्यक्तिशः कारागीरांना आर्थिक सहाय्य देणें ,

(क) विमुक्त जातीना चरखे पुरविणें ;

(ड) हस्तव्यवसाय केंद्रांची स्थापना करणें ;

(२०) अस्पृश्यता निवारण, यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(अ) हरिजन सप्ताह साजरे करणें ;

(ब) सवर्ण हिंदु व हरिजन यांच्यांतील आंतरजातीय विवाहांस प्रोत्साहन देणें ; आणि

(२१) मागासलेल्या वर्गाच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम, यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(अ) महिलांच्या व बालकांच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम व योजना ;

(ब) बालवाड्यांची स्थापना करणें व त्यांची व्यवस्था ठेवणें ;

(क) मागासलेल्या वर्गाच्या विकासासाठीं प्रचार व अशा कार्यक्रमास प्रसिद्धी देणें ;

(ड) मागासलेल्या वर्गासाठीं करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करणें ;

(इ) सामाजिक मेळे भरविणें ;

(फ) मागासलेल्या वर्गासाठीं संस्कार केंद्रें, सामूहिक व करमणुकीचीं केंद्रें आणि सामूहिक सभागृहें ,

(ग) विमुक्त जातींना कपडे पुरविणें ,

(ह) औषधें खरेदी करण्यासाठीं व्यक्तींना आर्थिक साहाय्य देणें आणि स्वतःहून मदत देऊं केलेल्या संस्थांना वैद्यकीय मदत देण्यासाठीं अनुदानें देणें ;

(आय्) मागासलेल्या वर्गांच्या इसमांसाठीं घरांची तरतूद करणें ; आणि

(जे) पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची तरतूद करणे.

## शिक्षण

(२२) प्राथमिक शाळांच्या इमारती बांधणें व त्या सुस्थितींत ठेवणें.

(२३) प्राथमिक शाळांसाठीं साहित्य व खेळाचीं मैदानें यांची तरतूद करणें.

## वैद्यकीय

(२४) वैद्यक व्यवसायींची अर्थसहाय्यित केंद्रें.

(२५) ग्रामीण वैद्यकीय मदत केंद्रें.

## आयुर्वेद

(२६) खेड्यांतील आयुर्वेदिक औषधांच्या पेट्यांतील औषधांचा सांठा पुन्हा भरून काढणें.

## सार्वजनिक आरोग्य

(२७) प्रसुति व शिशुकल्याण केंद्रें ;

(२८) खेड्यांत औषधी पेट्या ठेवणें ;

(२९) ग्रामीण साफसफाई ;

(३०) सार्वजनिक आरोग्य रक्षणासाठीं आवश्यक ती उपाययोजना करणें.

## इमारती व दळणवळण

(३१) ग्रामीण रस्ते बांधणें, ते सुस्थितींत ठेवणें व त्यांच्या दुरुस्त्या ;

(३२) ग्रामीण रस्त्यावर पूल व नाले बांधणें ;

(३३) सार्वजनिक (तरी) नावा.

(३४) रस्त्यांच्या आजूबाजूस झाडें लावणें.

## सार्वजनिक आरोग्यविषयक इंजिनीअरींगची कामें

(३५) ग्रामीण पाणीपुरवठ्याच्या विहिरी ;

(३६) गांवांत जमिनीच्या पृष्ठभागांवर गटारे बांधणें.

## कुटीरोद्योग

(३७) वैयक्तिकरीत्या कारागीरांस सहाय्यक अनुदानें व कर्जें देणें ;

(३८) कुटीरोद्योग व ग्रामोद्योग यांची वाढ व विकास.

## सहकार

(३९) सहकारी चळवळीची वाढ करणें व तिची व्याप्ति वाढविणें.

## प्रकाशन

(४०) ग्रामीण नभोवाणी कार्यक्रम ;

(४१) करमणुकीच्या कार्यक्रमाद्वारें प्रसिद्धी.

## सामाजिक विकास

(४२) समाज विकास कार्यक्रम ;
(४३) स्थानिक विकास कामाचा कार्यक्रम.

### समाजशिक्षण

(४४) समाज मनोरंजन केंद्रें ;
(४५) प्रौढ साक्षरता केंद्रें ;
(४६) क्रीडा, क्रीडांगणें, सामग्री आणि कल्याणकारी संघटना ;
(४७) शेतकऱ्यांचे मेळावे ;
(४८) बाहेरील भागांना भेटी देण्याचा कार्यक्रम आंखणें ;
(४९) माहिती वितरण ;
(५०) अल्पमुदतीचीं शिबिरें ;
(५१) महिला संघटना व कल्याण ;
(५२) शिशु संघटना व कल्याण ;
(५३) फिरत्या चित्रपट गाड्या ;
(५४) ग्रंथालयें व वाचनालयें ;
(५५) जत्रा, देखावे व प्रदर्शनें.

### संकीर्ण

(५६) ग्रामीण घर बांधणी ;
(५७) ग्रामोद्धार ;
(५८) आदर्श गांवें बसविणें (त्यासाठींचीं अनुदानें व कर्जें धरून) ;
(५९) खेड्यांचें आर्थिक कल्याण ;
(६०) लोकांचें आरोग्य, सुरक्षितता, सुख किंवा सोय यांची ज्यामुळें वाढ होण्याचा संभव आहे अशीं स्थानिक स्वरूपाचीं कामें ;
(६१) बाजार ,
(६२) धर्मशाळा, विश्रांतिगृहें, मुशाफिरखाने, सराई, वगैरे ;
(६३) चावड्या ,
(६४) इतर सार्वजिक संस्था ;
(६५) औद्योगिक बेकारी वगळून इतर स्थानिक बेकारी ;
(६६) गांवठाणांची सुधारणा करणें व तीं वाढविणें (त्यासाठीं द्यावयाचीं अनुदानें व कर्जें धरून) ;
(६७) नवीन गांवठाण वसविणें (त्यासाठी द्यावयाचीं अनुदानें व कर्जें धरून) ;
(६८) सार्वजनिक जागा व बागा यांमध्यें झाडें लावणें व त्यांची जोपासना करणें ;
(६९) रानटी जनावरांचा नाश करण्याबाबत बक्षिसें ;
(७०) जाहीर सत्कार व समारंभ आणि मनोरंजन ;
(७१) स्थानिक यात्रांबाबत व्यवस्था करणें ;
(७२) ग्रामपंचायतींचे पंच, सरपंच व बिन-सरकारी इसम यांचीं संमेलनें ;
(७३) स्थानिक भटक्या गरीब लोकांसाठीं मदत ;
(७४) गरीबांसाठीं घरांची व्यवस्था करणें.

## १८. अमरावती जिल्हा परिषदेचे अेक वर्ष

लोककल्याणकारी राज्याची कल्पना साकार करण्यासाठी आणि ग्रामीण क्षेत्रांतील विकास कार्यक्रमाचा वेग वाढविण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्यांत सत्तेचें विकेन्द्रीकरण, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांची स्थापना करून १ मे १९६२ रोजी करण्यांत आले व जिल्हा विकास मंडळ, जिल्हा पंचायत मंडळ आणि जिल्हयांतील ६ जनपद सभा रद्द करण्यांत आल्या. विकास कार्यक्रमाशी संबंध असणारे सरकारी अधिकारी आणि पूर्वीच्या जनपद सभांचे कर्मचारी यांचें एकत्रीकरण करून जिल्हा परिषदेची नवी विकास शासन यंत्रणा जिल्हयांत उभारण्यांत आली. जिल्हा परिषद ही जिल्हा स्तरावरील व पंचायत समिति ही विकास खंड स्तरावरील शासन यंत्रणा आहे.

सत्तेचें विकेन्द्रीकरण करतांना या विकेन्द्रीकरणाचा लोकशाही राज्यपद्धति ही मूळ पाया, आणि त्या दृष्टीनेच जिल्हा ४७ मतदार विभागांत विभागण्यांत आला. या ग्रामीण मतदार विभागांतील जनतेने निवडून दिलेले ४७ प्रतिनिधी जिल्हा परिषदेचे सभासद आहेत. यांतील २ मतदार विभाग अनुसूचित जातीसाठी व २ मतदार विभाग अनुसूचित जमाती (आदिवासी) साठी राखीव आहेत. जिल्हयांतील १३ पंचायत समित्यांचे सभापती हे या जिल्हा परिषदेचे पदसिद्ध सभासद आहेत. जिल्हयांतील ५ सहकारी संस्थांचे अध्यक्ष हे संलग्नित सभासद आहेत.

जिल्हयांत ७२५ ग्रामपंचायती आहेत. या ग्रामपंचायतीचे एकूण ५,८०७ पंच असून त्यांनी १३ पंचायत समित्यांसाठी ९४ मतदार गणकांतून ९४ सरपंचांची पंचायत समिति सदस्य म्हणून निवड केलेली आहे. प्रत्येक पंचायत समितीवर तालुक्यांतील सहकारी संस्थेचे अध्यक्ष हे संलग्नित सदस्य म्हणून घेण्यांत आले आहेत. प्रत्येक पंचायत समितीत असलेले मतदार विभाग, गणक आणि ग्रामपंचायती यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे:—

| पंचायत समिति (१) | मतदार विभाग (२) | मतदार गणक (३) | ग्रामपंचायती (४) |
|---|---|---|---|
| अचलपूर ... ... ... | ३ | ६ | ५२ |
| चान्दूर बाजार ... ... | ४ | ८ | ६१ |
| दर्यापूर ... ... ... | ३ | ६ | ५२ |
| अंजनगाव ... ... ... | ४ | ८ | ६३ |
| चांदूर रेल्वे ... ... | ५ | १० | ७३ |
| तिवसा ... ... ... | ५ | १० | ६९ |
| चिखलदरा ... ... ... | २ | ४ | २० |
| धारणी ... ... | २ | ४ | ४५ |
| मोर्शी ... ... ... | ४ | ८ | ७१ |
| वरूड ... ... ... | ४ | ८ | ६४ |
| अमरावती ... ... | ४ | ८ | ५४ |
| भातकुली ... ... ... | ४ | ८ | ४३ |
| नांदगाव खंडेश्वर ... ... | ३ | ४ | ५८ |

विकास खंडांतील यत्रणा ही पंचायत समितीच्या स्वाधीन करण्यांत आली असून, जिल्हयांतील विकास यंत्रणा जिल्हा परिषदेच्या देखरेखीखाली काम करीत असते. अमरावती जिल्हा परिषदेचा १९६२-६३ चा अर्थसंकल्प १,३९,८१,६०० रुपयांचा होता. १९६३-६४ सालचा अर्थसंकल्प १ कोटी ८७ लाख ६५,९७० रुपये आहे. जिल्हयातील महसूल वसूलीची शेंकडा ३० टक्के रकम ग्रामपंचायतीला व ७० टक्के रकम जिल्हा परिषदेच्या स्वाधीन करण्यांत येत असते. यावर्षी जिल्हयाच्या एकूण शेतमहसूल वसुलीनुसार सुमारे २४,७९,५०८ रुपये जिल्हा परिषदेला मिळतील.

अमरावती जिल्हा परिषदेच्या प्रशासन व्यवस्थेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ६,२१२ कर्मचारी आहेत. यांत राज्य सरकारच्या जिल्हयांतील वेगवेगळ्या खात्यांतून व जिल्हयांतील ६ जनपद सभांच्या कार्यालयांतील नोकरांचा समावेश आहे. प्रथम श्रेणीतील ४, द्वितीय श्रेणीतील ४२, तृतीय श्रेणीतील ५,५१३ व चतुर्थ श्रेणीतील ६५३ नोकर आहेत.

जिल्हा परिषद स्थापन झाल्यानंतर आणि निवडणूकीद्वारा निवडून आलेल्या सभासद आणि इतर पदाधिकाऱ्यांनी १५ ऑगस्ट १९६२ रोजी परिषदेचा कारभार आपल्या हाती घेतला. बांधकाम, शिक्षण, शेती, पशुसंवर्धन, सहकार, आरोग्य व अर्थ या ६ विषय समित्यांवर अमरावती जिल्हा परिषदेच्या सभासदांतून सदस्य नियुक्त करण्यांत आले. शिक्षण व बांधकाम या दोन विषय समित्यासाठी १, शेती, पशु संवर्धन व सहकार या २ समित्यासाठी १, आणि आरोग्य व अर्थ या विषय समित्यासाठी १ असे विषय समित्यांचे ३ सभापति आहेत.

जिल्हा परिषदेकडे जिल्ह्यांतील शेतकी शाळांची व्यवस्था व देखदेख, त्या शाळांना अनुदान देणें पीक स्पर्धा घेणें, उत्पादन वाढीच्या मोहीमा, खतांचें उत्पादन, शेतकी अवजारांचें व खतांचें वांटप हीं कामें आलेली आहेत. पशुसंवर्धनाचे बाबतींत खेड्यांतील चराऊ कुरणें, पशुसंगोपन, पशुचिकित्सा हीं कामें जिल्हा परिषदेच्या कक्षेंत आणण्यांत आली आहेत.

जिल्ह्यांतील ग्रामीण दवाखाने, धर्मार्थ दवाखाने, प्रसूतिगृह यांसारख्या संस्थांना अनुदान देण्याचें काम जिल्हा परिषदेद्वारे करण्यात येत आहें.

प्राथमिक आरोग्य केन्द्रें, ग्रामीण साफसफाई, सार्वजनिक आरोग्य, सांथीच्या रोगाच्या प्रतिबंधक मोहीमा, ग्रामीण पाणी पुरवठा, आरोग्य व वैद्यकीय उपचाराबाबतची जबाबदारी आता जिल्हा परिषदेकडे देण्यांत आली आहे.

जिल्ह्यांतील ग्रामीण रस्ते, जिल्हा रस्ते, व इतर दळणवळणाच्या साधनांची देखरेख व कामें जिल्हा परिषदेकडे सोपविण्यांत आली आहेत. जिल्ह्यांतील १ लाखापेक्षा कमी शेअर भाण्डवल असलेले व जिल्ह्यापुरतेच कार्यक्षेत्र मर्यादित असलेल्या सहकारी संस्थाची नोंदणी, सदस्यत्वाबाबतची अपिलें व विस्तार कार्यासाठी आवश्यक असलेली देखरेख ठेवणें ही कामें जिल्हा परिषदेकडे आली आहेत. सहकारी संस्थांची वाढ करणें, राज्य सरकारचें आर्थिक सहाय्य मिळविण्याकरिता व त्यांचें शेअर भाण्डवलासाठी संयुक्त संस्थांना अर्ज सादर करणें, हींहि कामें जिल्हा परिषद पार पाडीत आहे.

प्राथमिक शाळा, मुलोद्योग शाळा, माध्यमिक शाळेची स्थापना, व्यवस्था व तपासणी हीं कामें जिल्हा परिषदेकडे आली आहेत. यांत अभ्यासक्रम ठरविणें, शिष्यवृत्त्या देणें, प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना कर्ज देणें, ही कामें शिक्षण संचालकाची असल्याने या कामांचा समावेश नाही. समाज शिक्षण, सामुहिक करमणूक केंद्रें चालविणें, वाचनालयांना मदत देणें ही कामें तसेच ग्रामीण घर बांधणी व ग्रामीण जीवनांतील आर्थिक व सामाजिक विकासांशी संलग्न असलेले व इतरहि कामें जिल्हा परिषदेकडे सोपविण्यांत आली आहेत. मागासलेल्या वर्गाच्या शैक्षणिक गरजांकडे लक्ष देवून आवश्यक त्या योजना अमलांत आणण्याबद्दल जिल्हा परिषद पुढाकार घेत आहे. अस्पृश्यता निवारणाच्या कार्यातहि जिल्हा परिषदेचा समाज कल्याण विभाग प्रभावी कार्य करीत आहे. फिरत्या प्रचार गाड्या, ग्रामीण विभागांत रेडिओ सेटस् बसविणे व जिल्हा प्रदर्शनें भरविणें, ग्रामीण विभागांत मनोरंजनाद्वारे विकासाचा प्रचार करणें हीं कामें जिल्हा परिषदेकडे सोपविण्यांत आलेली आहेत.

जिल्हा परिषदेच्या पहिल्या वर्षांत शेती उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने एकूण ३५३ नव्या विहिरी बांधल्या, ११८ जुन्या विहिरी दुरुस्त केल्या, २१३ पंपिंग सेटस्साठी कर्ज देवून हे सेटस् कास्तकाराच्या विहिरींवर बसविले, १२,१०० एकर जमीन ट्रॅक्टरच्या सहाय्याने नांगरण्यांत आली, १६,२०० एकरांवर बांध घातले, १९,७५० टन कम्पोस्ट खताचें उत्पादन करण्यांत आले, २०९ लक्ष एकरांसाठी सरकीचें वांटप करण्यांत आले आणि १,५०० एकरांसाठी ज्वारीचे बी वाटण्यांत आले

कृत्रिम रेतन केन्द्रें, कुक्कुटपालन, इत्यादि कृषि धंद्यास पुरक असे कार्यक्रम जिल्हा परिषदेने हाती घेतले आहेत

जिल्ह्यांतील ग्रामीण क्षेत्रांत सर्वत्र ग्राम स्वयंसेवक दलाची स्थापना झाली असून होमगार्डचें प्रशिक्षण घेण्याकरिता ग्रामीण विभागांतून १,५०० तरूण दिले असून त्यांचें प्रशिक्षण सुरू आहे. ग्राम स्वंयसेवक दलामध्ये अदमासे २०,००० स्वयंसेवकांनीं नांवे नोंदविलीं आहेत.

बांधकाम खात्यातील इमारतीचें कामावरील खर्चांत कपात झाल्यामुळे ह्या विभागामार्फत शेतकी उत्पादनाची निकड लक्षात घेवून १,६०० एकर जमीन ओलीत करण्यास कार्यक्षम ठरणाऱ्या १३ लहान पाटबंधाऱ्याच्या योजना हाती घेण्यांत आल्यात. त्यांपैकी ९ बंधाऱ्यांचीं कामें पूर्ण होवून १,४०० एकर जमीन ओलितीखाली आलेली आहे.

आरोग्य खात्यामध्ये ११ प्राथमिक चिकित्सा केंद्रें, ७ कुटुंब नियोजन केन्द्रें, १९ अलोपॅथिक दवाखाने आणि ६८ आयुर्वेदिक दवाखाने आहेत. देवी निर्मूलनाकरिता जास्तीचे ३६ व्हॅक्सिनेटर्स व १५ सॅनिटरी इन्सपेक्टर्स यांची ास नियुक्ति करण्यांत आली असून देवी काढण्याचे काम सुरू झाले आहे.

सहकार क्षेत्रांतसुद्धा आज पावेतो जिल्हा परिषदने ३३ सहकारी संस्था पंजीबद्ध (रजिस्टर) केल्या असून या विभागाच्या नियंत्रणाखाली ६ कापूस बाजार व ४ धान्य बाजार आहेत. आणखी अेक धान्य बाजार उघडण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे.

समाज शिक्षण योजनेंतील भाग म्हणून गेल्या वर्षांत ४० गांवें संपूर्ण साक्षर करण्यांत आलीत. तसेच शाळांमध्ये राष्ट्रीय शिस्त योजना सुरू आहे.

समाज कल्याण विभागाची आदिमजाती कल्याण आणि अस्पृश्यता निवारण हीं दोन मुख्य अंगें असून सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे लोक शिक्षण तसेच सध्याच्या आणीबाणीच्या परिस्थितीत ग्रामीण विभागातील लोकांचे मनोधैर्य टिकविण्याचे कार्यहि जोरात सुरू आहे.

## १९. कोणाकडे कशाची चौकशी करावी.

| कामाचें नांव | संबंधित अधिकारी |
|---|---|
| १. लागवडीकरिता जमीन, तगाई, कर्ज, लोखंड, सिमेंट. | शहरी विभागांत जिल्हाधिकारी व तालुका पातळीवरील तहसिलदार व ग्रामीण क्षेत्रांत सभापति, सहकार व कृषीविषयक समिती. |
| २. शेतीच्या सुधारलेल्या पद्धती, रासायनिक खतें, सुधारलेली बी-बियाणे, अवजारे, कीटकनाशक औषधे. | परीषद शेतकी अधिकारी, अमरावती, अथवा पंचायत समित्यांचे खंडविकास अधिकारी. |
| ३. उन्हाळी पिकांच्या लागवडीसंबंधी ... | परीषद शेतकी अधिकारी, अमरावती. |
| ४. शेती शिक्षणक्रम, शेती शाळेत प्रवेश व त्यासंबंधीची माहिती. | परीषद शेतकी अधिकारी, अमरावती. |
| ५. पीक स्पर्धा व प्रदर्शने ... ... ... | अध्यक्ष, जिल्हा परीषद, अमरावती. |
| ६. सहकारी संस्थांची स्थापना, कार्यपद्धती व सहकारी चळवळीसंबंधीची माहिती. | डेप्युटी रजिस्ट्रार, सहकारी संस्था, अमरावती, किंवा तालुका पातळीवरील विकास योजना सभापति कृषि व सहकारविषय समिति जिल्हा परीषद क्षेत्रांतील सहकार खात्याचे विस्तार अधिकारी. |
| ७. शिक्षण संस्थांची स्थापना, कार्य आणि त्या-संबंधी माहिती. | सभापति, शिक्षण समिति, जिल्हा परीषद. |
| ८. प्राथमिक शिक्षण व तत्संबधी माहिती ... | परीषद शिक्षणाधिकारी, अमरावती. |
| ९. आर्थिक दृष्टीने मागासलेल्या वर्गांतील जनतेस मिळणाऱ्या शैक्षणिक सवलती. | समाजसेवा अधिकारी, जिल्हा परीषद, अमरावती. |
| १०. रस्ते, पूल आणि पाटबंधाऱ्या[illegible] दुरुस्ती व तत्संबंधी माहिती. | [illegible]हा इंजिनिअर. |
| ११. ग्रामीण भागांतील लहान उद्[illegible] मिळणारे सरकारी सहाय्यक व मार्गदर्शन, वैयक्तिक औद्योगिक कलाकारास मिळणाऱ्या सहाय्यासंबंधी माहिती. ... | [illegible] व सहकार समिति, जिल्हा परीषद [illegible] अधिकारी. |
| १२. जनावरांचें संगोपन, त्यांच्या रोगावरील उपाय-योजना आणि कोंबडीपालन. | परीषद पशु संवर्धन अधिकारी, अमरावती किंवा तालुक्यांतील जनावरांच्या दवाखान्याचे अधिकारी. |

REFBK-0028958

| कामाचें नांव | संबंधित अधिकारी |
|---|---|
| १३. प्रवाशांचीं विश्रामस्थाने व त्यांत जागा राखून ठेवण्यासाठी | एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, दळणवळण व बांधकाम खातें अमरावती |
| [illegible] ग्रामपचायतीं, सहकारी संस्थांत सामुदायिक श्रवणसाठीं रेडिओ बसविणे व त्यासंबंधी माहिती. | अध्यक्ष,जिल्हा परीषद, किंवा टेक्निशियन इनचार्ज, ग्रामीण रेडिओ, अमरावती. |
| १५. हरिजन व मागासलेल्या वर्गांतील जनतेला मिळणाऱ्या सवलती, सहाय्य व सुखसोयी-संबंधी माहिती. | समाज सेवा अधिकारी, जिल्हा परीषद, अमरावती. |
| १६. सार्वजनिक आरोग्य संवर्धन उपचार व्यवस्था व साथीचे रोग प्रतिबंधक उपाययोजना संबंधी. | सभापति, आरोग्य विषय समिति, जिल्हा परीषद, अमरावती. परीषद आरोग्य अधिकारी. |
| १७. मलेरिया निर्मूलन व डी.डी.टी. फवारण्या-संबंधी. | आरोग्य अधिकारी (मलेरिया निर्मूलन), अचलपूर. |
| १८. विहिरी, तलाव, रस्ते, शाळागृहे आदिंच्या स्थानिक विकास कार्यक्रमातून होणाऱ्या बांधकामासंबंधी. | अध्यक्ष, जिल्हा परिषद किंवा मुख्य कार्यपालन अधिकारी, अमरावती. |
| १९. विकास गट क्षेत्रांतील विकास कामें, त्यांची कार्यपद्धती व त्यास मिळणाऱ्या सहाय्यासंबंधी. | संबंधित विकास गटाचे अधिकारी किंवा संबंधित पंचायत समित्यांचे सभापति. |
| २०. वीज योजना पुरवठ्यासंबंधी ... ... | एक्झीक्युटिव्ह इंजिनीअर, महाराष्ट्र इलेक्ट्रिसिटी बोर्ड, अमरावती. |
| २१. जिल्ह्यांतील पोलीस यंत्रणा व त्यासंबंधीची माहिती व नियम. | जिल्हा पोलीस अधिक्षक, अमरावती. |
| २२. जंगलांचें संरक्षण, संवर्धन आणि तत्संबंधीचे नियम व माहिती. | कॉन्झर्वेटर ऑफ फॉरेस्टस् किंवा डिव्हीजनल फॉरेस्ट ऑफिसर, अमरावती. |
| २३. गांवात पोस्ट सुरू करणे, टपालाची, तारेची व्यवस्था किंवा टपाल व तार खात्यासंबंधीची कार्यपद्धति व इतर माहिती. | सुपरिंटेंडेंट, पोस्ट ऑफिसेस, अमरावती. |
| २४. पी. टी. एस. चे मार्ग व त्यांची कार्यपद्धति व तत्संबंधी माहिती. | डेपो मॅनेजर, महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट, अमरावती. |
| २५. हौशी प्रवाशांचीं आकर्षणे व तत्संबंधी माहिती | जिल्हा प्रसिद्धि अधिकारी, अमरावती. |

| कामाचें नांव | संबंधित अधिकारी |
|---|---|
| २६. ग्रामपंचायती व त्यांचा कारभार ... | अध्यक्ष, जिल्हा परिषद, अमरावती. मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| २७. नोकरी मिळणाऱ्यांच्या नांव नोंदणीसंबंधी | सब-रीजनल एम्प्लॉयमेंट ऑफिसर, अमरावती. |
| २८. माजी सैनिकांच्या, त्यांच्या मुलाबाळांच्या व कुटुंबियांच्या हितसंबंधीच्या प्रश्नासंबंधी. | जिल्हा अधिकारी व अध्यक्ष, जिल्हा माजी सैनिक मंडळ, अमरावती. |
| २९. जिल्ह्यांतील विविध विभागांच्या योजनांची माहिती व त्या संबंधीची प्रगति. | जिल्हा प्रसिद्धि अधिकारी, अमरावती. |
| ३०. अल्प बचत योजना व तत्संबंधीच्या कार्यपद्धतीची माहिती. | राष्ट्रीय बचत संघटक, जिल्हाधिकारी कचेरी, अमरावती. |
| ३१. जमिनीची बांध बंदिस्ती करण्यासंबंधी माहिती | भू-संरक्षण अधिकारी, अमरावती. |
| ३२. कापसाच्या लागवडीसंबंधी ... ... | परीषद शेतकी अधिकारी, अमरावती, व कापूस संशोधन केंद्र, अचलपूर. |
| ३३. दारूबंदी प्रचार, स्पिरीट परवाने व त्यासंबंधी | इन्स्पेक्टर, प्रोहीबिशन व एक्साइज, अमरावती, जिल्हा दारूबंदी प्रचार अधिकारी. |
| ३४. विक्रीकर वगैरेसंबंधी ... ... | विक्रीकर अधिकारी, श्रीकृष्ण पेठ, अमरावती. |
| ३५. बंदुक परवाना, हॉटेल परवाने, शांतता व सुव्यवस्था. | जिल्हा मॅजिस्ट्रेट, अमरावती, किंवा त्यांनी या कार्यासाठी नियुक्त केलेला अधिकारी. |
| ३६. आदिवासी कल्याण विकास कार्याची माहिती | अध्यक्ष, जिल्हा परीषद, क्षेत्र संघटक, आदिवासी कल्याण, अचलपूर. |
| ३७. जिल्ह्यांतील सर्वसाधारण (आंकडेवारी) माहिती. | डिस्ट्रिक्ट स्टॅटीस्टिकल ऑफिसर, अमरावती. |
| ३८. ग्रंथालयाबाबत माहिती ... ... | परीषद शिक्षणाधिकारी, अमरावती, किंवा जिल्हा ग्रंथपाल, अमरावती. |
| ३९. शेती माल गोदामांत ठेवण्याबाबत ... | वेअर हाऊसमन, सेंट्रल वेअर हाऊसींग कार्पोरेशन, अमरावती. |

GPN—J-3090—RPON—7-10-63—5,000+22.